# वाहत्या वाऱ्यासंगे

प्रा. शैला लोहिया



ग्रंथविशेष प्रतिष्ठान, सातारा

1552

# वाहत्या वाऱ्यासंगे

प्रा. शैला लोहिया

मानवलोक संचलित
डॉ. राममनोहर लोहिया वाचनालय
अंबाजोगाई. ग्रंथ क्र. 1552

LIBRARY
AMBAJOGAI - 431 517, DIST. BEED

ग्रंथविशेष प्रतिष्ठान, सातारा

"

तरुणाईच्या उंबरठ्यावर
आकाशमोगरी ... सोनकणीस ...
मेंदीत झुलणारे मन
जगाचे अनुभव घेता घेता
सामान्य स्त्रीच्या हृदयातील
घुंगटबद्ध जखमांचा शोध घेऊ लागले.
तिच्यातील माणूस म्हणून जगण्याची
धडपड ... जिद्द ... आस
शोधू लागले
या प्रवासाची शब्दांकित क्षणचित्रे ...
म्हणजेच
'वाहत्या वाऱ्यासंगे'

मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय
ग्रंथालय
552
अंबाजोगाई-४३१५१७ जि.बीड

891.468 Loh

ISBN - 81-87104-40-7
'वाहत्या वाऱ्यासंगे' ( ललित लेख )
प्रथमावृत्ती - जून १९९८

© प्रा. शैला लोहिया
मनस्विनी / मानवलोक /
३२. किनारा, विद्याकुंज कॉलनी,
अंबाजोगाई - ४३१ ५१७
जि. बीड
552
फोन · नि. (०२४४६) ४७०१६

मुद्रक - प्रकाशक
डॉ. सौ. निर्मला सारडा,
ग्रंथविशेष प्रतिष्ठान
८५७ शनिवार पेठ,
सातारा ४१५ ००२
मुद्रणस्थळ - प्राकृती प्रिंटर्स, सातारा

साठ रुपये

# अर्पण पत्रिका

जीवनाचा रंगमंच अनुभवण्यासाठी भरारणाऱ्या मनाला
आई-पपांनी कधी बेड्या घातल्या नाहीत.
आणि
इकडच्या घरीही सासरजी नि सासूजींना
आडवे बांध न घालता ममता दिली.
मोठे दीर भाऊसाहेब यांनी तर
माझ्या लेखनाचं प्रचंड कौतुक केलं.
आज हे कुणीच हयात नाहीत.
पण त्यांच्या आठवणी मात्र
सतत सोबतीला आहेत.
त्या
सुश्री शकुंतला, ॲड. शंकरराव परांजपे,
सुश्री सुमकाबाई, श्री. शालिग्रामजी लोहिया,
ॲड. भगवानदासजी लोहिया
यांना आदरपूर्वक अर्पण

— शैला लोहिया

मानसलोक संचलित
डॉ. मनोहर लोहिया ग्रंथालय
क्र. 1552

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | सेवादलाचा संस्कार | ११ |
| २. | उमलतीचे रंग, गंध | १९ |
| ३. | रेल्वेच्या डब्यातील आत्मा | ३० |
| ४. | मोर्हासनाची सल | ३६ |
| ५. | फुंकर | ४० |
| ६. | उत्तरांच्या शोधातले प्रश्न | ४५ |
| ७. | बेशरमीची झाडं | ४९ |
| ८. | जांभूळ झाडाखाली | ५७ |
| ९. | मंदा | ६१ |
| १०. | आपाढातला एक दिवस | ६५ |
| ११. | हा भाद्रपदाचा महिना | ६८ |
| १२. | आंब्याच्या कोयींवरून घसरताना | ७३ |
| १३. | शारदा, कमला अन् स्त्रीमुक्ती वर्षही ! | ७७ |
| १४. | मोनकर्णीस | ८२ |
| १५. | आकाशमोगरी | ८५ |
| १६. | अधुऱ्या स्वप्नांची अक्षय वेल | ८८ |
| १७. | आजीच्या प्रेमाची गोडी | ९२ |
| १८. | हा वसंत रंग भरित | ९६ |
| १९. | मी युग विरहिणी | १०१ |
| २०. | आई : साधीसुधी तरीही असामान्य | १०४ |

# तरल संवेदनक्षम मनावर उमटलेले आल्हादकारक दवबिंदू

प्रा. शैला लोहिया यांच्या वीस लेखांचा 'वाहत्या वाऱ्यासंगे' हा संग्रह. हे लेख निसर्गवर्णनात्मक, व्यक्तिचित्रणात्मक आणि आत्मपर स्मरणरंजनात्मक असले तरी त्यांचा बाज प्रामुख्याने ललित लेखनाचा आहे. निसर्गाच्या विविध रूपांमध्ये हरवून जाणाऱ्या, तरल संवेदनाशील मनाच्या कमलपत्रावर उमटलेले, ऋतुचक्रातील बदलत्या विभ्रमांचे, डोंगरदऱ्यांचे, पानाफुलांचे, ऊनपावसाचे आल्हादकारक दवबिंदू म्हणजे हे भावकोमल लेख. पाचही इंद्रियांच्या सजग साक्षात्कारी चेतनेतून अवघ्या आसमंताला लडिवाळपणे कवेत घेण्याची किमया येथे सहजपणे साधलेली आहे. घटापटाचा आटापिटा येथे नाही. आहे तो अगदी मोकळ्या मनाने जे दिसेल त्याला सामोरे जाण्याचा स्वच्छंद स्वागतशील भाव. श्रावण, भाद्रपद, वसंत ऋतू, आषाढघन यांच्या रंगरूपांचा मनसोक्त वेध घेताना जशी शैलाताईंची काव्यात्म शब्दकळा अनावर आवेगाने उसळून येते त्याचप्रमाणे घरातल्या देशभक्तीच्या आणि राष्ट्रसेवादलाच्या वातावरणामुळे संस्कारित झालेल्या व्यापक सामाजिक जाणीवेच्या आणि माणुसकीच्या लोलकातून पाहताना समाजात रुजलेल्या विषमतेच्या, अन्यायाच्या, रूढींच्या, अंधश्रद्धांच्या पारंपरिक जोखडाखाली घुसमटलेल्या महिलांच्या कहाण्याही त्यांना अस्वस्थ, बेचैन करून टाकतात. स्वतःच्या स्त्रीत्वाचे व सामर्थ्याचे एक उपजत भान त्यांच्यात आहे आणि सद्यःकालीन स्त्रीमुक्तिवादाच्या विविध संकल्पनांद्वारे एक सैद्धांतिक व चिंतनशील बैठक त्याला लाभली आहे, त्यामुळे या लेखांचे स्वरूप तिपेडी झालेले आहे. पस्तीसेक वर्षांच्या कालावधीत लिहिले गेलेले हे लेख; पण याच तिपेडी अंतःसूत्रांमुळे ते सर्व एकमेकांशी घट्ट बांधले गेले आहेत. एका विदग्ध, तरल सामाजिक जाणीवेने संपृक्त अशा व्यक्तिमत्त्वाच्या परीसस्पर्शाने अभिमंत्रित झालेल्या शब्दकळेचा आणि भावसमृद्धीचा हा आविष्कार वाचकाशी सहजपणे सूर जुळवतो. संवाद साधतो.

प्रा. शैला द्वारकादास लोहिया या पूर्वाश्रमीच्या शैला परांजपे. धुळे येथील समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते ॲड. शंकरराव परांजपे आणि सौ. शकुंतला परांजपे यांच्या कन्या. लहानपणापासून घरात राष्ट्रसेवादलाचे संस्कार. राष्ट्रसेवादल कलापथकाचे कार्यक्रमही त्या काळात जोरात चालत. त्या

निमित्ताने वसंत बापट, सुधाताई वर्दे, शाहीर लीलाधर हेगडे, निळू फुले, राम नगरकर, इंदू लेले यांचे खानदेशातले दौरे होत, तेव्हा ॲड. परांजप्यांचे घर हे त्यांच्या अतिथ्यात कसलीही कसर राहू देत नसे. साने गुरुजी नाथ पै, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, आचार्य केळकर, मधु दंडवते, भाऊसाहेब रानडे, ग. प्र. प्रधान, भाई वैद्य, यदुनाथ थत्ते, मधु लिमये, राष्ट्र सेवादलाचे डॉ. अंबिके, श्याम पटवर्धन यांचा खानदेशातला दौरा ॲड. परांजपे यांच्या घरापासूनच सुरू होई. परांजपे वकील होते. वकिली करीत, परंतु वकिली हा फावल्या वेळातला उद्योग असा त्यांचा जणू खाक्या होता. समाजवादी पक्ष, राष्ट्र सेवादल, कलापथक, विविध चळवळी, स्थानिक प्रश्नांवरची आंदोलने, महिला सदन, अडल्या-नडल्यांना सर्व प्रकारचे सहाय्य यातच परांजपे दांपत्य दंग असे. त्यामुळे त्यांचे घर हे सामाजिक पाहुण्यांनी बहरलेले असे आणि कार्यकर्त्यांच्या अनौपचारिक गाठीभेटींची तेथे वर्दळ असे. नवनव्या आंदोलनउपक्रमांच्या तपशीलवार योजनांवर येथेच अंतिम हात फिरे.

या वातावरणात वाढलेल्या प्रकाश व शैला या भावंडांवर सामाजिक आणि कलात्मक जाणीवांचे संस्कार लहानपणापासूनच होणे स्वाभाविक होते.

'शकुंतलाबाईंना त्रास देणारा एकुलता एक डिंकाचा लाडू,' अशा छोट्या शैलाला कलापथकाच्या तालमीतले मुलींचे दमदार पदन्यास, तालाचा धुंद ठेका, लीलाधरचा खडा शाहिरी आवाज ऐकून आपणही गावे, नाचावे असे वाटावे यात नवल कसले ? आईनेही दहा वर्षाच्या शैलाला श्रीपादशास्त्रींकडे गाणे शिकायला पाठवले. आवाज चांगला होता. संगीत विशारदपर्यंत मजल गाठली. पण गायक म्हणून गाणे आत्मसात करण्याबाबत मात्र उत्साह दाखवला नाही, असे त्या स्वत:च म्हणतात. पुढे राष्ट्रसेवादल कलापथकात मात्र त्यांनी भाग घेतला.

महाविद्यालयात असतानाच त्यांनी लेखन सुरू केले. आपल्या मनातले भाव प्रकट करण्यासाठी कविता आणि ललित लेख यांचा आश्रय घेतला. १९६०-६१ मध्ये मी एस.एम. जोशी यांच्या संपादनाखाली निघणाऱ्या दैनिक लोकमित्रच्या रविवार पुरवणीचे काम पाहत होतो. शैला परांजपे यांनी कवितांबरोबर पाठवलेल्या पत्रात 'कॉलेजात शिकणाऱ्या मुलीच्या या कवितांना न वाचताच केराची टोपली दाखवू नका.' अशा आशयाचा काही मजकूर होता. त्याचे उत्तर पाठवताना मी म्हटले : चांगल्या साहित्याच्या शोधात संपादक असतात. तेव्हा संपादक न वाचताच नव्या लेखकांच्या लिखाणाला केराची टोपली दाखवतात असा चुकीचा समज बाळगण्यचे कारण नाही. त्या पत्राचे उत्तर आले. नव्या कविताही आल्या. लोकमित्रमध्ये त्यातील काही कविता प्रसिद्ध झाल्या. पुढे महाराष्ट्र टाइम्समध्येही मी रविवार पुरवणीचे

काम पाहत असताना, शैलाताईचे काही ललित लेख प्रसिद्ध केले.

त्यांच्या लेखनाची शैली काव्यात्म होती. इंदिरा संतांच्या कविता, दुर्गा भागवतांचे ऋतुचक्र, पाडगावकर-बापट यांचे काव्य यांचा प्रभाव त्या लेखनात जाणवत होता. कल्पनांचा पिसारा, प्रतिमांचा पसारा, खळाळता उत्साह, चैतन्याचा प्रवाह त्यामधून जाणवत होता.

पुढे डॉ. द्वारकादास लोहिया यांच्याशी प्रेमविवाह करून त्या सौ. शैला लोहिया झाल्या. अंबाजोगाईला स्थायिक होऊन महाविद्यालयात अध्यापन करू लागल्या. पतीपत्नी दोघेही सामाजिक बांधिलकीच्या भावनेने समर्पण वृत्तीने विविध उपक्रमांचे आयोजन करीत राहिले. मानव लोक व मनस्विनी या संस्थांद्वारे त्यांनी अंबाजोगाई परिसरातील परित्यक्तांना आधार दिला; गरीब मुलांना शिक्षणाच्या सुविधा निर्माण करून दिल्या. अवतीभवतीच्या ग्रामीण क्षेत्रात नियमित वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी योजना आखल्या. त्याचबरोबर राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरही महिला बालकल्याण कार्याशी संपर्क ठेवून सतत वैचारिक व सामाजिक भूमिका अद्ययावत राहावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. अंबाजोगाईला जाऊन त्यांच्या कार्याची झलक पाहण्याचा योगही मला आला. त्यांच्या कार्याचा आंतरराष्ट्रीय पातळीवरही गौरव झाला. आंतरराष्ट्रीय महिला परिषदांच्या निमित्ताने परदेशांचे दौरेही झाले. आत्मशोध, आत्मचिंतन अखंड चालू राहिले. आणीबाणीच्या काळात डॉ. द्वारकादास लोहिया यांना कारावास घडला.

राष्ट्रसेवादलाच्या व कलापथकाच्या माध्यमातून समूह जीवनाची सर्वस्पर्शी अनुभूती संवेदनाक्षम वयातच खोलवर रुजल्याने सामाजिक न्याय, समान संधी, सर्वधर्मसमभाव, स्त्रीपुरुष समानता, लोकशाही समाजवाद, राष्ट्राभिमान, श्रमप्रतिष्ठा यांच्याविषयीचे भावनात्मक अधिष्ठान पक्के झाले आणि सांस्कृतिक संक्रमण तळागाळापर्यंत पोचवण्यातले थ्रिलही जाणवले. ''कलापथकाने आमच्या स्वप्नांना पाय दिले आणि सहजीवनाचा पाठ गिरवतानाच जीवनसाथी निवडण्यासही प्रोत्साहन दिले.'' तृणमूल कार्यकर्ता (ग्रास रूट वर्कर) लोकांचा सहभाग (पीपल्स पार्टिसिपेशन) वगैरे कल्पना सेवादलाच्या माध्यमातून फार आधीपासून प्रत्यक्षात आल्या होत्या. त्याच जोडीला साहित्याच्या अभ्यासामुळे एकूण जीवनाकडे आणि विशेषत: स्त्रियांच्या जीवनाकडे बारकाईने पाहून, त्यांच्या व्यथावेदनांचा वेध घेण्याचेही वळण मनाला आपोआप लाभले. बेशरमीची झाडे, उमलतीचे रंग, फुंकर हे या पुस्तकातील लेख त्याची साक्ष देतात.

शिक्षण अर्धवट सोडलेल्या मुलींचे एक शिबिर उदगीरला आंतरराष्ट्रीय बालिका वर्षानिमित्त घेतले जाते. त्यासाठी धुळे परिसरातील काही मुलींना शैलाताई घेऊन जातात. जीपमध्ये त्यांच्याशी गप्पा मारतात. त्यातून त्या त्या

मुलीच्या घरच्या परिस्थितीचीही माहिती उलगडत जाते. हेमाच्या घरची स्थिती इतकी गरीबीची की पाटीपुस्तकासाठीही तिला पैसे मिळत नाहीत. तशात मास्तर मारकुटे. पाळी सुरू झाल्याने मंगूची शाळा सुटते. सावत्र बाप, आई कामाला जाणारी, त्यामुळे मुलांकडे घरी कुणीतरी पहायला हवे म्हणून अलकाची शाळा बंद. वर्गातल्या राजूचे प्रेमपत्र आले म्हणून सरोजचे नाव शाळेतून काढले जाते.

अशा या कहाण्यांतून सामाजिक वास्तवाचा एक विदारक पट उभा राहतो. नकुशा हा चित्रपट पाहताना श्रीमंताघरच्या मोनिकाच्या मनातली अस्वस्थतेची भावना उसळून डोके वर काढते. या चित्रपटात अनेक मुलींच्या नंतर जन्माला आलेल्या आणि आईवडिलांना नकोशा वाटणाऱ्या मुलीचे जीवन दाखविले आहे. ते पाहून मोनिकाला जाणवते की, अरे मी तर खूपच सुखी आहे. नशीबवान आहे. मला हवे ते सहजी घरी मिळते. ... या मुलीला किती कष्टाने जगावे लागते. हा एक सामाजिक मानसिक धक्काच असतो आणि तो तिला वास्तव जगाचे भान देतो. घरात मुलगी होणे हे अनेक कुटुंबात आजही अपराधीपणाचे ठरते. मुलींची हेळसांड होते.

शैलाताई स्त्रियांच्या जीवनातल्या अशा अनेक दुखऱ्या भागांकडे लक्ष वेधतात. सुधारक मुस्लिम कुटुंबात वाढलेल्या मोहसिनाला बी.ए. बी.एड. झाल्यावर शिक्षिकेची नोकरी मिळते. नवरा मुंबईत इंजिनियर. मूलतत्त्ववाद्यांच्या विचारांची लाट आल्यावर सासरा तिला सांगतो : आजसे बहू बुर्का पहनके कॉलेज जाएगी. ती नाइलाजाने रस्त्यातून गोषा घालून जाते. तिचाच आदर्श ठेवून वर्गातल्या मुस्लिम मुलीही गोषा घालून येऊ लागतात. तिला भयंकर दु:ख होते. आपण पराभूत झालो याची टोचणी तिला वाटते. ती शैलाताईंना म्हणते, "मॅडम, माझं बुर्का पहेननं पाहून माझ्या कॉलेजातल्या माझ्या जमातीच्या मुलीही आता बुर्का पहेलू लागल्या आहेत. त्यांच्या डोळ्यात माझ्यासाठी प्रश्न उभे आहेत. त्यांचं दु:ख मला खूप बोचते."

तिचे सुधारक मनाचे वडीलही तिला सासरशी जुळवून घ्यायला सांगतात तेव्हा ती अगदीच हताश होते.

उर्मिलाचा नवरा क्लासवन ऑफिसर. हौशी, रंगेल. प्रणयाचे रंग गडद होण्यासाठी मद्य आवश्यकच असे मानणारा. बाळंतपणासाठी माहेरी गेलेली उर्मिला म्हणते, "तीन महिन्याच्या गौतमीला घेऊन घरी आले तेव्हा लक्षात आलं की नवरा दारूच्या कवेत गेलाय आणि दारू घेतली की त्याला बाई लागतेच. मग ती कुणीही असली तरी चालते. मीही त्याच्या दृष्टीने बाईच होते. पण आई झाल्यामुळे माझ्यातले बाईपण हरवत चालले होते. त्याला जे हवं असे ते मला देता येत नसे. मग काय वाट्टेल ते ! ..." ही उर्मिलेची व्यथा आहे. तिला एकटे एकटे वाटते. गौतमीला भावंड असावे- पण ते

देण्याची ताकद या दारूमुळे संपली आहे हे वास्तव लक्षात घेऊन उर्मिला म्हणते,

''माझ्या घरात परदेशी टेपरेकॉर्डर आहे, टेप आहे, मिक्सर आहे, फ्रीज आहे. खूप काही आहे... मीही आहे.''

फ्रीजवर ठेवलेला चकचकीत प्लॅस्टिकचा फ्लॉवर पॉट बनून इथेच राहू का ? असा प्रश्न तिला आपल्या मैत्रिणीचा सुखी संसार पाहून पडतो. स्वत:च्या अस्तित्वाचा शोध तिला घ्यायचा आहे. हवं असलेलं घर आणि हवी असलेली पायाखालची जमीन मिळवण्यासाठी ती मैत्रिणीकडे मदत मागते आहे.

केरळमधल्या राजलक्ष्मीची समस्या वेगळीच आहे. तिचे वडील मुंबईला रेल्वेत नोकरीला. तिची आई त्रिवेंद्रमला नर्स असताना त्यांचा आंतरजातीय विवाह झाला. वडिलांनी राजलक्ष्मी व तिची आई यांची राहण्याची व्यवस्था धुळे येथे केली. वडील अचानक वारले. या मायलेकींना धुळे सोडून केरळमध्ये जाणे भाग पडले. तेथे त्या दोघी सासरच्या अपरिचित वातावरणात कशा जगात असतील असा प्रश्न राजलक्ष्मीची मैत्रीण म्हणून लेखिकेला पडतो.

ठाकर जमातीत विशीतल्या शोभाचा नवरा पन्नाशीतला. तोही क्लीनर, दीड वर्षानं तिला मूल झाल्यावर दुसऱ्या बाईला घरात आणतो. कोर्टात तिची केस स्त्री हक्क समिती लढवायचे ठरवते.

''....हम औरता तो क्या, बेशरमीकी झाड हां, किती बी तोडा किती बी कापा. अमाले पानं फुटायचीच.'' असं म्हणणाऱ्या सकीनाचा बिनतोड युक्तिवाद निरुत्तर करणारा आहे.

''भाबी, माँ के घरमें कौन है अपना ? इनके पल्लों मे डाल दिया है. इधरीच ठीक है. आन जाणार कुठं मी ? मी मेले तरी यानला बायकू भेटेल. पन पोरानला माय मिळेल का ? तुम्ही एवढ्या शिकला. भाईर जाता. भासनं देता. पण दादा वसकतातच ना तुमच्या अंगावर?''

ग्रामीण स्त्रियांच्या समस्यांना हे असे अनेक पदर आहेत. ग्रामीण स्त्री ही अनेक आघाड्यांवर लढत असते. चूल सारवण, लेकरांच संगोपन, सडाअंगण, खाणंपिणं, जनावरांची देखभाल, गवऱ्या थापणं, शेतातली कामं, पेरणी-सुगीची धावाधाव, लाकूडफाटा आणणं, तुराट्या रचून ठेवणं, डाळीसाळी करणं, शेंगा फोडणं, बैलामागं उभं राहणं, शेतात दारं धरणं, बाजारात माळवं विकायला जाणं, मळणी उफणणी करणं. फाटक्या पदराचा आडोसा लेकरांना करून सावली देणाऱ्या, त्यांना वाढवणाऱ्या या बाया ही सगळी यातायात करताना स्वत: निष्पर्ण वृक्षासारख्या वठून जरठून जातात, असे सांगून शैलाताई प्रश्न करतात : जीवनात माणूस म्हणून जगताना, मनात उगवलेल्या इच्छा, आंकाक्षा, स्वप्नं इतक्या निर्मळपणे फेकून द्यायला कोणी शिकवलं यांना ?

धर्मानं ? समाजानं ? की त्यांच्यातल्या मातृत्वानं ?

स्त्रीजीवनाच्या अशा वेगवेगळ्या अंगांना व समस्यांना प्रत्यक्ष स्त्रियांच्याच कहाण्यांद्वारे शैलाताई स्पर्श करतात. त्या समस्यांच्या जटिलतेची जाणीव देतात. आपली पारंपरिक मानसिकता, सामाजिक व आर्थिक चौकटीची जाचकता आणि एकूणच परिस्थितीची अपरिहार्यता यांच्या प्रचंड दबावाखाली आजच्या महिलांना जगावे लागत आहे आणि शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, स्वातंत्र्य या संभाव्य उत्तरांच्या मर्यादाही ध्यानी येत आहेत.

शैला लोहिया यांच्या सामाजिक जाणिवा प्रखर आहेत, त्यांच्या काव्यात्म संवेदनाक्षमतेची तरलताही वेधक आहे. निसर्गाच्या, ऋतूचक्राच्या विविध विभ्रमांनी त्या अंतर्बाह्य प्रभावित होतात, भावनात्मक आणि वाड्.मयीन पारंपरिक संदर्भांनी समृद्ध अशा वसंत, हेमंत, शिशिर, वर्षा इत्यादी ऋतूंचा तसेच आषाढ, श्रावण, भाद्रपद आश्विन वगैरे महिन्यांतील सणउत्सवांचा वेध घेताना त्यांची शब्दकळाही बहरून येते.

''गर्द सावळ्या आभाळाची खिल्लारे सैरावैरा भटकू लागतात, तसतशा रानातल्या जांभळी तुरटगोड गरांनी गदरायला लागतात.'' (जांभूळ झाडाखाली, पृष्ठ ५७)

आश्विन थंडीबरोबर रानातल्या तुरीवर पिवळा फुलोरा लागतो. नवी साळ तयार होत आलेली असते. अशा वेळी येणारा हा भुलाबाईचा उत्सव म्हणजे जणू भूमीच्या उर्वरा शक्तीच्या, तिच्यातील सर्जनशक्तीच्या सत्काराचे प्रतीकच ! ( हा भाद्रपदाचा महिना, पृष्ठ ७२)

उन्हाचे बाभूळ आता चांगलेच फोफावलंय. अशी लखलखीत उन्हे की पहाता क्षणी नजर भाजून निघावी. अशा या उन्हात दारासमोरच्या गुलमोहराचे लालचुटूक छप्पर नजरेला थोडा थंडावा देते. एक थंडगार गंधदार झुळूक घामेजल्या अंगावर फुंकर घालून जाते. मान्सून ढगाचे गडद सावळे छायाचित्रच समोर दिसले आणि माझ्या नाकाला मातीचा खमंग गंध - आकाश आणि माती यांच्या पहिल्या भेटीचा मादक गंध हुळहुळून गेला. (आंब्याच्या कोयीवरून घसरताना, पृष्ठ ७३)

मृगाच्या स्पर्शांनी या काटेरी वनाला जाग येते. बोचऱ्या काट्यातून तरल चैतन्याचे पाट वाहू लागतात. त्या उन्मादाच्या भरात, गंधवती धरेच्या कणाकणातला सुगंधरस पिऊन केवडा बेहोष होतो. सरता ज्येष्ठ आणि आषाढाच्या ऐनातले ओढाळ पाणी पिऊन सुखावलेल्या पानांच्या मधोमध अपार गंधाची कळी आकारू लागते. पिवळ्याधमक सोनसळी रंगाचे झगमगीत सोनकणीस डोकावू लागते. त्या गर्भ रेशमी दडस पानांच्या सातपदरी पडद्यांमधून फुटणाऱ्या गंधलाटा कणाकणातून लहरू लागतात. केवडा म्हटला की घनदाट गंधाची लहर. सुरेखच, पिवळ्या रंगाची टफेटा कापडाच्या

पोताची तरतरीत पाने आणि पानांच्या दुहेरी कडांनी डोकावणारे तीक्ष्ण काटे आठवतात. (सोनकणीस पृष्ठे ८२)

आकाशमोगरी. मोगरीसारखी राजहंसी. फुलांचा बांधा उभार. पण टोकावर घेरदार कळी. मोगरीच्या कळीसारखी कबुतरी, घुमारलेली. रंगही शुभ्र, किंचित लालच झाक. पाकळ्या रेखीव, एकाला एक जोडलेल्या. दाटीवाटी नाही. जिथल्या तिथे फुललेल्या. पाकळ्या नितळ, तरीही काश्मिरी गालिच्यासारख्या दडस. दोन बोटात धरून एकेक पाकळी चिरमळायची आणि फू फू करून फुगवायची. छान फुगा फुगतो. लगेच कुणाच्या तरी कपाळावर टचकन फोडायचा. बुचाच्या फुलांतला मध देठाच्या पुंगळीतून चोखताना मज्जा यायची. लांबच लांब देठातून सुक सुक आवाज करीत मध ओढायचा. जेमतेम जिभेवर उतरेल इतकाच थेंब. पण स्ट्रॉमधून कोकाकोला पिण्यापेक्षाही त्याची लज्जत न्यारीच. (आकाशमोगरी पृष्ठ १६)

अशी ऐंद्रिय संवेदनांना कुरवाळणारी चित्रदर्शी काव्यात्म वर्णने करताना शैला लोहिया यांच्या जातिवंत निरीक्षणशक्तीची आणि तरल शब्दकळेची जणू जुगलबंदीच चालते. या निरीक्षणांना लोकसाहित्याच्या सांस्कृतिक संदर्भाची जोड मिळते आणि त्याची आवाहकता अधिकच व्यापक होत जाते. ''विरहवेदनेचे विखारी अमृत मी प्याले-उर्मिलेच्या थरथरत्या हातांनी! ते पिताना ठसका लागला तेव्हा पाठीवरून हात फिरले वनवासी सीतामाईचे. सुरकुतलेले शुष्क हात. भोवंडून उडू पहाणाऱ्या जीवाला घट्ट सावरून धरले मीरेच्या एकतारीने. पुराचे पाणी वाहून जावे तशी वाहून जाणारी वर्षे. पण मी मात्र तशीच. एकाकी नुस्ती वाट पहाणारी.'' (मी युगविरहिणी) (पृष्ठ १०२) यासारख्या आत्मनिवेदनपर क्षणी, आणीबाणीच्या काळात गजाआड असणाऱ्या पतीच्या आठवणीने व्याकुळ झालेल्या पत्नीला लग्नाच्या वाढदिवशी आपल्यासारख्याच विरहिणीच्या रूपातल्या उर्मिला, सीता, मीरा दिसतात; आणि आपल्या व्यथावेदनेत त्यांचीच रूपे दिसतात. अशा सांस्कृतिक आणि वाङ्मयीन एकतानतेमुळे या भावभावनांचे आवाहन केवळ व्यक्तिगत न राहता, विश्वात्मक होते आणि प्रत्येक विरहिणीचे ते प्रतिनिधित्व करते.

अनेक हृद्य व आकर्षक कल्पना आणि भाव या लेखांमधून सहजपणे सूत्रात्मक अल्पाक्षरी शैलीत प्रकट होतात, आणि आपल्या मनाच्या तारांना झंकारत राहतात.

''अधमुऱ्या गोल दह्यासारखं आमचं वय होतं.''

''जाळीदार पडद्याआडून पल्याडचे भास जाणवावेत तसे सासर-माहेरचे वेगळेपण आम्हाला जाणवे.''

''आषाढाचं नवेपण दरवर्षी नव्या तऱ्हेनं साजरं होई. यक्षपत्नीच्या वेदनांचे मूक वळ आज माझ्या तनामनावर उमटले आहेत. भक्तीचा नवा प्रत्यय

प्रत्येक क्षणी देणारा तू आज दू S र गजाआड बंदिस्त... शब्द माझे..पण मनाची उलघाल तुझीच.. माझ्या प्राणातला कोमल गंधार तू कोवळ्या शब्दांनी जपला आहेस. तीव्र मध्यमाचे कणखर स्वरही माझेच प्राणांना शोष पडला. तरी विझू देणार नाही मी ते!''(६६).

त्याचबरोबर सामाजिक पातळीवर एकीकडे होणारी जागृती आणि दुसरीकडे पारंपरिक मानसिकता यांच्यात चाललेल्या संघर्षाचे व सामंजस्याचेही दर्शन व्यक्तिचित्रांमधून सहजपणे समोर येते.

''बदलल्या काळासोबत मोकळ्या आभाळाखाली येण्याऐवजी बाई अधिकच गुदमरत चालली आहे.'' (५९).

''मी आई झाल्यामुळे माझ्यातले बाईपण हरवत चालले होते.'' (५०).

''नवे विचार मनाला पटतात पण वाटतं. उरलेल्या चार दिवसांसाठी कशाला नवा रस्ता धरू?'' (३४)

''पोटची लेक दूर राहिली. तू पोटची लेक होऊन सेवा करतीस. लेकीचा बाट माईला कसा गं व्हईल? आपन मानसासारखी मानसं. हातापाया सारखी. देवानं काहीतरी मागं लावलंय म्हणून जातपात पाळायची. आता देवाच्या दरात बसलेली माणसं आम्ही. आम्हांला कसला आलाय विटाळ नि चांडाळ?'' (३९)

''शिक्षण वाया जात नाही. शिकली तर नवराबी शिकलेला मिळेल. नवऱ्यानं पीठ आणलं तर बाईनं त्यात चिमूटभर मीठ घालावं. म्हंजी भाकर चवदार हुती.''

शैला लोहिया यांच्या व्यक्तिमत्त्वातील काव्यात्म संवेदनाशीलता आणि सामाजिक समस्यांबद्दलची त्यांची जाण या दोहोंचा सशक्त मेळ घालणारा हा ललित लेखसंग्रह आहे. सामाजिक क्षेत्रात केवळ विचारकल्पना मांडूनच त्या थांबलेल्या नाहीत, त्या विचारकल्पनांना पतीच्या सहकार्याने गेली तीसपस्तीस वर्षे कृतीतही आणत आहेत. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्या कामाची दखल घेतली गेली आहे. त्यामुळे या लेखांतील शब्दाशब्दामागे एक प्रकारचा ठाम विश्वास आहे. स्नेहभाव आहे. वाचकांनाही त्याचे आकर्षण वाटेल यात शंका नाही.

- शंकर सारडा

# वाहत्या वाऱ्यासंगे ...

वाहत्या वाऱ्यासंगे धावणारे मन प्रत्येकाच्या ओंजळीत असतेच, परिस्थिती, पंथ, धर्म, लिंग, देश, जात आदींचे बांध, भिंती घालून आम्ही त्याला पार कोंदटून टाकतो. त्या भिंतींचीही मग सवय होऊन जाते आणि अंधारच उजेड वाटू लागतो. बे एकं बे, बे दुणे चारचा पाढा म्हणण्यात बे दाहे वीसच्या अखेरच्या मुक्कामावर कधी येतो ते कळत नाही. भिरभिरत येऊन माथ्यावर पडणारे लिंबाचे पान, डोळे मिचकावित खुणावणारी फुले, रस्त्यावरून जाणारी तऱ्हेतऱ्हेची माणसे... असे कितीतरी. या साऱ्यांकडे आम्ही पाहतो रोबोटच्या नजरेने. यंत्रमानवाच्या निरंग नजरेने.

पण कधी कधी, अगदी अचानकपणे या भिंतीलाही एखादी चीर पडते. निमित्त काही का असेना पण चिरीतून उजेडाची तिरीप थेट आता येते. नि मन त्या इवल्याशा फटीतून निसटते ते थेट आभाळापर्यंत जाऊन पोचते. वाऱ्याचे बोट धरून, घरादारात... पानाफुलात ... डोंगरदऱ्यात... नदीतळ्यात अगदी मन मानेल तसे मुक्तपणे भटकत रहाते. अगदी तनामनातही घुसते. इथे ... तिथे डोकावत अनुभवांचे रंगविभोर क्षण ओंजळीत साठवून ठेवते.

आणि मग कधी कधी, शब्दांना किरणांचे मृद्गंध लखडून जातात.

... मन केवढं केवढं  
जसा खाकसाचा दाना  
मन एवढं एवढं  
त्यात आभाय माईना ...

दिवसरात्र मातीत घाम गाळून संसार सावरणाऱ्या मनातलं गुज जात्याच्या कानात मोकळं करणाऱ्या, जगाच्या दृष्टीने अडाणी-निरक्षर असणाऱ्या बहिणाबाईच्या शब्दात उगवाईच्या दिशा रुणझुणू लागतात. आभाळ, घरटं, जातं, तवा यांनाही अमरत्व लाभते.

*तर अशी ही उजेडाची चिरी*

*आज काळ पुढे चाललाय. बंद घरांच्या खिडक्या आता उघडू लागल्या आहेत. संवादासाठी शिड्या व पायऱ्याही नसलेली चार मजली चिरेबंदी इमारत आता हलू लागलीय. तिथेही जिने, पायऱ्या उगवायला लागल्या आहेत. आणि अनेकांची मने वाऱ्याचा शेव धरून, अवतीभवती उघड्या डोळ्यांनी कुतुहलाने पाहू लागली आहेत. सगळयांच्या शब्दांना उगवाईचा मृद्‌गंध लाभत नाही.*

*... मज नकळत कळते कळते*

*गंधातून गूढ उकलते...*

*भवताली सतत लहरणाऱ्या जीवनाचे गूढ नकळत कळण्याची वा जाणण्याची तरलता सर्वांनाच नाही लाभत. पण म्हणून काय झालं ? वाहत्या वाऱ्यासंगे सैरभैर उनाडणाऱ्या मनाने ओंजळीत घट्ट पकडून ठेवलेले गहिरे क्षण मोकळया आभाळाखाली मांडून ठेवावेसे वाटतातच! आणि पुनःपुन्हा अनुभवावेसे वाटतात. आपल्या हातावर ठेवावेसे वाटतात.*

*राजस्थानात रांगोळीला 'मांडणा' म्हणतात. 'मांडणा' जणू मनातून उमटलेल्या रेषांची लय पकडण्याचा प्रयत्न.*

*तर अशा काही क्षणांचा हा मांडणा. 'वाहत्या वाऱ्यासंगे.' तसाच हा एक प्रयत्न, वाहत्या वाऱ्यासंगे, उनाडणाऱ्या मनाने अनुभवलेल्या लयीचा, रेषांचा, मांडणा रेखाटण्याचा!*

*प्रा. शैला लोहिया*

# संस्कार सेवादलाचा

खूप खूप वर्षापूर्वीची पहाट. मंद निळ्या रंगाचा झुंजुरका उजेड. झाडांचे डोळे अजून उघडायचे आहेत. अशावेळी दुरून जवळ येत जाणारा ठोस आणि स्पष्ट आवाज, जोडीला पावलांची दमदार लय.

*कदम कदम बढाये जा*
*खुशीके गीत गाये जा ...*

अर्धमिटल्या झोपेतून मी झडझडून जागी होई आणि खिडकीच्या जाळीला नाक टेकवून बाहेर पहात राही. गाण्याचे सूर जसजसे जवळ येत, तशी जाळीच्या बेचकीत छोटे छोटे पंजे अडकवून खिडकीतून डोके बाहेर काढून ते स्वर नजरेआड जाईस्तो पाहत राही. पांढरेशुभ्र सदरे आणि खाकी विजारी घातलेला तो गाता जत्था. त्यात दशरथ तात्या, आई आणि पपा असत. पुढ्यात नेनेकाका असायचे. त्यांचे ताठ लयदार चालणे, हनुवटीच्या सरळ रेषेतून व्यक्त होणारा आत्मविश्वास. मी जेमतेम चारपाच वर्षांची. राष्ट्रसेवादलाच्या प्रभातशाखेच्या प्रभातफेरीचे ते गोंदवण, माझ्यावरचा पहिला कळता संस्कार.

चढती दुपार, खानदेशी उन्हाळ्याची. डॉक्टर अष्टपुत्रेबाईंच्या घराच्या मागच्या माडीतला तिसरा मजला. तिथे सेवादलाचा बौद्धिक वर्ग असे. आचार्य केळकर, मधुभाई लिमये किंवा आणखी कोणी बौद्धिक घेताहेत. पेशंटस् संपवून कधीमधी बाईही तिथे येई. आईपण असे. मी नि वसू जिन्याच्या शेवटच्या पायरीवरून आत डोकावून पाहतोय. पोटात भूक उसळलेली. पण बाईसमोर बोलायची हिंमत नाही. साऱ्यांचे नितान्त गंभीर चेहरे. मग हलक्या पावलांनी माडी उतरून जाणे ...

तो दिवस स्वच्छ आठवतोय. संध्याकाळची वेळ, जिनिंग मिलच्या पटांगणात शाखा भरलेली. इतक्यात कोणीतरी मुलगा धावत आला. त्याने शाखानायकाच्या कानात काहीतरी सांगितले. मुली रडताहेत. राष्ट्रपिता महात्माजींच्या निर्घृण खुनाची वार्ता होती ती. सगळे भराभरा पांगले. बाईचे घर दोन मिनिटांच्या अंतरावर होते. पण रस्ता पार होईना. तिच्या घरासमोर गर्दी. त्या भयानक बातमीने दशरथ तात्या बेशुद्ध पडले होते.



Library
...College of Social Science
...431517. Dist. Beed

मग सगळीकडे गोंधळ. वाईंच्या घरासमोर चिडलेल्या लोकांचा जमाव कुणा एकाचे घर पेटवायला आलेला. ही वाई तरतरा त्या घरासमोर ढालीगारखी उभी राहिली. घर वाचलं.

एखादी रविवारची सकाळ. सार्वजनिक संडास सफाईचा कार्यक्रम सेवादलाने ठरवलेला. सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा असलेली माणसे अशा कार्यक्रमात पुढे असत. आईपपांचे शेपूट म्हणून मीही जाई. सर्व सैनिक मन लावून सफाई करीत. मैल्यात बुडवलेले हात मला आयुष्यभराची समृद्धी देऊन गेले.

एखाद्या सकाळी टपऱ्या स्टेशनर्वगनमधून नाहीतर टांग्यातून वसंत वापट. सुधाताई वर्दे, आवाबेन, लीलाधर हेगडे आणि मुगी, श्यामी अशा मुली उतरत. शहादा वा नंदुबार असे कलापथकाचे कार्यक्रम असत. ही मंडळी आली की आई तर खूश असेच, पण मीही वहरून जायची. पुढच्या हॉलमध्ये त्यांच्या तालमी चालत. मुलींचे लवलवून नाचणे, तालाचा धुंद ठेका, लीलाधरचा खडा आवाज ... मला मनोमन वाटे, आपणही गावे, मनमुक्त नाचावे. पण बहुधा सगळ्यांनाच वाटे की मी म्हणजे शकुंतलाबाईंना त्रास देणारा एकुलता एक डिंकाचा लाडू. श्यामीमुगीच्या भाग्याकडे मी आसुसल्या नजरेने पाही. कलापथक हे माझ्या लेखी एक रंगीत स्वप्न होते.

असे शेकडो प्रसंग आज डोळ्यासमोर आकारताहेत. आई-पपांनी सेवादल शाखेवर जाण्यासाठी कधीही सक्ती केली नाही. आईला मात्र मनोमन वाटे की मी रोज शाखेत जावे. ती अनेक वर्षे शहरप्रमुख होती. मी हट्ट केला वा मूर्खासारखी वागले की ती पाठीत धपाटे घाली. चिमटे चारोळ्या देई. अशा वेळी मी संतापून म्हणे, "समितीत जाईन!"

आणि एकदा खरंच गेले. पण गुदमरायला झालं. पुन्हा फिरकले नाही. एवढं खरं की मग मात्र सेवादलाची झाले ती माझ्या निर्णयाने. माझा ओढा शाखेपेक्षा कलापथकाकडे जास्त असायचा आणि इंदूताई लेले अशी शिस्तीची की ती शाखेत न येणाऱ्या मुलींना नाचात घेत नसे. सेवादलात वशिला नसेच. बाईंची मुलगी म्हणून सूट नव्हती. तेव्हा शाखेचा भोज्ञा अधूनमधून शिवावाच लागे.

इंदूचा तो तेजदार लखलखीत आवाज. जणू आरपार कापीत जाई. ती पोवाडा म्हणायला लागली की नवरसांचे शोभादर्शक जणू तिच्या कातीव गोऱ्या चेहऱ्यावर भिरभिरायचे. महात्माजींच्या पोवाड्यातला त्यांच्या खुनाचा प्रसंग. प्रेक्षकांचे डोळे भरून येत, हुंदका गळ्यात दाटे.

*स्वातंत्र्य सूर्य उगवला*
*अहो पूर्वेला, हिंद देशाला ...*
*सोन्याचा दिवस अहा आला ऽऽ*

या पोवाड्याची दाणेदार तान कानांत आजही स्वच्छ जागी आहे. वसंत वापटांच्या शव्दांवर लीलाधर हेगडेंनी स्वरांची किमया चढवली हे खरेच, पण वापटांच्या शव्दातले वेभान सामर्थ्य लहान वयात असंख्य खानदेशी सैनिकांपर्यंत पोचवले इंदू लेलेने! अन्नदाता, विजली, भारतभूमी नमन. अशी नृत्ये, असंख्य राष्ट्रीय गीते, खुला स्वर आणि मनमोकळा लयदार नाच. हो नाचच. नृत्य म्हटले की वंधनाची अदृश्य रेखा असतेच, पण आदिम जीवनात निसर्गाशी दोस्ती जमविण्यासाठी, मनातला आनंद उधळून देण्यासाठी माणसाने ज्या उत्स्फूर्त आणि स्वयंभू हालचाली केल्या, त्यांचा ताजेपणा सेवादल कलापथकानेच जाणला. विविध प्रकारची लोकनृत्ये, लोकगीते हजारो मुलांना शिकवली. आयुष्यभर अत्तरासारखा जपता यावा असा निरामय आनंद अक्षरशः वाटला.

राष्ट्रसेवादलाने सांस्कृतिक संक्रमण खऱ्या अर्थाने समाजाच्या तळागाळापर्यंत पोचवले. एरवी संगीत, नृत्य, नाट्य या कला मध्यम वा उच्च मध्यमवर्गीयापर्यंत मर्यादित असत. त्यासाठी पैसा खर्च करणे सामान्यांना कुठे परवडणार? पण गावोगावच्या कलापथकांनी सर्व जातीजमातींच्या, सर्व स्तरावरील मुलांना सांस्कृतिक व्यासपीठ दिले.

महाविद्यालयात असताना पुणे शहर कलापथकात काम करायला मिळाले. निळू फुले, रामभाऊ नगरकरांच्या वरोवर मी काम केलंय असे सांगताना मनही लठ्ठमठ्ठ होऊन जाते. महाराष्ट्र दर्शनच्या संचातला एक चिमुकला खिळा मीही होते. समूहजीवनाचा तो शव्दातीत अनुभव. टिंबाटिंबातून रांगोळी तयार होते तसे अनेक प्रसंग .अनुभव. आयुष्याच्या अंगणात उमललेले एक भुईकमळ! लग्नानंतर अंवाजोगाईसारख्या चिमुकल्या गावात आल्यावर आम्ही कलापथक उभे केले. १९६३ ते ७५ सलग तेरा वर्षे गणेशोत्सवात कार्यक्रम केले.

सरत्या आषाढात मनातल्या हलग्या वाजायला लागत. श्रावण कसा संपे कळत नसे. चाळीसपन्नास जणांचा शिस्तवद्ध जत्था. विविध लोकनृत्ये, संगीतिका, राष्ट्रीय गीते, वगनाट्ये कलापथकाने सादर केली. महाराष्ट्र दर्शनच्या धर्तीवर 'मराठवाडा दर्शन' लिहिले. प्रा. रा. द. अरगडे, प्रा. चंद्रकांत भालेराव यांनी नवनवी वगनाट्ये लिहून दिली. शिस्त अशी की नऊ म्हणजे नऊला ढोलकीवर थाप पडायची. डोळ्यासमोर वापटकाकांचा आदर्श असायचा. एकदा अध्यक्षमहोदय उशिरा आले. आमचा कार्यक्रम मात्र वेळेवर चालू झाला. वगातील विनोद दर्जेदार असे. जीवनातील व्यंगावर वोट ठेवणारा, न टोचता, खुदखुदवणारा विनोद. अंतर्मुख करणारा. आमच्या कार्यक्रमांना महिलावर्गाची खचाटून गर्दी होई. प्रेक्षकातून उर्मट शिट्टी आली तर दुसऱ्या क्षणी कार्यक्रम वंद होतो याचा धाक प्रेक्षकांना होता. हजारो प्रेक्षक कार्यक्रम पाहताना शिस्त सोडीत नसत.

प्राध्यापक, वकील, दुकानदार, शिक्षक, चपराशी, डॉक्टर्स, विद्यार्थी, गृहिणी कलापथकाच्या रंगमंचावर काम करीत. जातपात पाळू नका, सर्वधर्मसमभाव पाळावा. आपण सारे भारतीय आहोत वगैरे घोषणा किती अर्थपूर्ण! आम्ही सर्वजण हे सारे शब्द नकळत आपोआप जगत होतो. रामदासाची भूमिका अमर हर्षाव करत असे. तर शास्त्रीबुवांचा ताटा जगन्नाथ जोगी उभा करीत असे. जोशी गुरुजी ढोलकीवर थाप मारीत नि सर्वांच्या अंगावर रोमांच उभे रहात. दवाखान्यातील शस्त्रक्रिया विभागात काम करणारे महिंद्रकर व्हायोलीन वाजवीत. खोगरेगुरुजी नाहीतर शेषरावांची बोटे बाजाच्या पेटीवर फिरू लागली की तो चौकोनी लाकडी टोकळा फुलांच्या डहाळीसारखा मस्त झुलू लागे. दरवळू लागे. सगळे एकमेकांच्या डब्यातले खात. दुपारी चार वाजता ट्रकमधून धावतपळत ट्रॅक्टर वर परभणी. नाहीतर सेलू, गेवराई, जिंतूर वा हिंगोली अशा ठिकाणी पोचायचे. रात्रभर कार्यक्रम करायचा. अंबाजोगाईला पोचेपर्यंत पहाट व्हायची. दोन तासात जो तो कामावर हजर. ही सारी धडपड पैशाची अपेक्षाही न करता केवळ 'स्वान्तः सुखाय.' सेवादलाचे स्पिरिट आपोआप सर्वांच्यात घर करी. पहिल्या वर्षी कलापथकात काम करणाऱ्या कलाकारांची मुले आता शाळाकॉलेजात आहेत. त्यांची सतत तक्रार असते. आम्हाला जो आनंद मिळाला तो आमच्या लेकरांना मिळत नाही. कलापथक पुन्हा सुरू करा.

या कलापथकाने आमच्या स्वप्नांना पाय दिले. सेवादल, अण्णा गुरुजी यांनी जे विचार दिले. त्यांची प्रयोगशाळा म्हणून 'मानवलोक' चा प्रयोग १९८२साली सुरू केला. कलापथकातून, शेकडोंच्या प्रयत्नातून जमलेल्या पैशातून १२५ बाय ८० चा एक जमिनीचा तुकडा खरेदला. त्यावर हा नवा संसार थाटला. या प्रयोगाचे साथीदार सारे सेवादल सैनिकच.

सेवादलाने श्रमाची प्रतिष्ठा, शक्ती मनावर कोरली. लहानपणी अनुभवलेले वाडजईच्या किंवा मोराण्याच्या सेवापथकाचे क्षण आजही आठवणीत आहेत. कुदळ, फावडी, घमेली घेऊन काम करणारे सैनिक, गावातली माणसेही सहभागी होत. दोनचार कुदळी मारून नि एखाद दुसरे टोपले भरून रेशमी तळव्यांवर फोड येत. पण आपलेच खरखरीत हात न्याहाळताना काही वेगळेच वाटे.

> तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून
> उद्या पिकेल सोन्याचं रान ...
> किंवा
> एक तारा, एक तारा, या देशाला एक तारा ...

यासारखी गाणी सेवादल सैनिक गात तेव्हा तो आवाज केवळ ओठातून निघायचा नाही. तो जणू धमन्यातून, आतल्या मनातून निघत असे. आदरणीय एस. एम. जोशी,

पूज्य भाऊ रानडे , डॉक्टर अंबिके , यदुकाका थत्ते , भाई वैद्य, प्रधान मास्तर , श्याम पटवर्धन , सिंधुताई मसूरकर अशी मोठी माणसेही रस्त्यावर येऊन काम करीत . आमच्या ' मानवलोक ' मध्ये दर गुरुवारी श्रमदान असतेच . कार्यवाहापासून सर्वजण मग्न होऊन काम करतात . सावित्री महिला वसतिगृहातील मुलींची अत्यल्प दरात रहाण्याजेवणाची सोय आहे . मात्र रोज एक तास श्रमाचे काम केले पाहिजे हा नियम आहे . एका विद्यार्थिनीला संडास सफाईची लाज वाटे . ते काम करण्यास तिने नकार दिला . पण समूह जीवनाचा भाग म्हणून जगताना तिची तिलाच चूक उमगली . आज ती हे काम मन लावून करते .

अलीकडे सतत मनात येतेच की राष्ट्रसेवादलाने सेवापथक आणि कलापथक या दोन विभागांवर अधिक लक्ष केंद्रित करायला हवे होते . नेमके का आणि कसे हुकले , याचा चिकित्सक जमाखर्च मोठ्या मंडळींनी मांडायला हवा . हे दोनही विभाग तालुका पातळीवर जाणीवपूर्वक उभे करायला हवेत .

सामाजिक न्यायाच्या भूमिकेशी बांधील असणाऱ्या सर्व पक्षांचे आणि संघटनांचे कार्यकर्ते आज खंत व्यक्त करतात . उद्याच्या भवितव्यासाठी राष्ट्र सेवादलाची गरज त्यांना जाणवते . सामाजिक जाणिवा असलेले , स्वयंनिर्णयाचे सामर्थ्य असलेले सुजाण तरुण आज कार्यकर्ते म्हणून मिळत नाहीत . हा स्रोत थांबलाय याचे भान त्यांना आता आलय .

महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजना राबवली जाते . प्राध्यापक त्याच उत्साहाने रस घेणारे असतील तर ठीक , एरवी अनेक ठिकाणी थातुरमातूर काहीतरी केले जाते .

पीपल्स पार्टिसिपेशन , ग्रासरुट वर्कर्स , सस्टेनेबल फार्मिंग , श्रमशक्ती , विमेन्स एमॅन्सिपेशन , वगैरे शब्दांची नाणी आज तेजीत आहेत . पण ही नाणी जेव्हा नव्हती तेव्हा हे सर्व प्रयोग राष्ट्रसेवादलाने केले . नुसते केले नाहीत , तर आग्रहपूर्वक केले .

आज पूज्य भाऊ रानडे नाहीत . मातृप्रतिष्ठा ही गोष्ट त्यांनीच शिकवावी . नाचून थकलेल्या पायांना शास्त्रीय पद्धतीने तेल चोळणारे भाऊ . . . त्यांचे हात आईचे होते . खेड्यातल्या सभेत महिला नसतील तर खवळून आरडाओरडा करीत . शेवटी सरपंचांना म्हातारी माय सभेत आणून बसवावी लागे . महिला असल्याशिवाय भाऊ सभा सुरू होऊ देत नसत . स्त्रियांना झुकते माप देण्याची भूमिका सेवादलाने नेहमीच घेतली . नैतिक विश्वास रुजवला . चाळीस बेचाळीस वर्षांपूर्वी आपल्या किशोरवयीन वा तरुण मुलींना पालक सेवादलात वा कलापथकात विश्वासाने पाठवीत . सहजीवनाचा पाठ गिरवताना काहींनी जीवनसाथीही निवडले . मधु दंडवते-प्रमिलाताई , सदानंद वर्दे -सुधाताई , यदुनाथ थत्ते-जान्हवीताई अशा अनेक जोड्या महाराष्ट्रभर पसरलेल्या . चारदोनांचे सूर कदाचित जमलेही नसतील . शक्यता आहे . पण बहुतेकांच्या जीवनात

आज जो प्रसन्न ताजेपणा आहे ,त्याचे श्रेय सेवादलालाच आहे . सेवादलाने महिलांची वेगळी शाखा काढली नाही . कुठे असली , तरी ती अपवादात्मक . स्त्रिया या समाजाचा महत्त्वाचा घटक आहेत . त्यांच्या आणि पुरुषांच्या माथ्यावरचे आभाळ एक आहे . पायाखालची जमीनही एक आहे . मग स्त्रियांसाठी वेगळी शाखा कशाला ?

स्त्री-पुरुषांनी एकमेकांचे सुजाण सहकारी असायला हवे . जीवनातील सर्व क्षेत्रात सहकारी म्हणून निर्भयपणाने वावरायला हवे . ही सुस्पष्ट भूमिका सेवादलाने जाणतेपणाने घेतली होती . आगरकरांच्या महाराष्ट्रात मुलींचे हाल त्यामानाने किंचित कमी . मोकळेपणाही कांकणभर अधिक . त्यामुळे आम्ही पोरी विनधास्त वावरत असू . परंतु विहार वा उत्तरप्रदेश वगैरे प्रांतातील कलापथक दौऱ्याच्या वेळी कधी कधी ताप होई . अशा वेळी मात्र महाराष्ट्राचे खरे दर्शन आतल्या डोळ्यांना स्पर्शून जात असे .

खेळाच्या मैदानावर अर्धी विजार आणि शर्ट खोवून खेळणाऱ्या मुली राष्ट्र सेवादलाने तीस वर्षापूर्वी तालुक्याच्या गावातही निर्माण केल्या . लोकशाही समाजवाद , विज्ञाननिष्टा , सर्वधर्मसमभाव , समान संधी , जातीनिरपेक्ष असा एकसंध समाज , स्त्री-पुरुष समानता , श्रमप्रतिष्ठा इत्यादी सामाजिक न्यायावर आधारलेली जीवनमूल्ये सैनिकांच्या मनात सतत आणि सहजपणे गोंदविली . ज्या काळात राजकारणाला आणि समाजकारणाला व्यवहाराची भाषा कळत नव्हती , तेव्हा सेवादल महाराष्ट्रभर रुजले , फोफावले . राजकारणाला ते गैरसोयीचे वाटले नाही . मागास माणसास न्याय , संधी आणि समृद्धी देण्याची वांधिलकी देशातील एकूण राजकारणाने वा समाजकारणाने स्वीकारली होती ,तोवर उत्तम वक्ते, अभ्यासू नेते ,मनस्वी कार्यकर्ते सेवादलाने भारतीय राजकारणाला पुरवले . आज राजकारण हा किफायतशीर धंदा बनला आहे . मूल्य विचारांचे न राहता ' व्यक्तिकेंद्री ' झाले आहे . व्यवहाराची गणिते मांडून ते खेळले जाते . गेल्या पंधरावीस वर्षात झालेल्या या बदलाचे दृश्य परिणाम गेल्या पाच वर्षापासून सर्वांनाच जाणवू लागले आहेत . एकूण समाज सांस्कृतिक समृद्धीकडे जाण्याऐवजी त्यातील सार्वत्रिक उद्ध्वस्त रितेपणा पदोपदी जाणवतो आहे . आपण पूर्वजांच्या कर्तृत्वावर सांस्कृतिक टिमकी भरपूर वडवून घेतलीय .एक प्रसंग आठवतो . शिक्षकांच्या उन्हाळी प्रबोधन वर्गात जर्मनीतील अनुभव सांगण्यासाठी मला बोलावले होते . भाषणानंतर प्रश्नोत्तरे रंगली . एका शिक्षकाने प्रश्न विचारला , " पाश्चात्य देशांत गेल्यावर , भारतीय संस्कृतीची समृद्धी पावलोपावली जाणवली असेल ना ? "

प्रश्न तसा नेहमीचाच , पण नेमका . मी म्हटले , हो जाणवली ना . आपल्या पूर्वजांनी हजारो वर्षांच्या शोधनातून , परिश्रमातून जे ज्ञान मिळवले , कला आणि विज्ञान निर्माण केले , त्या समृद्धीचे कौतुक जगभरची माणसे करतात . पण मला एक भीती पडलीय . अजूनही दलित माणसाने चार पैसे कमावले , घर बांधले वा गाडी घेतली की आपण मनोमन अस्वस्थ होतो . खेड्यातल्या मंदिरात दलित आजही जाऊ

शकत नाही. सामूहिक बहिष्काराची वा मारहाणीची प्रकरणे सर्वत्र होत असतात. हुंड्यापायी हजारो कोवळ्या पोरींची लग्ने विजोड वरांशी लावली जातात. शेकडो मुली जाळल्या जातात. धर्माच्या नावाने तरुण पोरींची लग्ने देवाशी लावून त्यांना बाजारात बसवले जाते तर, आणखी दोनशे पाचशे वर्षानंतर आपल्या भावी पिढ्यांनी कोणता सांस्कृतिक वारसा मिरवायचा? सांस्कृतिक वारसा मिरवताना आपण पुढच्या पिढ्यांना काय देणार आहोत, त्याचा विचार अधिक महत्त्वाचा!

गतकाळातल्या मोडक्या गढ्या इलेक्ट्रॉनिक झगमगाटाने नटवून त्यांचे सांस्कृतिक गोडवे गाणाऱ्यांची आज चलती आहे. सामाजिक जखमांच्या मूळ कारणांपर्यंत पोचवणारी क्ष-किरणांकित नजर तरुणांना प्रदान करणारी सांस्कृतिक पीठे मोडकळीला आली आहेत. अशा वेळी सेवादलाच्या पन्नास वर्षांच्या वाटचालीचा, पडझडीचा, धडपडीचा, चिकित्सक आढावा घ्यायला हवा.

सेवादल ही शेवटच्या माणसाला कवेत घेणारी सांस्कृतिक चळवळ आहे. तिचा राजकारणाशी जरूर संबंध आहे. मात्र तो पक्षीय राजकारणाशी नाही. सामाजिक न्याय, समान संधी, विज्ञाननिष्ठा, सर्वधर्मसमभाव, स्त्रीपुरुष समानता, लोकशाही समाजवाद, राष्ट्राभिमान या मूल्यांशी मात्र निश्चितच आहे.

'मानवलोक' ने सेवादलाच्या शाखा खेड्यांतून सुरू केल्या. आज २५ खेड्यात शाखा आहेत. हजारो मुले सायंकाळी मैदानावर जमतात. या शाखा उद्या आणखीन वाढवण्याची जिद्द आम्ही धरली आहे. या शाखांना जोडून आम्ही संस्थेच्या वतीने रात्रीच्या अभ्यासिका सुरू केल्या आहेत. दिवाबत्ती, जागा आणि पुस्तके या सोयी असलेल्या अभ्यासिकांमुळे मुलांचा शैक्षणिक दर्जा तर उंचावलाच, परंतु अर्ध्यातून शाळा सोडलेली मुले तेथे नियमित येऊ लागली. शाळेत जाणाऱ्यांचे प्रमाणही वाढले. राष्ट्रसेवादल खेड्यांतून आणि झोपडपट्ट्यातून अशा अभ्यासिकाही चालवू शकेल.

आज समाजातला सार्वजनिक विवेक संपलाय. क्षुल्लक कारणांवरून रक्तपात घडताहेत. जात, धर्म यांच्या मागील अंधश्रद्धा आणि रुढीप्रियता कमी झाली असली तरी या दोन गोष्टींचा वापर करून राजकारणाचे डाव मांडता येतात, हे पुढाऱ्यांच्या लक्षात आल्याने विकृत, गुंतागुंतीची जातीयता आणि धर्मवेडेपणा यांची वाढ होतेय.

आणि म्हणूनच राष्ट्रसेवादलाच्या शाखा, सेवापथके, बौद्धिकवर्ग, कलापथके यांची गरज नव्याने निर्माण झाली आहे.

*कश्मिर हो या कन्याकुमारी*
*भारतमाँ एक हमारी*
*गर्वसे कहो हम भारतीय है*
*प्यारसे कहो हम इन्सान है ...*

या सारख्या घोषणांनी गाव दुमदुमून जाते.

*... आभाळाची आम्ही लेकरे, काळी माती आई*
*धर्म वेगळा नाही आम्हा, जात वेगळी नाही ...*
*... जोडो भारत, जोडो भारत नवयुगने ललकारा है*
*भारत हमको प्यारा है ...*

अशा गाण्यांच्या लकेरी आभाळात भिरभिरतात . सहलीला निघालेल्या मुलामुलींच्या चेहऱ्यावरून ओसंडणारा उत्साह . शाखेत येणाऱ्या मुलामुलींची वाढती संख्या पाहून मनोमन पटते की ग्रामीण भागातील मुलांची सांस्कृतिक भूक भागविण्याचे ऐतिहासिक काम सेवादल करू शकेल . पण ते करण्याचे बळ आज सेवादल सैनिकात उरले आहे का ?

❖❖❖

मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय
ग्रंथालय
अंबाजोगाई-४३१५१७, जि.बीड

# उमलतीचे रंग, गंध

गाभुळलेली . . गदरलेली चिंच . आकडा कसा भल्यापुऱ्या दिवसांचा . वरची टणक साल गरापासून सुटत सुटत आलेली आणि गच्च भरलेल्या आंबट गराचा थर आता गोडुला व्हायला लागलेली . हिरवट रंगावरची गुळचट गुलाबी सायीची चव ज्यांनी चाखलीय त्यांनाच गाभुळ्या चिंचेचे वेडे कवतिक समजून घेता येते . ही अशी चिंच पुण्याच्या बाजारातदेखील मिळत नाही . येता जाता चिंचेची झाडं हेरावी लागतात नि नेम धरून दगडही मारावे लागतात . अशी चिंच एकदा चाखलीत ना , तरी आयुष्यभर ती जिभेवर चांदणी गोंदवून जाते .

या गाभुळ्या चिंचेची चव नि आपलं बालपण ! जणू काही देठाच्या जोडकैऱ्या . बालपण हे नेहमी आठवत बसावे असे . या बालपणाची गोडी भल्याभल्यांनी गायली आहे . कविराज भवभूतीसारखा कवी तर ' तेहि नो दिवसो गतः ' अशी हळहळ व्यक्त करतो . तर आधुनिक कविश्रेष्ठ केशवसुतांना बालपणीचे सुख हरपल्या श्रेयासारखे वाटते .

पण हे सतत झेलत रहावे वाटणारे बालपण किती जणांच्या आणि किती जणींच्या वाट्याला येते ? कळायला लागतं तेव्हापासून शेणाच्या मागे टोपली घेऊन हिंडताना , भर उन्हात शेरडं चारताना , हात दुखेस्तो गोवऱ्या नि भाकरी थापताना , अंगणातल्या बाभळीवर हिरवे पोपट आणि गाणाऱ्या साळुंक्या कधी येऊन जातात तेही कळत नाही ! मग त्यांनी घातलेली साद कानावर कशी पडणार ?

बालिकावर्षाच्या निमित्ताने या पोरीसोरींशी गप्पा मारताना , त्यांच्यासोबत हिंडताना , आलेले अनुभव नि काही धागे माझ्या लहानपणीच्या अनुभवाचे . या अनुभवांच्या ठिपक्यातून एखादं अंधुक चित्र आकार घेईल कदाचित .

❖ ❖ ❖

## एक

जानेवारीतली सकाळ . जीपमध्ये पाचगावच्या नऊजणी , मी नि सुनीता . शाळा अर्ध्यातून सोडणाऱ्या बालिकांचे दोन दिवसांचे शिबिर आहे . त्यासाठी ' मानवलोक 'च्या वतीने काही मुलींना घेऊन आम्ही निघालो आहोत . जीप उदगीरच्या दिशेने धावतेय .

आवाज फक्त धावणाऱ्या टायरचा . मागे बसलेल्या मुली दहा ते चौदा या वयोगटातल्या . पण आभाळ भरून आल्यावर कसं सारं चिडीचूप असतं . तसं वातावरण . मलाच कोंडल्यासारखे होतं . आपणच प्रश्न विचारावेत असा विचार करून मी सुरुवात करते . वर्गातली शहाणी मुले कशी पटापटा उत्तर देतात तशी नावाची चळत माझ्यासमोर कोसळते . नर्मदा कचितकराव भिसे , रहाणार कुंटेफळ . संगीता तुकाराम माळी . रहाणार पाटोदा , अलका रघुनाथ खरात , रहाणार भावठाणा ; वगैरे वगैरे . साऱ्याजणी अर्ध्यात शिक्षण सोडून घरी बसलेल्या .

मुलींनी भराभरा नाव सांगितली नि परत टायरचा आवाज कानात घोंगावू लागला . मग सुनीतानं गाण्याच्या भेंड्या खेळायला सुरुवात केली . सुरुवातीला सुनीता नि माझीच जुगलबंदी सुरू होती . पण माझं गाडं ए या अक्षरावर अडलं . . . आणि एकीनं किनऱ्या आवाजात सूर लावला -

*ए जी ओ जी लोजी सुनोजी*

*वन टू का फोर फोर टू का वन् . .*

पोरींना सिनेमाची गाणी अ पासून ज्ञ पर्यंत पाठ होती . पन्नाशीतल्या भाभी "*मेरे साऽमनेवाली खिडकीमें . एक चाँदका टुकडा रहता है*" ठेक्यात म्हणताना पाहून त्यांची भीड चेपली असावी . मग त्यांनाही सिनेसूर लावला . उदगीरच्या अलीकडे ह्यापशाचा पंप दिसला . आम्ही गाडी थांबवली . आंब्याच्या सावलीत शिदाऱ्या सोडल्या . शिळी भाकर , कांद्याचा झुणका , तळलेल्या मिरच्या यांच्यासोबत गप्पा पण रंगल्या .

हेमा सांगत होती , "मास्तर लई मारकुटा व्हता . पाटी न्हेली नाय की लई मारायचा . नि मायला पाटी मागितली की ती पाटीत दणके घालायची . म्हनायची खायला भाकर न्हाई नि पाटी कुठून आनू ? आमच्या अण्णाले रोज दारू लागती . मग पैसा य कुटून यनार ? चौथीत गेलेच न्हाई साळंला . पन आता लई पस्तावा होतुया . रातच्या शाळेत जावूसं वाटतं . येईल का व मला आता शिकायला ? बसंल का डोसक्यात समदं ?"

अलकाची आई कामाला जाते . तिचा बाप मुंबईला काम शोधायला गेला , तो माघारी आलाच न्हाई . चारपाच वसं वाट पाहिली . मग म्होतूर लावला . सावत्र बापाची तिला भीती वाटते . आईला झालेली लेकरं कोण सांभाळणार ? अलकाची तिसरीतूनच शाळा सुटली . आई म्हणते , तुझ्या लगनाचा भार या मानसान डोसक्यावर घेतलाय . तुजा बाप म्हनून जलमभर तुला सावली देनार हाय . मग त्याच्या लेकरांसाठी तू बी झीज सोसाया हवी . अलकाला पुस्तकं वाचायची आवड आहे . पण पुस्तकं कोण देणार तिला ?

मंगू , ठकू नि कावेरी . तिघीजणी सातवीतून घरी बसल्या . का तर शहाण्या झाल्या म्हणून . शहाण्या पोरी शाळेत गेल्या की बिघडतात असं पालकांना वाटतं .

पालकांना म्हणजे म्हानाच्या आजाआजींना. आईला मात्र शाळेत शिकवायची हौस आहे. पण सासूसमोर कशी बोलणार? नि तिचं ऐकणार तरी कोण? तरीही तिने नवऱ्यामागे लागून आपल्या लेकीला शिवणक्लासात घातलेय. तिचं पाहून दुसऱ्या दोघी तयार झाल्या.

कावेरी उत्साहाने विचारते आहे, "ताई, आम्हांला सातवीला बसवाल का? आम्ही घरी अभ्यास करू. तुम्ही विंग्रजी शिकवाल ना आम्हाला?"

गप्पांच्या ओघात आम्ही उदगीरला पोचतो. तिथे तर दोन अडीचशे चिमण्या मुक्तपणे चिवचिवताहेत. आमच्या चिमण्याही आमचे हात सोडून त्या थव्यात मिसळून जातात.

आम्ही परतीच्या वाटेने. पोरींची अखंड बडबड. सगळ्यांना कंठ फुटलेले. बदामी डोळ्यांची रेखा विचारते, "भावी, मी बंगाली गाना गाऊ?"

आसामात वाढलेल्या या बंगाली मुलीची भाषा म्हणजे मराठी-हिंदी-असमियाचं मजेदार मिश्रण आहे. ती गाणं सुरू करते. त्या गाण्याचे शब्द ओळखीचे नाहीत. पण तो शांत, धीमा तरीही बाणासारखा बोचरा सूर नक्कीच बंगाली आहे.

"ताई, खूप बेस्ट वाटलं आम्हांला. लई मजा आली. पुना कवा शिविर भरवणार? आमची आठवण ठेवा हं." त्यांचे बोल ऐकताना माझ्या मनात दाटून येतं. वाटतं, दोन दिवस मोकळ्या वाऱ्यात खुललेल्या या पोरी गावी गेल्यावर आपल्या मनाच्या खिडक्या परत बंद करून घेतील की मोकळ्या ठेवतील?

आणि जरी मोकळ्या ठेवाव्याशा वाटल्या तरी या दोन दिवसांच्या मोहरणाऱ्या हवेने टवटवीत झालेली मनं, पूर्वी कधीही न अनुभवलेल्या दुःखांनी पेटतील का?

❖❖❖

दोन

टी. व्ही. च्या बावीस इंची पडद्यावर युनिसेफ इंडियाने तयार करवून घेतलेली नकुशा ही फिल्म सुरू आहे. समोर मोना आणि तिची मैत्रीण. दवाच्या कोवळ्या थेंबासारखी नकुशा विलक्षण गोड. तरीही फिकुटलेला नितळ चेहरा आणि शिकेकाईच्या बियांसारखे काळेभोर चकमकीत डोळे. ती निरागसपणे विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देते आहे. ती कधी हट्ट करीत नाही; कारण मग मार मिळतो आणि झोपल्यावर स्वप्नंही पडत नाहीत. मनातून खूप शिकायचं आहे; पण शिकणार कशी? घरातली कामं कोण करणार? एखाद्या चिमुकल्या यंत्रासारखे दिवसभर घरघरत रहायचे या अशा जगण्याबद्दल मनात खेद नाही; कारण खंत करून उपयोग काय? या नकुशाच्या निरागस, भोळ्या दुःखाने मोना चक्रावून गेली आहे. नकुशाच्या निमित्ताने भारतातील बालिकांच्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक परिस्थितीचं दर्शन घडवणारी आकडेवारी वाचून, सुस्थिर आयुष्याची सवय झालेल्या मोनाला आतून कंप सुटला आहे.

552

पाच पोरींच्या पाठीवर जन्मली म्हणून घरादाराला नकोशी असणारी नकुशा आणि आईवापांना मुलीची हौस म्हणून जन्मल्यापासून फुलापरांत वाढलेली मोनिका किंवा राधा . . . अरुंधती-सायली . . .अमृता . . .वगैरेजणी . . . खरं तर ही अशी फिल्म मोनिकाच्या पाहण्यात तरी कशाला आली असती ? अत्यंत उच्चभ्रूंच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत नकुशासारख्यांची चिंता कोण करणार ?

मोना चौदापंधराची आहे . घरात आईवडील उच्चशिक्षित . चार जणांचे चौकोनी कुटुंव . मोना आदवशीर आहे . खूप वाचते . तिच्या सर्व मैत्रिणी तिच्याच परिस्थितीच्या वर्तुळातल्या आहेत . तिने जर्मन भाषेचा अभ्यास सुरू केला आहे . आपण काय करायचे हे ठरविण्याची मोकळीक तिला मिळालेली आहे . तिची मैत्रीण राधा कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये इंटरेस्टेड आहे . तर मोना , ईशा , राधा अशांचे वालपण कॉमिक्स , व्हिडीओ गेम्स , आईपपांवरोवरचे आउटिंग , इत्यादींनी वेढलेले .

मोनाची परीक्षा झाल्यानंतरच्या सुटीतली गोष्ट , एक दिवस मम्मीने फर्मान काढले . मोना . आज रसोई तू कर . डाळभाताचा कुकर लाव आणि कणिक भिजवून ठेव .

मोनाने मन लावून तांदूळ निवडले . हरभऱ्याची वाटी भरून डाळ घेतली आणि कुकरच्या भांड्यात पाणी न घालताच कुकर गॅसवर चढवला . अर्ध्या तासाने घरभर जळाल्याचा वास . व्हॉल्व्ह उडून गेलेला . हा गोंधळ ! किती शिकलीस तरी स्वयंपाक सुटणार आहे ? तुझ्या दादीजी वघ . कॉलेजमध्ये शिकवतात . भाषणं देतात .पण स्वयंपाकही करावा लागतो . सासूच्या हाताखाली नांदायचं तर स्वयंपाक हा यायलाच हवा . नाही तर उद्धार होईल मम्मीपपांचा !

"हे वघ , मोनाला स्वयंपाक जरूर शिकव . पण मुलींच्या जातीला स्वयंपाक यायला हवा म्हणून नव्हे तर प्रत्येक व्यक्तीला आपले अन्न शिजवता , तयार करता यायला हवे , म्हणून शिकव " मी मोनाच्या आईला मध्येच आडवित सांगितले . आणि दुपारी येताना नकुशा ही माहितीवजा फिल्म दाखवण्यासाठी घेऊन आले . मोनिकावरोवर तिच्या आईनेही नकुशा पाहिली . संध्याकाळी मोनिकाचे पपा घरी आल्यावर झालेला संवाद असा .

"पपा , शैला दादीजींनी टी .व्ही . फिल्म आणलीय . मी , मम्मी आणि राधाने पाहिली .फिल्मचं नाव नकुशा आहे ."

"नकुशा ? हे काय वुवा ? - पपा .

" ती मुलगी तिच्या मम्मीपपांना नकोशी होती .त्यांना मुलगा हवा होता . मुलगा म्हणजे फॅमिली लॅंप ना ! आपल्या देशात मुली नकोशाच असतात असं दाखवलंय .खरंय ते ? "

"तुम्हाला तर मी खूप आवडते ना ? पण या फिल्ममध्ये झोपडपट्ट्या , खेडी ,

वस्त्या यांनाल मुलींच्या नि त्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत, सर्वच म्हणतात की मुलीला शिकवून काय फायदा? त्या तर परक्याच्या घरी जाणार. शिवाय हुंडा द्यावा लागणार. मला पण हुंडा द्यावा लागेल पपा?' मोनाचा प्रश्न.

"तू आधी शिक. आणि मग तूच ठरवायचंस, तूच म्हणालीस तर द्यावा लागेल!" पपा हसत म्हणतात. पण हसताना त्यांचेही डोळे पाणावतात.

मोना पपांचा हात धरून म्हणते, "पपा, ती फिल्म पाहताना वाटलं की मी खूप खूप नशिबवान आहे. कारण मला असे प्रश्न कधी पडलेच नाहीत. वेकंवेच्या पाढ्यासारखी मी पुढे पुढे सरकतेय. पण आज नकुशा पाहून मन खूप उदास झालेय. माझ्यासारख्या कितीजणी असणार? खूप थोड्या. मग वाकीच्यांना आमच्यासारखं सुखी आयुष्य कधी मिळणार? की कधीच नाही? पपा बोला ना!" पपांजवळ उत्तर कुठे आहे?

❖ ❖ ❖

## तीन

अवतीभवती बोडके डोंगर. बुरखुंडी झुडपेही दिसत नव्हती आणि शेती मातीऐवजी दगडगोट्यांनी भरलेली. अशा शेतात पिकावं तरी काय? नि किती? या गावात मतदारांची संख्या आठशे सत्तावन्न. म्हणजे दोनशे उंबऱ्याच गाव. पण सध्याला फक्त शेसव्वाशे माणूस गावात आहे. बाकी सगळे साखर कारखान्यावर कामाला गेले आहेत. या गावात संस्थेने बालवाडी बांधली आहे. विहीर बांधून दिली आहे. हापसा लावला आहे. डोंगरघळीतले पाणी अडविण्यासाठी बांध बांधले आहेत. इथेच कॉलेजच्या पोरांचे राष्ट्रीय सेवा शिबिर घेतले. दोन दिवस मुलीही आल्या. शर्टपँट, पंजाबी ड्रेस, स्कर्ट अशा वेशातल्या मुलींभोवती गावातल्या बालगोपाळांचा वेढा पडला. डोईवर केसांना तेल नाही. भुरकटल्या झिपऱ्या सावरत टुकूटूकू नजरेने गावातल्या पोरी शहरातल्या मुलींना न्याहाळत होत्या.

कुणाच्या अंगावर अंडरपँटवजा चड्डी नि वर ढगळ पोलका, फाटका झगा. ठिगळांचं परकर पोलकं. शाळेत जाणाऱ्या दोघीचौघीच. चौथीत फक्त तीन मुली शिकतात. पटावरची संख्या दहा पण सातजणी आईबापाबरोबर कारखान्याला गेलेल्या. एकशिक्षकी शाळा. बालवाडी सुरू झाल्यापासून मुलं शाळेत जास्त येतात. मुलींची संख्या पण वाढली आहे, असं मास्तर सांगत होते.

आम्ही गोल करून बसलो. गाणी सांगितली. मुलींशी दोस्ती केली. गप्पा केल्या, त्यांना विचारलं, "तुम्हाला शिकायला आवडतं का?" सगळ्यांचे चेहरे कोरे.

"एकदोन शिकलं की खूप मोटं होता येतं. कॉलेजच्या मुलींसारखं शिकायचं ना मग?" एक विद्यार्थी त्यांना विचारतो.

"मास्तर लई मारतात."

"माय म्हंती शिकून चुलीम्होरच बसायचं. शिकून काय मिळणार आहे? माय म्हंती की तू शाळेत गेल्यावर न्हानग्याला कोन पाहील? तिला शेनकाम कराया जावं लागतं."

दुसरी सांगते: खेड्यातल्या सहासात वर्षांच्या मुलीला झाडझूड, भाकरी करणे, धुणं धुणे ही कामे करावीच लागतात.

आम्ही गप्पा मारीत असतानाच गावातल्या आजीबाई आल्या. त्या सांगू लागल्या. "ताई, या पोरी नसीबवान हाईत. आमच्या येळंला चारपाच वरसाच्या पोरीचं लगीन होई. नि तिला सासूच्या घरी नांदावं लागे. चला मी तुमाला पाणवटा दावते. हा समूरचा डोंगर उतरून खाली निळामाईच्या डव्हाचं पाणी आनावं लागे. खडा डोंगर भरली घागर घेऊन चढताना तेराचवदा वर्षांच्या पोरीचा जीव, तिच्या कवळ्या छातीत मावत नसे. चार ठिकाणी घागर भुईला ठेवावी लागे. नव्यानं नांदाया आलेल्या पोरीला पाणी भरता भरतां नाकी नवं येत. दरसाली निळाईचा डव दोनतीन पोरींचा वळी घेई. गावची माणसं म्हणत तिथं आसरा हाईत. त्यांना कवा या पोरी खायला लागतात. उगा बोलायची रीत व्हती! खरं तर पान्यापायी पोरी डवात जीव बुडवून गार होत!

"आता वरं हाय. हापसा आलाया. हीर झाली. साळा आली. पन साळंत एकदोन शिकून पोरींना कामधंदा थोडाच येणार हाय? सडासारवण, भिंती हुव्या लिंपायच्या, चूल कोरायची, निंदणं खुरपणं करायचं... ही असली कामं जलमभर करावी लागतात. तिथं असल्या एकदोनचा काय उपेग? ताई तुम्ही बायांना परपंचाचं शिक्षण देणारी साळा काढा, मग आमी बी येऊ शिकायला." आजीबाई दाईकाम करतात. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळलेले आहे. त्यांची नात शहरात शिकायला ठेवली आहे.

"आजी, तुम्ही बरी नातीला शाळेत धाडलीत? तीही शहरात शिकायला ठेवलीत?" मी विचारले.

"शिक्षण वाया जात नाही हे मला बी कळतं. शिकली तर नवराबी शिकलेला मिळंल. नवऱ्यानं पीठ आनलं तर बाईनं त्यात चिमूटभर मीठ घालावं म्हंजी भाकर चवदार व्हंती." आजीबाईंनी उत्तर दिले.

❖ ❖ ❖

## चार

आम्ही नववीत होतो तेव्हाची गोष्ट. श्रावणातले हिरवेगार दिवस. गरुडबागेतल्या प्रचंड बकुळवृक्षाखालची फुले मधल्या सुट्टीत वेचून आणण्यासाठी आम्ही डब्यातली पोळी अक्षरशः तोंडात कोंबून फाटकाबाहेर पळत असू. अजूनही त्या डब्याला बकुळींचा आर्त कोमल गंध येत असेल! धाप लागेस्तो पळत पळत शाळेत पोचायचो. नेमकी घंटा होऊन जोशी बाई वर्गात आलेल्या असायच्या. बाई वरून नारळासारख्या

टणक खरखरीत पण आतून मायाळू . खोबऱ्याच्या गार्यासारख्या प्रेमळ . त्या तोंडानं ओरडत , पण डोळ्यातून हसत . त्यांची शिक्षा करण्याची पद्धत मोठी गोड . शिक्षा म्हणून गाणे म्हणायला लावायच्या किंवा कविता पाठ करायला लावायच्या .

तर अशाच एका श्रावणातल्या सोमवारी विमल उशिरा शाळेत आली . विमल खूप हुशार . गणितात पक्की , इंग्रजीत नेहमी पहिला नंबर . बहुधा जोशीसरांचा तास असावा . तिने नेहमी पहिले यावे ही त्यांची इच्छा . त्या मोयपोटी ते तिला अद्वातद्वा रागावले . पाच पट्ट्या हातावर खाऊ म्हणून दिल्या . विमल ओठ गच्च मिटून मारखी रडत होती . आम्ही मैत्रिणींनी खोदून खोदून विचारले पण ती गप्पच . शाळेतून परतताना तिने हळूच हाक घातली . शैला आपण बरोबर जाऊ या . उषा मिनीला पुढे जाऊ दे . त्या निर्मनुष्य रस्त्यावरून आम्ही दोघीच चालत होतो . विमाने तिला उशीर होण्याचे कारण सांगितले . विमाची आई सकाळी बाळंत झाली . मोठी प्रभा अकरावीच्या अभ्यासासाठी मैत्रिणीकडे गेलेली . दाई वेळेवर आली नाही . आईचे बाळंतपण विमललाच करावे लागले . अभ्यास बुडू नये म्हणून प्रभा स्वयंपाक करून शाळेत आली . विमलला मात्र आई नि बाळाचे सगळे उरकून शाळेत यावे लागले . श्रावण सोमवारी सकाळची शाळा असे . विमाच्या आईचे ते आठवे बाळंतपण होते . विमा मॅट्रिकला पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाली . पण ती पुढे शिकू शकली नाही .

आम्ही तिला रोझी म्हणत असू . खरं नाव सरोजा . गुलाबी गोरी , कातीव नाक , फुगीर गाल , काळेभोर डोळे , उभट चेहरा , ती नक्कीच सुंदर होती . कारण मला आठवते तशी ती नाचात नेहमी पुढे असायची . नाटकात सीता , कृष्ण , राधा अशा खास भूमिका जणू तिच्याच असल्यासारख्या तिला मिळत . मी एकदा रडले होते तर बाई फिसकरल्या होत्या की राधा कधी नकटी असते का म्हणून ! तिचे कपडेही नेहमी तिला खुलावणारे असत . कापडाचा पोत साधाच असे . पण टॉमॅटो कलर , फिरोझा कलर असले रंग आम्हाला तिच्याकडून कळत . तिचे घर गावाबाहेर होते . ती सायकलवरून येई . तिच्याभोवती एक धुक्याचे गूढ . . . जादुई वलय अधिक दाट होऊ लागले . ती कुणाशी तरी नेहमी बोलते , कुणी तरी तिला सायकलवरून पोचवायला येते . ती मुद्दाम उशिरा घरी जाते , वगैरे वगैरे . . एकदा आम्ही डबा खात बसलो होतो . शाळेच्या कंपाऊंडच्या भिंतीजवळच्या बुचाच्या झाडाखाली . इतक्यात एक वारीकसा दगड भिरभिरत आमच्या मध्यात येऊन पडला . त्या दगडाभोवती कागदाची घडी दोऱ्याने घट्ट बांधलेली होती . उषाने तो दोरा सोडून कागद उलगडला . आत चिठ्ठी होती आणि नाजुक गुलाबी रंगाची सॅटिनची रिबन .

*प्रिय सरू ,*

*काल तू माझ्याकडे पाहून हसली का नाहीस ? मला रात्रभर झोप आली नाही . तुझं माझ्यावर प्रेम असलं तर परवाला ह्या गुलाबी रिबनचा बो तुझ्या वेणीला बांध .*

*तू फार फार सुंदर दिसतेस.*
*तुझ्या यादमध्ये तळमळणारा.*

*राजू*

मग त्या पत्राचे चोरटे वाचन.

"हिलाच बरी पत्रं येतात?" उषा.

"आपण तिच्याशी बोलणंच बंद करू बाई. आमच्या घरी नाहीं बाई असली मैत्रीण चालत. ब्राम्हण असली म्हणून काय झालं!" आशा म्हणाली. शेवटी रोझीवरचा बहिष्कार पक्का झाला. आता उमगतंय की त्यावेळी प्रत्येकीलाच मनातून वाटलं होतं की आपल्यालाही असे पत्र यावे, कुण्या तरी राजकुमाराचे!

❖ ❖ ❖

## पाच

त्या घरात कुठलेसे कार्य होते म्हणून मी गेले होते, घर माणसांनी भरलेले. गच्चीवर स्वैपाक सुरू होता. खाली चहापाणी, नाश्ता चालू होता. दोन चटपटीत मुली नवे फ्रॉक घालून चुटुचुटू काम करीत होत्या. झाडून काढ, फरशी पुसून घे, कपबशा विसळून दे. क्षणाची फुरसत नाही. थोडी उसंत मिळाली तर कुणाचे तरी बाळ कडेवर दिले जाई. त्यांच्या कामाचे मला खूप कौतुक वाटत होते आणि कीवही येत होती. कारण मला पक्की खात्री होती की त्या शाळेत जात नसणार. तिथे जमलेल्या सर्वच जणींना त्या पोरींचे खूप कौतुक वाटत होते. कार्य संपल्यावर एकजण परत जायला निघाली. तिने धाकटीला बोलावून पाचची नोट तिच्या हातात कोंबत म्हटले. "रेखा, तू नि अलका बांगड्या भरा."

रेखाने मूठ गच्च आवळून पैसे घेण्यास नकार दिला.

" नको माशीजी. आम्हाला ताईंनी रोजावर ठरवलेले आहे. आमच्या दादांना असे पैसे घेतलेले आवडत नाहीत." मला तिच्या बोलण्याचे कौतुक नवल वाटले. मी दुपारी तिच्याशी गप्पा मारल्या तेव्हा त्या पोरीबद्दलचे कौतुक अधिकच वाढले.

रेखा - अलकाचे वडील सिडकोमध्ये कारखान्यात काम करतात. एका अपघातात ते दोन वर्षापूर्वी सापडले. त्यामुळे ते बसून जमेल तेवढे काम करतात. रेखा सातवीत तर अलका पाचवीत आहे. रेखाची आई घरबसल्या साड्यांना फॉल लावणे वगैरे काम करते. सुट्टीत काय पुस्तके, वह्या, शाळेला गणवेश यासाठी त्या पैसे जमवीत आहेत. रेखाला नर्स व्हायचे आहे. तर अलकाला कॉलेजमध्ये जायचे आहे. रेखाचा धाकटा भाऊ नऊ वर्षाचा आहे. पण तो असे काही काम करीत नाही. आईच त्याला काम करू देत नाही. तो पैसे कमवायला लागला तर त्याला पानतंबाखूसारख्या वाईट सवयी लागतील आणि अभ्यासावरचे लक्ष उडेल अशी तिला भीती वाटते."

"तुम्हाला वाईट सवयी लागतील अशी भीती नाही का वाटत आईला?" माझा

प्रश्न .

" अं हं . आम्ही आईला विचारल्याविगर कुठंच जात नाही . इथंसुद्धा आई सोबत येऊन ठराव करून गेलीय . अन आई म्हणते की दोनतीन वरसांनी आम्ही शान्या झाल्यावर तीं दुसरीकडं कामाला धाडायची न्हाई . तवा आताच पैसे जमवून बँकेत ठिऊन द्यायचे ."

"तुमच्या घरात शिकलेले कोण कोण आहेत ?" मी विचारते .

" आमची आई सातवी पास हाये . धाकटी मावशी घाटीच्या दवाखान्यात शिष्टर आहे . आन मामा कंपाउंडर हाये . आमचे दादा नॉन मॅट्रिक हायेत . आमच्या मावशीला खूप पगार मिळतो ." रेखाने उत्तर दिले .

कधी कधी वाटते , अवतीभोवतीचा अंधार कधीच संपणार नाही . खेड्यापाड्यातल्या , झोपडपट्टीतल्या लेकीबाळींचे जिणे कधीच बदलणार नाही . परंतु असा एखादा जरी अनुभव आला तरी मनाला दिलासा मिळतो , की क्षितिजावर हालचाल सुरू झालीय . उजाडेल . . किमान परवा तेरवा तरी !

❖ ❖ ❖

## सहा

तीनसाडेतीनशे बालिका . त्यांचा चिवचिवाट . . कलकलाट सुरू आहे . त्यांना गप्प करण्यासाठी पाचसहा संयोजक जीव तोडून प्रयत्न करीत आहेत . पण आज दावण सोडून मोकळेपणी उंडारणारी ही वासरं जाम ऐकायला तयार नव्हती . सोळा सतरा गावच्या मुली एकमेकींशी गप्पा मारण्यात दंग होत्या . त्यांच्यासमोर मला व्याख्यान होते . खरे तर या पोरींसमोर व्याख्यान देणे ही त्यांना नि मला शिक्षाच होती . मी त्यांच्यासमोर बडबडगीते सादर केली . पण तीही त्यांना भावली नाहीत . कारण गाण्यातल्या राणीची बाग , चॉकलेट , जिराफ इत्यादी गोष्टी त्यांना अपरिचित होत्या . मग मी ठरवले की चक्क गोष्ट सांगायची . गोष्ट सुरू झाली .

" एक मुलगी होती , ती अगदी लहानशा खेडयात रहायची . तिचे वडील पाटलाच्या शेतात काम करायचे . आई पण लोकांच्या शेतात मजुरीला जायची . तिला एक भाऊ होता . ती शाळेत जाई. आणि मुलगी ? ती काय बरं करीत असेल ?"

"न्हानग्याला सांभाळत असेल . . ."

"कवाबवा साळत जात असेल . . ."

"माई बरुबर कामाला जात असेल . . ."

मुलींची सामूहिक उत्तरे .

"ती मुलगी लहानपणी शाळेत जायची . पण तिच्या पाठीवर लहान बहीण जन्मली . तिला सांभाळण्यासाठी ती दुसरीतून घरी बसली . पण तिची वाचनाची आवड कमी झाली नाही . दिसेल तो कागदाचा तुकडा घेऊन ती वाचत बसे .

"ती घरची कामं करी. कोणची बरं?" मी.

"सकाळी उठून अंगण झाडायचं...

भाकरी करायच्या...

धुणं घेऊन नदीला न्यायाचं...

माई बरुबर न्हानग्याला घिऊन रानाला जायचं...

सकाळी शेताला जायाचं...

सांजच्याला सरपन...

बाभळी साळून आनायच्या..." मुली.

"तर ही मुलगी. तिचं नाव आपण सरू ठेवू या, ती सगळी कामं करायची. सकाळी उठून मायं चा करी. सरूला नि तिच्या वडिलांना देई.

"तिच्या भाऊला" – माझं वाक्य संपायच्या आत सामूहिक उत्तर.

"दुदू मिळे."

"दुधात पानी घालू ना?" मी

"व्हय." मुली.

"दुधात पाणी घातलं नाय तर म्हशीला दीठ व्हती. तिचं दुदू आटतं." एक धिटुकली उभी राहात मला कारण सांगते.

"भाऊला दूध नि सरूला चहा. आईचा सरूला राग येत असेल का गं?" माझा प्रश्न.

"न्हाईऽऽ" सामूहिक उत्तर.

"का गं?" पुन्हा माझा प्रश्न.

"पुरसांची गोष्ट वेगळी असती... बायांचं काय! भाऊ वंसाचा दिवा लावतो. म्हातारपणी मायबापाला सांबाळतो. तेची ताकद आताच वाढायला हवी..." उत्तरे.

"सरूला पण तसंच वाटायचं? की बाई बिनकामाची आणि बिनमहत्त्वाची असते म्हणून" मी.

"न्हाई" पुन्हा कोरस.

"मग तिला काय वाटायचं? माझा प्रश्न."

"बाई घरात नसंल तर घरची कामं कोन करील?
अन्न कोन शिजवील?
लेकराला जलम कोन देईल?
बाई बी महत्त्वाची असती, पन पुरसापरीस कमी!" मुली.

"तर सरूला वाटायचं आपण खूप शिकावं, चार पैसे कमवावे, चित्रांची पुस्तकं वाचावी, निळ्या रंगाचा फ्रॉक घालून शाळेत जावं, गाणं म्हणावं, उड्या माराव्या, शिवणापाणी खेळावं, भाषणं द्यावीत, मोठं होऊन इंग्रजी शिकावं, डॉक्टर व्हावं,

रेडिओत भाषणं करावीत....

"वाटायचं ना?" मी.

"होऽऽ" मोठा सामूहिक आवाज.

"तर अशी ही आमची सरू रात्रीच्या शाळेत जाऊ लागली. फाडफाड वाचू लागली. पाटी भरून लिहू लागली आणि चौथीच्या परीक्षेत चक्क पहिल्या वर्गात पास झाली. मग रात्रशाळेतल्या बाई घरी आल्या. आईवडिलांना समजावून गेल्या. सरूसाठी निळा झगा नि पांढराफेक पोलकं देऊन गेल्या.

सरू शाळेत जाऊ लागली. ती सातवीत बोर्डाला पहिली आली. आई म्हणू लागली की आता पोर शाणी झाली तिचं शिक्षण बंद करा. बाबानं घरी पावणा आणला. सरूला बघायला. मग सरूनं काय केलं?" माझा प्रश्न.

एकीनं धागा पकडला.

"सरू लई रडली, जेवली न्हाई की खाल्ली न्हाई. दोन दीस उपाशी ऱ्हाईली."

"मग?" माझा प्रश्न.

"आई म्हणाली मॅट्रिक काढून घरी बसवा. तवर शिकवा." एकीचं उत्तर.

"..नाय...नाय...उलट बापान चांगलं झोडलं असलं. आईचं काय चालतया घरात!" दुसरीची शंका.

"सरू, नाकासमूर चालनारी हाय. तिचा बाबाला इसवास हाय. तिला त्यांनी शिकू दिलं असतं. ताई तिचं शिक्षान मध्यात थांबवू नका. मला लई रडू येईल मग." एक धिटुकली बसल्या जागेवरून सांगू लागली. मग आमची सरू मॅट्रिकला पण पहिल्या वर्गात पास झाली. मग ती कॉलेजात गेली. कुणाच्या मनातली सरू डॉक्टर झाली. तर कुणाच्या मनातील मास्तरीण. कुणाच्या मनातील नर्स तर, कुणाच्या मनातील रेडिओत बोलणारी!

हे झालं मनातल्या आणि गोष्टीतल्या सरूचं. पण खऱ्याखुऱ्या सरूचं काय झालं असेल? खरंच, काय झालं असेल खऱ्या सरूचं?

❖❖❖

# रेल्वेच्या डब्यातील आत्मा

मी जयपूरला निघालेली.

आपल्याकडे एकटी दुकटी बाई प्रवासाला निघाली की अवघे घर बेचैन होते. त्यातून मी दोन प्रांत . . .गुजरात, मध्यप्रदेश ओलांडून अगदी पंजाबच्या जवळ जाणार होते. मग काय विचारता सगळे घर हैराण. माझ्या मुलांना आईच्या हिंदी आणि इंग्रजीची चिंता. मुलगी शिकवू लागली, "अम्मा, तू त्या दिवशी गुरख्याशी कसलं भयाण हिंदी मारत होतीस! वो भिंतीके पलीकडे डुकरीण और उसकी पिलावळ है. उसको हुसको . . . मला एवढं हसू येत होतं."

नवऱ्याला वेगळीच काळजी लागली होती. अलिकडे बायकोचे पाय दुखतात, गुडघा दुखतो म्हणते. त्यात शारीरिक समृद्धी वाढत चाललेली. तर, त्यांचे तीनतीनदा वजावणे सुरू होते. "ही डायरी, तिच्यात पूर्ण नाव, पत्ता, फोन नंबर सगळं लिहलंय. तुझा ब्लडग्रुपही लिहून टाक आणि ही औषधं. ती नीट ठेव आठवणीने. बी कॉम्प्लेक्स घे . . आणि हे बघ ज्या क्षणी वाटेल की परत फिरावं त्या क्षणी परतीच्या प्रवासाला लाग."

आणि मी?

स्त्री-स्वातंत्र्य झिंदाबाद! स्त्रीपुरुष समानता झिंदाबाद! समानसंधी झिंदाबाद!!! वगैरेंच्या घोळक्यात.

ऐनवेळी मन जरा विरघळलेच! पण जयपूरचा गुलाबी रंग, आमेरचा किल्ला नि नक्षीदार हवामहल मनाला खुणावीत होते. मग नकाशा शोधून त्यावर जयपूर शोधणे सुरू झाले. ते बेटे निघाले थेट औरंगाबादच्या डोक्यावर. जयपूरच्या ठिपक्यावर हात ठेवताना वाटत होते, जणू मी जयपूरच्या हवामहलच्या शिखरावरच उभी आहे. पण औरंगाबाद आणि जयपूर यात सहाशे किलोमीटर्सचे अंतर होते . . .

औरंगाबाद ते इंदूरच्या बसमध्ये बसले. बस सुरू झाली आणि एकाएकी खूप एकटेपणा आला. मनात कल्पनाही आली. अनोळखी माणसांनी गजबजलेल्या इंदूरच्या रेल्वे स्टेशनात मी उभी आहे आणि छातीत चक्क कळ येतेय. चेहरा घामाने डवरलाय . . . वगैरे. मग शबनम बॅगेतली डायरी चाचपून पहाणे, हे सारे एका

क्षणात. दुसऱ्याच क्षणी मनाच्या मूर्खपणाची कीव येऊन हसूच आले. भरतीची लाट भरून येते तशी उत्साहाची. धाडसाची एक लाट माझ्याही उरात तुडुंब भरून आली आणि मी दिमाखाने इंदूरचे तिकीट मागितले.

....आता मी सराईत इंदूरकरीण होते.

माझा पेशा मास्तरकीचा. विद्यार्थी कसा, कुठे नि केव्हा भेटेल हे सांगता येणार नाही. पुढच्या बाकावर विराजमान झालेल्या तरुणाने मागे वळून पाहिले आणि तो ओळखीचे हसला. माझ्या मनात नेमके चित्र उमटेना.

"कुठं निघालात मॅडम? धुळ्याला का?" त्याचा प्रश्न. मी धुळ्याची माहेरवाशीण आहे, हेही माहीत त्याला! म्हणजे बऱ्यापैकी ओळखीचा दिसतोय. पण नेमकी ओळख पटेना. मी मनातल्या मनात उत्तर दिलं, "जपानला!"

"जयपूरला निघालेय." मी म्हणाले.

"अरे व्वा! मीही तिकडेच निघालोय. जयपूरला नाथ सीडस्‌मध्ये असतो. मॅडम मी अमूकधमूक. तुमचा लाडका विद्यार्थी. शहात्तरच्या बॅचला होतो. आठवतं? जयपूरला पोस्टिंग आहे सध्या." त्याने सांगितले.

माझ्या मनातल्या भित्र्या सशानं टुणकन उडी मारली. बरं झालं गं बाई. आता शेवटपर्यंत सोबत मिळाली. उगाच टेन्शन नको. या छोट्यामोठ्या टेन्शननीच नवे नवे आजार होतात.

पण मनातल्या खोलात दडलेले मन मात्र हिरमुसले. एकट्याने प्रवास करण्यातलं थ्रिल, जिप्सी बनून मुशाफिरी करण्याची संधी हे लाडके लेकरू विरजून टाकणार की काय ? सारा मजा किरकिरा होणार तर !

"पण मॅडम, मी इंदूरला दोन दिवस राहणारेय. मग जयपूरला जाणार आहे. तुम्हाला पत्ता देतो. जरूर या. सकाळी नऊ वाजता दिल्ली पॅसेंजर आहे. तिला बसवून देतो."

जयपूरपासून २०/२५ किलोमीटर्सवर असलेल्या लहानशा गावात महिलांचे राष्ट्रीय एकात्मता शिबिर होते. बारातेरा दिवसात राजस्थानची ओळख करून घ्यायची होती. सोबतही मिळाली होती. मी त्याच्याकडे येण्याचे आश्वासन दिले. मी खूश होते. चाळीशीचा उंबरठा पार केल्यावर, साहसाने येणाऱ्या तरुणाईचा अनुभवही मिळणार होता. तणतणत, फुणफुणत दिल्ली एक्सप्रेस - एक्सप्रेस नावालाच, हर टेसनाला थांबणारी - स्टेशनात आली. अवतीभवती माणसांचा उफाळता समुद्र. जो तो दरवाजातून आत घुसायचा प्रयत्न करतोय. मी बायकांचा डबा शोधतेय. माझी बॅग शिष्यवराच्या हातात. लांबच लांब गाडी. अजमेर, चित्तोडगडचे डबे. काही डबे दिल्लीपर्यंत धावणारे. शेवटी बायांचा डबा सापडला. कशीतरी आत घुसले. डब्यात दहावीस महिला आणि पन्नाससाठ बाप्ये. माझा मराठी बाणा जागा झाला.

"अरे भाई, ये लेडीजका डिव्वा है. यहाँ मत बैठना. क्यूँ बैटे यहाँ ? अगले स्टेशनपे नीचे उतरो." माझी वडवड सुरू झाली. पण माझ्याकडे कोणाचेही लक्ष नव्हते. नाही म्हणायला पोरांचे लेंढार नवऱ्यासह वसलेल्या एका तरुण वाईने कपाळाला आठ्या घालून, डोळे वाकडे करून माझ्याकडे पाहिले. मीही हट्टाला पेटले. "देखिये यह डिव्वा मर्दोंके लिए नहीं. यहाँ पुरुष लोग नहीं बैठ सकते. पुलिस को वुलायेंगे हम." मी असं म्हणतेय तोच "हाँ वाईसाव मैं यहाँ हुं" असे म्हणत एक पोलिस समोर आला.

आता काय बोलणार ? कप्पाळ !

"साव, नई हो क्या यहाँ ? कहाँ की हो ? हमारे मध्यप्रदेशकी नही दिखती !" पोलिसमामांनी विचारले. मी मराठी आहे म्हटल्यावर त्याने मनापासून मान डोलावली. "तुम्हारे महाराष्ट्र में वाईलोग मर्द को लेडीज डिब्वे मे बैठने नही देती. यहाँ तो वे खुद लेके आती है. जाने दो. हम आपको जगा देते है." असे म्हणत त्याने खिडकीजवळची जागा मला दिली.

डब्यात भिकाऱ्यांचा भरणा होता. भीक मागणारी लहान मुले. फरशीच्या तालावर, किनऱ्या आवाजात सिनेमातली भजनं गाणारी. डबाभर प्रचंड घाण, नाक शिंकरून तिथल्यातिथे भिंतीला बोटं पुसणारी माणसं. विडीचा धूर नि राख. आईला लुचणारी भुकेली पोरं. भिरभिऱ्या नजरेनं जगाकडे पहाणारी, डोक्याला तेल चोपडून भांग पाडलेली, वेण्या घातलेली, अंगापेक्षा मोठे असलेले कपडे घातलेली लेकरं, आणि शेजारी वसलेले त्यांचे निर्विकार बाप. माझ्याशेजारी दोन म्हाताऱ्या होत्या. अंगावर बऱ्यापैकी पातळं. बरोबर वॉटरवॅग, टिफीनचा डबा. पण डोळेमात्र विचारात डुंवलेले.

वीस बावीस तासांचा प्रवास. मुक्याने कसा होणार ? शब्दांची देवघेव सुरू झाली.

दोघी म्हाताऱ्या इंदूरच्या. मध्यमवर्गीय विधवा. सून आणि मुलांच्या टुमदार संसारात म्हाताऱ्यांची अडचण होई. मुलं विचारीत नसत. देवळात दोघींची गट्टी जमली. सत्तांचे गाठोड उकलले गेले. दोघींनी एक विचार केला आणि यात्रेच्या मिशाने बाहेर पडल्या. त्या पुष्करतीर्थाला जाणार होत्या. तिथे सकाळी अन्नछत्रात कोरभर अन्न मिळते. दिवसभर देवाची सेवा करायची. परमेश्वराच्या दारात जाऊन घरादाराचे दोर तोडून, मुकाटपणी मरणाची वाट पहात बसायचे.

मला मराठीतील म्हण आठवली. वेशीत नाहीतर काशीत मरावे. पण या म्हणीतले अपार कारुण्य त्या डब्यात जाणवले. मन बेचैन झाले. मीही चाळीशी पार केलीय. आणखीन तीस वर्षांनी कुठे नि कशी असेन मी ?

मी भानावर आले ती पोलिसभाऊच्या हाकेने. मंदसोर आले होते. इथे गाडी बराच वेळ थांबते. शिवाय शयनयान डब्यात जागा मिळण्याचीही शक्यता होती.

महिला डब्यातल्या घार्णानें मी वैतागले होतेच . रात्रभरचा प्रवास ; झोपही हवी होती .. मन्दसोरला उतरून थ्रीटायरमध्ये जागा शोधली . लेडीज डब्याला रामराम ठोकून मी वऱ्यापैकी सुरक्षित जागेत आले .

समोरच्या वाकावर नवेले जोडपे वसले होते . वहुदा पहिल्या वाळंतपणानंतरची पाठवणी असावी . तरुण मुलीचे रडून लाल झालेले डोळे . मांडीवर नव्या कपड्यात गुंडाळलेला रेशमी गोळा . भलंमोटं सामान : जोडप्याच्या शेजारी एक वयस्कर मुस्लिम गृहस्थ . माझ्याशेजारी दिल्लीच्या विधिमहाविद्यालयात शिकणारा आर्यसमाजी तरुण . त्याच्या शेजारी मध्यप्रदेशातील एक वनिया आणि त्याची वयस्क आई . तिला पुष्करला जायचे होते .

गाडीने वेग घेतला . एकमेकांजवळच्या वर्तमानपत्रांची देवघेव झाली . एवढ्यात वाळ किरकिरायला लागले : आवाज वाढू लागला . रडणे थांवेना : ती नवमाता हैराण झाली होती . 'वालपणही ' नवेच . त्यालाही नेमके काय करावे हे कळत नव्हते . तिला मदत करावीशी वाटली . गेल्या चौदा वर्षात वाळ हातात घ्यायला मला तरी सराव कुठे होता ? तो मऊ लुसलुशीत गोळा निसटला तर ? पण माझ्यातल्या आईने केव्हाच आपले हात पुढे केले होते . ते चिमुकले मुटकळे उराशी धरले . क्षणभर अंगावर रोमांच उभे राहिले . जरासे आंदुळले . . . जोजवले . तर काय ? चक्क ते शांत झाले . आणि झुलता झुलता झोपी गेले : त्या पोरसवदा आईच्या डोळ्यात कृतज्ञता भरून आली . चाचांनी लगेच जागा करून दिली नि म्हटले , वेटा वच्चे को सुलादो यहाँ .

तरुण मुलगा वोरं घेऊन आला . सर्वांसमोर धरली . नको म्हणत , सर्वांनी तोंडात टाकली .

मग गप्पा सुरू झाल्या . कोण ? कुठे ? कशाला ? वगैरे . आणि पाणी वळणाला वळावे तसा गप्पांचा ओघ पंजावच्या दिशेने वळला . पंजावच्या प्रश्नाने प्रत्येकजण व्यथित झालेला . सरकारच्या धोरणावर टीकाटिप्पणी करताना शव्दांना धार चढत असली तरी देशाच्या एकसंधतेला पडणाऱ्या चिरांमुळे प्रत्येकाच्या मनात दुःख आणि चिंता होती .

" देखो . मेरा वेटा दुवईमे था पाच साल . लेकिन विवीवच्चे यही थे . इंडियामें . कुछ भी कहो . . पूरा जग देखके आया . " ईरान . . इराक कुठेही . पण भारतात जे स्वातंत्र्य आणि सुरक्षितता मिळते ती कुठेच नाही .

" आम्हां गरीब मुसलमानांना खरा धर्म पाळायचा असतो . त्याला कोण आणतंय आडकाठी ? मी ऑटोरिक्षा चालवायचो . चार पोरींची लग्नं केली . दोन मुलं आहेत . एक डॉक्टर झाला . दुसरा छोटामोठा व्यापार करतो . अगदी कालपरवापर्यंत झोपडीत रहात होतो . आता सुखाची रोटी खातो . आजकाल ये लीडरलोगां और गुंडा एक हो गये है . वोही लोगोंको उसकाते है . खून खरावा करते है . वीचमे गरीब मरता

है . उसके बिवीबच्चे बेसहारा होते है .

"मरनेवाले मुसलमानभी गरीब होते है और मरनेवाले हिंदूभी गरीब होते है ." चाचा बोलत होते .

इतका वेळ डोळे मिटून पदराखाली जपमाळ जपणाऱ्या मॉंजीही बोलू लागल्या , "लाखोंमे एक बात कही भाईसाबने !"

मॉंजी सध्या मध्यप्रदेशात उज्जैनला मोठ्या मुलाजवळ असतात . पण त्या मूळच्या राजस्थानच्या . सीमेवरचे एक लहान खेडे , त्यांचे माहेर , सासर जवळच . आजही त्यांचे मोठे दीर गावी शेती करतात . त्यांच्या घरात दोन पिढ्यांपूर्वी मोठ्या मुलाला सिख्ख करीत . देवघरात आजही गुरुनानक साहेबांचा फोटो असतो . ग्रंथसाहेबातली पदे अनेक मुखांतून गायली जातात .

"सिख्खं लोग तो हमें अपने लगते है . अपने बिरादरीके लगते है . कभी नही सोचा था की ऐसा कुछ होगा ." मॉंजींचा स्वर कातर झाला .

एव्हाना रेल्वेच्या डब्यातला तो कोपरा , एक घर बनला होता .

मागे मागे पळणारी झाडे , हरियाली शेतें आता अंधारात बुडू लागली . बरोबरच्या शिदोऱ्या पिशवीतून बाहेर येऊ लागल्या . कुठलेसे स्टेशन आले आणि मी पुरीभाजीवाल्याला शोधू लागले . इतक्यात त्या तरुण आईने मला आत बोलवले . आग्रहाने विनवले . "दीदीजी , हमारे पास बहुत सारा खाना है . आप हमारे साथ खाना खाओगी . प्लीज ." तिच्या नवऱ्यानेही आग्रह केला .

"दीदीजी , संकोच मत करना . रास्ते मे मिल गये है . चंद घंटोंके साथी है . मालूम नही आगे कब मुलाकात होगी !"

उत्तरेकडचा लोभस आग्रह मानावा लागला . मी द्राक्षे घेतली आणि मधे ठेवली . मग लोणच्याची देवाणघेवाण झाली . चाचाजींनी चार बुंदीचे लाडू आणि शेव कागदावर काढून मध्यात ठेवली .

"पक्की रसोई है बहेनजी . तीखी सेव और नुक्तीके लड्डू है . आप सब लीजिये ."

मग इकडून तिकडून तिखट पुऱ्या पास झाल्या . भरल्या बटाट्याची भाजी सगळीकडे फिरली .

"भाईसाब , मै किसीके हाथ से बनाया नही खाती . . . पुरं आयुष्य याच वाटेनं गेलं . नवे विचार मनाला पटतात . पण वाटतं , उरलेल्या चार दिवसांसाठी कशाला नवा रस्ता धरू ? मी चार द्राक्षं घेते . मी तुमची रसोई खाल्ली नाही तरी लौकीचा . . . दुधी भोपळ्याचा हलवा मात्र तुम्ही खायला हवा !" असं म्हणत त्यांनी सर्वांना चवदार हलवा दिला . शेजारच्या तरुण मुलाने खाली उतरून सर्वांसाठी पाणी आणले . पहाटे पहाटे जाग आली त्या तरुण मुलाच्या आवाजाने . "दीदीजी , जयपूर आ गया . आप गहरे नींदमे थी . चाचाजी और मॉंजीने आपको याद दी है . वे अजमेर उतर गये

है ." क्षणभर मनाला चुटपुट लागली . कधीही न भेटणाऱ्या सग्यासोयऱ्यांना किमान डोळ्यात साठवून घेतले असते . जयपूर आले . मी खाली उतरले . घड्याळ्यात पहाटेचे पाच वाजले होते .

दहा दिवस , दहा प्रांतातल्या पन्नासजणींनी राष्ट्रीय एकात्मतेवर किसून . किसून चर्चा पाडली .

मग जयपूर दर्शन झाले . आमेरचा किल्ला पहाणे झाले . जयपूरच्या बाजारातून खरेदी झाली . अनेक मैत्रिणी मिळाल्या . एकमेकींचे पत्ते घेतले . एलीस गर्गच्या बालरश्मी संस्थेचे काम पाहिले .

परतीची वाट धरताना डोळे ओले झाले . पुन्हा भेटण्याचे मनसुबे झाले .

आणि हातीपायी धडधाकट , सुखरूपपणे , (त्या डायरीची गरज न लागता) होय , मी सुखरूपपणे घरी येऊन आता महिना लोटला आहे .

गेल्या काही दिवसात रोज कानावर येणाऱ्या बातम्या , रोज रोज मारली जाणारी निरपराध माणसे , जातीजमातींचे राजकारण , त्यातून होणारे दंगेधोपे . . . हे सारे ऐकून मग उद्विग्न होते . उदास होते .

आणि आठवतो तो आगगाडीचा डबा . त्या डब्यातली आपली माणसे . कालवलेल्या दूधभातासारखे ते पंधरा सोळा तास .

अशा वेळी मनात येते . धर्माच्या ठेकेदारांच्या आणि सत्तेसाठी देवघरातले देवही चौरस्त्यावर विकायला काढणाऱ्यांच्या कोलाहलात , माझ्या देशाचा हरवलेला आत्मा शोधण्यासाठी रेल्वेचा डबा नाहीतर एस .टी . ची धावती बसच गाठावी लागणार का ?

❖❖❖

Manavlok college of social Science
Library
Ambajogai- 431517, Dist. Beed

# मोहसिनाची सल

दोन-तीन वर्षांपूर्वीची गोष्ट. माझी एक विद्यार्थिनी भेटली. अतिशय अस्वस्थ होती. मन कोमेजून गेलं होतं. पण तिचं दुःख कुणाच्याच लक्षात येत नव्हतं. किंबहुना, इतक्या क्षुल्लक नि साध्या बाबीसाठी मोहसिनानं इतकं हळुवार होण्याची काहीच गरज नाही असंच इतरांचं म्हणणं.

कोणतं होतं ते क्षुल्लक कारण?

मोहसिना एम एस्सी झाली. नंतर बी एड झाली. घरातील वातावरण चांगलं मोकळं. सुधारक पद्धतीचं. घरी धार्मिक रीतिरिवाज व्यवस्थित पार पाडले जात. पण मुलींच्या शिक्षणाआड धर्म आला नाही. मोहसिना, तिच्या दोघी वहिणी भरपूर शिकल्या. हुशारीचं चीज झालं.

मोहसिना बी एड झाली. तिचा विवाह झाला.

तिचा पती रज्ज़ाक, दुबईत इंजिनिअर आहे. तो दोन वर्षे तिकडेच राहणार होता. मोहसिना मात्र इकडे राहणार होती. अर्थात सासरच्या घरी.

करमत नाही या सबबीखातर मोहसिनाने नोकरी करायचे ठरवले. त्या छोट्याशा गावात लगेच प्राध्यापिकेची नोकरीही मिळाली. सासू-सासऱ्यांनाही कौतुक वाटले. नव्याचे नऊ दिवस छान गेले. मोहसिना इतर प्राध्यापिकांशी छान मिसळून गेली.

एक दिवस अचानक सायंकाळच्या जेवणाचे वेळी सासरेबुवांनी फर्मान काढले. "बहू कॉलेजमें बुर्का पहनके जाएगी."

सासूने थोडा विरोध केला. म्हणाली, "इतके दिवस बुर्का घातला नाही. लग्नातही बहू बेटा जोडीने समारंभात बसली आणि आता कसा बरा दिसेल बुर्का?"

पण सासरेबुवांनी निक्षून सांगितले, "आपल्या धर्मात स्त्रियांनी बुर्का घातला पाहिजे हा रिवाज सांगितला आहे. आमच्या घरची बहू रस्त्याने बुर्का न ओढता जाणे म्हणजे घराण्याची बेइज्ज़त आहे. बहूने नोकरी जरूर करावी. कॉलेजात गेल्यावर शिकवताना बुर्का काढून ठेवला तरी चालेल; पण रस्त्याने घातलाच पाहिजे."

मोहसिनच्या मनाची तडफड झाली. तिने तिच्या वडिलांना भावुक पत्र लिहिले. त्यांचे उत्तर आले. "तुझं मन मला कळतं. तुझ्या भाभीला मी अशी सक्ती करणार

नाही, असं आज तरी वाटतंय. पण एवढ्याशा गोष्टीवरून अब्बांचं मन दुखवू नकोस. हजारो वर्षांपासून स्त्रिया अशाच बुर्का घालीत आल्या आहेत. बुर्का पहनल्याने तुझी बुद्धी थोडीच कमी होणार आहे? त्यातून रज्ञाकमियाँ इथे नाहीत. ते आल्यावर यातूनही मार्ग निघेल. पण या क्षुल्लक गोष्टीचा बाऊ करून स्वतःचं मन जखमी करून घेऊ नकोस आणि घरच्यांनाही समजून घे."

तिच्या मनाच्या जखमा वडिलांना दिसत होत्या. पण ते तरी काय करणार होते? मोहसिनाने बुर्का शिवून घेतला. तो घालून ती कॉलेजात जाई. पाच मिनिटांच्या अंतरासाठी तिने रिक्षा ठरवली. रिक्षावाला तिचा दुरून मावसभाऊच.

"आपा, ये अच्छा किया आपने," त्यानेही खुशी व्यक्त केली.

आपल्या सहकारी प्राध्यापिकांच्या समोर यायलाही तिला संकोच वाटू लागला. आपण पराभूत झालो आहोत, अशी तिच्या मनाला टोचू लागली. ती मैत्रिणींना टाळू लागली.

सुटीला चार दिवस माहेरी येताच माझ्याकडे धावतपळत आली. खांद्यावर डोके ठेवून रडली. तिला बुर्का घालावा लागतोय यामुळे ती दुःखी नव्हती. तिचं दुःख दुसरंच होते.

"मॅडम, माझ्या माणसांचं मन राखण्यासाठी मी जरूर हा बुर्का घालीन. पण मर्यादा आपल्या वागण्यात, नजरेत नसते का? इतर मुली नाटकात भाग घेतात. गाणी म्हणतात, खेळतात, वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होतात. भरपूर बक्षिसं मिळवून पुढील जीवनात सुंदर स्वप्नं रेखाटतात. पण आम्हाला मात्र या मुलींकडे..... त्यांच्या धडपडीकडे नुसते पाहावे लागते. हे जग, हे जीवन स्त्री आणि पुरुष दोघांचे आहे. आयुष्याच्या पहिल्या वळणावर भेटणारा पुरुष बापाच्या रूपात असतो. वडील समजदार असतील तर मुलगी शिकू शकते. माझे वडील शिकलेले, विचार करणारे आहेत. त्यामुळे मी शिकू शकले. वक्तृत्व स्पर्धेत बक्षिसे मिळवली. त्यांचं प्रोत्साहन मिळालं. पण आज ?

"मॅडम, माझं बुर्का पहेनणं पाहून माझ्याच कॉलेजातल्या माझ्या जमातीच्या मुलीही आता बुर्का पहेनू लागल्या आहेत. त्यांच्या डोळ्यात माझ्यासाठी प्रश्न उभे आहेत असा भास मला होतो. त्याचंच दुःख मला खूप बोचतं.. खूप बोचतं."

मोहसिनाच्या आयुष्यात जे प्रश्न उभे राहिले ते अनेक जणींच्या आयुष्यात निर्माण होत नसतील कशावरून? पण हे प्रश्न सोडवायचे तर ते समाजात राहून संवेदनशील व्यक्तींची संख्या अधिकाधिक वाढवूनच सोडवावे लागतील. एकाची वेदनामय संवेदना असहाय हुंदका बनते तर अनेकांची वेदनामय संवेदना प्रकाशाची वाट शोधते. माझं समजावणं मोहसिनाला आज नाही तरी केव्हा तरी पटेल.

पण खरंच पटेल ना?

❖ ❖ ❖ ❖

## लेकीची बाट माईला!

माझ्या सासूबाई वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी आमच्या घरी रहायला आल्या. मी कॉलेजातून घरी आले तर दादाजींच्या खोलीत दादीजींचाही पलंग टाकलेला. मला जवळ बोलावून त्यांनी सांगितलं, "चटण्याफिटण्या करून इथे माझ्या जवळच्या देवळीत ठेव. सकाळी कालिजात जाण्याअगुदर दोन दुधातल्या दसम्या टाकून माझ्या उशाशी ठिवत जा. दसम्या, दही-दूध, चटणी मला चालतं आणि भावतंही! म्हाताऱ्याला तुझ्या नि तुझ्या बाईच्या हातचा वरणभात, स्वयंपाक चालेल. पुरुषांचं बरं असतंया. त्यांनी देवधर्म नाही केला तरी देव रागावत नाही. पण बायांचं तसे नसते गं. त्यांना समदं पाळावं लागतं. सोताचं नि नवऱ्याचं पन."

हा दशमी, चटणी, दह्याचा रोजचा वरवा नेमका कधी बंद झाला आठवत नाही. एकदा पुरण केलं होतं. नानीनं दादीजींना पोळी खाण्याचा आग्रह केला. पोळी खाण्याचा. मग पुरणात दुधाचा थेंब टाकून ते जेवण चाललं. असं करता करता दादीजी घरात छान रमल्या. आमची शेवंतामावशी दोघा म्हाताऱ्यांची सेवा मनोभावे करी. हौशीने म्हाताऱ्या केसांची जुडी बांधून देई. पायाला तेल लावून वाटीनं घाशी. दोघींची घट्टमिट्ट गट्टी जमली. दादाजींची सेवा सून-लेक काय करतील अशी सेवा करी.

एक दिवस एक म्हाताऱ्या बाई दादीजींना भेटायला आल्या. बोलताना तेढा सवाल विचारून गेल्या. "तुमची सून तर जातपात पाळत न्हाई. करमतं का इथं? बरं निभतं का? आणि इथेच राम म्हटलात तर आम्ही रडायला कुठं यावं? इथं की मोठ्या घरी?"

दादीजींचे आंधळे डोळे भरून आले. त्याही तितक्याच तेढेपणाने उत्तरल्या. "जलमताना जात कपाळावर लिहून तर देव पाठवत नाही. आणि माझ्या लेकराच्या घरी एवढी सत्ता असताना मला न करमाया काय झालं? आता रडायचं म्हणाल तर, आप मेलं नि जग बुडालं. मी थोडीच पहायला येणारेय की तुम्ही रडता आहात की नाही ते! आणि खरंखुरं रडता की नाही ते!"

त्यानंतर काही दिवसांची गोष्ट. दुपारचा चहा मी केला नि पितळीत घालून दादीजींच्या जवळ चटईवर ठेवला. दादीजींच्या हाताला ती पितळी दाखवून दिली. दादीजींचे डोळे पूर्ण विझले होते. पितळी अधरपणे हातात पकडताना त्यांनी नेहमीचा प्रश्न केला. "शेवंताबाई, तुबी चा घेतला जणू?"

"व्हय बाई. मी बी चा घेतेय. पन तुमच्या चटईवर मी बसल्याली न्हाई बरंका. तुमी बिनघोर चा प्या." शेवंताबाईनी उत्तर देताच दादीजींनी चहा चटईवर टेकला नि हातांनी शेवंताबाईला चाचपडू लागल्या.

"शेवंताबाई, तसं नगं म्हणूस. हितं माझ्या शेजारी ये आनि चा पी. पोटची लेक आज दूर न्हायली. तू पोटची होऊन सेवा करतीस. लेकीचा बाट माईला कसा गं व्हईल? आपन मानसासारखी मानसं, हातापायांनी सारखी, उगा देवानं काहीतरी मागं लावलंया म्हणून जातपात पाळायची. आता देवाच्या दारात बसलेली मानसं आम्ही. आम्हाला कसला आलाय विटाळ नि चांडाळ?"

शेवंतामावशीला जवळ बसवून एका चटईवर दोघी चहा प्यायल्या.

वयाच्या पंच्याहत्तरीनंतर मनाला पटलेला हा विचार त्यापूर्वी कधी सुचलाच नसेल का त्यांना? आणि सुचणार तरी कसा? त्यांनी आयुष्याच्या अखेरीला शोधलेली ही उत्तरं त्यांना तरुणपणात सुचली नसतील का? आणि सुचणार तरी कशी? हातभर घुंगटा आडून बाहेरचं आभाळ पहाण्याची संधी मिळाली असेल का त्यांना? आपल्याच प्रश्नांना आपणच दिलेली उत्तरं, मुखावाटे बाहेर पडायला सत्तरी ओलांडावी लागते.

असेच घडणार असेल तर मग आपल्या तरुणाईचे संदर्भ वर्तमानाशी कधी जोडणार आपण? आणि कसे?

आज धर्मांधता विरोधी परिषदेची धावपळ करताना, रोजची वर्तमानपत्रे वाचताना या नि अशा अनेक आठवणी आठवतच राहतात.

पण आठवणी नुसत्या आठवत बसून कसे चालेल? मोहसिना आणि दादीजींच्या मनातले, जीवनातले प्रश्न माझेही आहेतच की!

ते सोडवायचे तर त्यांचे हातही हाती हवेत.

हे जग आपल्या दोघांचे आहे. स्त्री पुरुषांचे आहे!

हे प्रश्नही आपल्या दोघांचे आहेत!

❖❖❖

# फुंकर

रस्त्यांच्या पलीकडे कुणाच्यातरी घराचे बांधकाम सुरू होते. वैशाखाचे ऊन अंगात टचाटचा लागेपर्यंत सारे मजूर काम करीत आणि दुपारी साडेबाराच्या सुमारास भाकरतुकडा खायला माझ्या घरासमोर चिंचेखाली येत.

जेवणखाण आटोपून, स्वैपाकघर नीटनेटके झाकूनपाकून जरा आडवी व्हायचा विचार करतेय तोच कोणीतरी हाक घाली. "ताई, चरवीभर पाणी द्या प्यायला."

पुन्हा थोड्या वेळाने कोणीतरी हाक घाली.

"ताई, चरवी ठिवा आत. अन् दार बी वढून घ्या. आमी चाललाव कामावर."

त्या वैशाखी उन्हात डोळ्यांवर अशी छान झापड येई की मीही चरवी नेणारे आणणारे कोण, कुठले याची दखल घेत नसे. पण त्या आवाजातला आश्वासक ठाकर स्वर माझ्या खूप परिचयाचा झाला होता.

एक दिवस बाळाच्या केकाटून रडण्याच्या आवाजाने मी दचकून जागी झाले नि बाहेर आले. तर झाडाच्या विरळ सावलीत एक चिमुकले बाळ अंगावरचे पटकूर हातापायाने झाडीत कळवळून रडत होते.

बाळाची आई कुठेय म्हणून इकडेतिकडे नजरेनेच शोध घेतला. तर अवतीभोवती कोणीही नाही.

आता बाळाला उचलणे भागच पडले. डोक्याला गोंड्याचे टोपडे नि अंगावर गुंडाळलेली जुनीपानी कुंची. झिजून चिंधाटलेली.

कुबट वास येणारी गोधडी अंगाखाली. तिचाच एक पदर अंगावर टाकलेला. त्या चिंधाटलेल्या गोधडीत रडून रडून लाल झालेला तो तांबडा गोळा. जेमतेम पंधरावीस दिवसांचा.

मी ते बाळ हळूच उचलून घेतले. बांधकाम सुरू होते त्या घराकडे रस्ता ओलांडून गेले.

मला नि माझ्या हातातल्या त्या बाळाला पाहून कामावरचा मुकादम क्षणभर गरून गेला. दुसऱ्याचा क्षणी त्या लेकराच्या आईच्या नावाने ओरडू लागला.

"शोभ्ये ये शोभ्ये ऽ कुठं उलथली की बाई, अरं बगा रं जरा त्या तरवड्याच्या

पोरीला . लेकराची काय सुदबुद हाय का नाय ? समूरच्या डागदरीनताई लेकरू घिऊन हितवर आल्या . आत्ता काय म्हनावं या बाईला ?"

तो तणतणतोय इतक्यात , सिमेंटच्या काल्याने माखलेली शोभा कसनुशा चेहऱ्याने आली . आर्धा मळलेल्या लुगड्याला हात पुशीत तिने लेकरू माझ्या हातातून घेतलं जरा बाजूला आमच्याकडे पाठ करून ती बसली . क्षणभरात बाळाचे रडे थांबले .

"ये भवाने , ते प्वार तुज्या म्हाताऱ्या बा जवळ ठिऊन येत जा . ते बारकं पोर घेऊन येतीस नि त्येच्या निमित्तानं कामचोरपना करतीस . तुजी कीव केली तर तू लईच डोक्यावर बसाया लागलीस . लेकरू तिथं कशाला निजिवलं ? एवढ्या मोठ्या घरच्या बाईनला उगाच तरास ."

"छे ! मला कुठला आलाय त्रास ?" मी मुकादमाचं बोलणं अडवीत बोलले .

शोभाने माझ्याकडे पाहिले . त्यात आपलेपणाची चमक होती . कपाळावरचा घाम चुंबळीच्या फडक्यानं पुशीत ती बाळाला पाजीत होती . त्या दगडविटामातीच्या गोंगाटात , बाळाच्या दूध पितानाच्या तृप्त हुंकाराची आदिम लय माझ्या मनाला स्पर्शून गेली आणि मी नकळत म्हणाले , " अगं , झाडाखाली एकटं लेकरू कसं झोपवलंस ? घराच्या व्हरांड्यात झोपवायचंस . हाक तरी मारायचीस मला ."

खरे , मी असे म्हणाले पण खरोखर ती लेकरू ठेवायला आली असती तर , मनाच्या आतून भावले असते मला ? माझ्या बोलण्यावर तिचा विश्वास बसलाय असे तिच्या संकोचलेल्या हसण्यातून मला मुळीच जाणवले नाही . तो नक्कीच वाटला नसणार .

पण एक दिवस अचानक वळीवाचा पाऊस खुळ्यासारखा कोसळला . रस्त्यावर पाणीचपाणी . अंगण चिखलानं भरलं . त्या दिवशी दुपारी शोभा बाळाला व्हरांड्यात झोपवून गेली . पुस्तके वाचतावाचता नि पेपर चाळता चाळता त्या बाळाकडे नजर टाकणे अगदी सोपे होते . आपल्या मनाला कोणत्यातरी कोपऱ्यातून ते सुखावणारे आहे , हे मला उमजले .

माझ्या अठरा वर्षाच्या मुलाचे लहानपणचे कपडे मी त्याच्या मुलाला हौशीने घालण्यासाठी जीवापाड जपून ठेवले होते . ते मी कधी खाली काढले कोण जाणे . ते बाळही मला आता छान ओळखू लागले . त्या नव्या जुन्या कपड्यांचे अप्रूप त्याच्या आईला वाटले . अठरा वर्षापूर्वीचे ते दुभते दिवस पुन्हा एकदा याद देऊन गेले !

मग शोभाची नि माझी ओळख चांगली दाट होत गेली .

शोभाचे वडील मोंढ्याजवळच्या झोपडपट्टीत रहातात . ते खूप म्हातारे आहेत . तिचा भाऊ किसन्या मुका आणि बहिरा आहे . शोभाची माय , शोभाच्या म्हाताऱ्या बापाजवळ रहात नाही . तिने दुसरा घरोबा केलाय . ती सिग्नलकँपात रहाते . ती दुसऱ्या माणसाबरोबर पळून गेली तेव्हा शोभा होती सात वर्षांची आणि किसन्या चार वर्षांचा .

शोभाचा बाप साधा हमाल. शिवारात नाही शेत आणि गावात नाही घर. अशा भणंगाला बायको कोण देणार? वयाच्या पन्नाशीपर्यंत तो बिनबायकोचा राहिला. मजुरी करून साठवलेले पैसे शोभाच्या मामाच्या खिशात पडले तेव्हा शोभाच्या बापाला तरणी बायको मिळाली. पण तिला हा म्हातारा नवरा कसा आवडणार? काही उमजेसमजेस्तवर दोन लेकरं झाली. पण तिचे मन कधी घरात गुंतले नाही. तिला तरणाबांड जोडीदार मिळताच या दोन पोरांना म्हाताऱ्याच्या दारात टाकून ती पळून गेली. बाप आडतीतली पोती पाठीवर वाहून वाहून पोक्या बनला होता. पोरांसाठी तो खूप कष्ट करी. पण शोभा जसजशी वाढू लागली तसा त्याच्या जीवानं धसका घेतला. त्याला वाटे, घरात बाई माणूस नाही. उद्या पोर न्हातीधुती झाल्यावर तिच्यावर कोण नजर ठेवणार? या भीतीने त्याने शोभाचे शहाणी होण्यापूर्वी, वयात येण्यापूर्वी लग्न लावून दिले. आणि तो असा मोकळा झाला. खेड्यापाड्यातले बहुतेक बाप असेच मोकळे होत असतात.

शोभाचे सासर गावातच आहे. नवरा रेल्वे लाईनीपलीकडच्या झोपडपट्टीत राही. तो मालमोटारीवर किन्नर म्हणजे क्लिनर होता. शोभा वयात आली आणि दीड वर्षात तिला लेकरू झाले. नवरा गाडीबरोबर गावोगाव हिंडायचा. एकदा गाडी लाईनीवर धावू लागली की पंधरापंधरा दिवस तो बाहेर राही. घरात अजाण बायको. जेमतेम चौदापंधरा वर्षाची. त्यातून गरबारशी. त्याने बाहेर कुणाशीतरी संधान बांधले. एक दिवस घरी परत येताना त्या बाईला घेऊनच आला. शोभाला त्याने बजावले, "हिला मोठी भन मानून घरात न्हाईलीस तर भाकरतुकड्याला कमी करणार न्हाई. अंगभर ल्यायालाबी मिळंल. पन हिच्याम्होरं श्यानपना केलास तर याद राख."

"ताई, ते दोघं गुलुगुलू बोलत, चावटपणा करीत. त्या येका झोपडीत मी डोक्यावर पदर घेऊन पडून ऱ्हाई. पुढे लेकरू झालं ते रडाया लागलं की नवरा म्हणे बाहिर बस. त्यानला रडण्याचा तरास होई. दारातल्या कुत्रीवाणी शिळंतुकडं खाताना जीव नकुसा वाटे. एक दिवस दहा दिवसांचं लेकरू घेतलं नि बापाच्या घरी आले. पन बाप असा म्हातारा. दुसऱ्या दिवशीपासून गवंड्याच्या हाताखाली कामाला जाऊ लागले. बसून कोन खाऊ घालणार गरीबाला?"

मी सोळाव्या वर्षी पुण्याला कॉलेजात गेले तेव्हा माझ्या आईला प्रश्न पडला होता की माझ्या कुरळ्या केसांच्या दोन वेण्या कोण घालणार त्या हॉस्टेलात?

हळूहळू शोभा आमच्या घरात नि माझ्या मनात रुळू लागली. ती कामावर येताना बाळ आमच्या ओट्यावर बिनधास्त झोपवी. शिवाय मधल्या सुट्टीत भराभरा भाकर खाऊन माझ्याकडे येई. जुनी पाटी नि पेन्सिल घेऊन लिहायचा सराव करी. तशी ती तिसरी झालेली होती. पेपर हातात घेऊन अक्षर लावून वाचत बसे. ती चौथीची परीक्षा देणार होती. एका प्रौढसाक्षरता वर्गात मी तिचे नाव लावून आले होते. चौथी

पास झाल्यावर काय करायचं यावर बोलण्यात तिला खूप रस वाटे. त्याबद्दल बोलताना लागली की तिचे डोळे चमचमायला लागत. चौथी पास झाल्यावर ती चहाचे छोटेसे दुकान घालणार होती. किंवा मी तिला एखादे चांगलेसे सावलीतले काम लावून देणार होते. शोभा आता खऱ्या अर्थाने वयात येऊ लागली होती. तिच्या डोळ्यातल्या कोवळेपणावर स्वप्नांची मऊ साय धरू लागली होती.

तशातच एक दिवस -

एक दिवस सकाळी तिचा मुका वहिरा भाऊ घरी आला. चित्रविचित्र आवाज आणि खुणा करून सांगू लागला. मला ते काही उमजेना. मी शेवटी पायात चप्पल सरकावून त्याच्या मागे गेले.

पोलिस चौकीत जाण्याची माझी ही पहिलीच वेळ. क्षणभर वाटले होते की फिरावे मागे. पण मी आत गेले. चौकीच्या ओट्यावर शोभा बसलेली. चेहरा सुजून भोद झालेला. पुढचे दोन दात पडलेले. तोंड रक्ताने लडबडलेले. हातावर ओरखडे. कपाळावर जखम. कपडे फाटलेले. शेजारी दीनवाण्या चेहऱ्याचे म्हातारे वडील. मला पहाताच तिचा बांध फुटला. ती धाय धाय रडू लागली. धड बोलता येईना.

शेवटी तिचे वडील सांगू लागले. "ताई, आठ दिवसापासून शोभाचा नवरा आमच्याकडे चकरा मारू लागलाय. ती भटकभवानी काय सौंसार करनार व्हती का लगनाच्या वायकूवानी? चारदीस रंगढंग केले नि गेली निघून. तवा या दादल्याला आठवण झाली हक्काच्या वायकूची. शोभा काही तयार हुईना त्येच्याकडं जायला. मी म्हनलं तिला बाईमानसानं लई वढून नाई. जा घरी, पण हिला ते नगं वाटतं. तिला काय की ती शाळंत परीक्षा द्यायची म्हनं. ती म्हटली की त्यानं टकुऱ्यात काठी हाणली. लई मारलंय माज्या पोरीला. ते न्हानगं पोर घेऊन मी पळालो म्हनून ते जितं राहिलं. जावाई कसला रेडा हाय रेडा, माजलेला!"

शोभाची वैद्यकीय तपासणी करून घेतली. रीतसर तक्रार नोंदवली, मार खूप लागला होता. कोर्टात केस सुरू झाली,

अशात शोभा गप्प असे. कुठेतरी एकटक नजर लावत राही. पहिल्यासारखी मोकळेपणानी बोलत नसे. तिच्या मनात काहीतरी खळबळ असावी. तिला कोर्टाचे विलक्षण भय वाटे. खरे तर मलाही वाटायचे. पण मी तिला धीर देई. तिने धिटाईने, न घाबरता साक्ष द्यावी म्हणून पटवत असे. अखेर साक्षीचा दिवस उजाडला.

संध्याकाळी शोभा मला भेटायला येणार होती. ती आलीच नाही. ते दिवस होते संक्रांतीचे. सणवार, हळदीकुंकू या गर्दीत मीही बुडून गेले.

दिवस उलटले. महिने उलटले. शोभा आलीच नाही. मनातून तिची याद येई. पण शोधणार तरी कुठे? आणि माझ्यासारख्या बाईने झोपडपट्टी धुंडाळत हिंडणे जरा अवघडच ना! मग मीही तिला मनाच्या मधल्या कप्प्यात बंद करून टाकले.

एकंदा सरकारी दवाखान्यात मैत्रिणीला भेटायला गेले तर अचानक शोभा दिसली. मीच हाक मारून तिला बोलावले. माझ्या मनातली उत्सुकता सुळकन बाहेर आली

"झाली शिक्षा नवऱ्याला?" माझा प्रश्न.

"न्हाई ताई, नवऱ्यानं मला मारलं न्हाई; मीच पाय घसरून दगडाच्या दरडीवर पडले अन मार लागला असा सायवांसमूर खोटा जबाब दिला! सायवांनी इचारले की पोलिसासमूर का खोटं बोलली? तर्शी सांगितलं की आजूबाजूच्या बायांनी तसं बोलं म्हनून मला गळ घातली. मग काय दिलं सोडून त्याला." शोभा खाली मान घालून बोलली.

ती बोलताना चेहरा खूप पडलेला असावा " त्या आया बाया कोण? मी तर नव्हे?" असा प्रश्न विचारावासा वाटला.

माझ्या जरा जवळ येऊन ती हलक्या आवाजात सांगू लागली. "ताई, त्या पिंजऱ्यात हुबं ऱ्हाईल्यावर माज्या लक्कन मनात आलं. तो जर का तुरुंगातून सुटून भाईर आला नि मगं माझ्या सोनीला त्यानं मारलं तर? नाहीतर मलाच मारून टाकलं तर? त्या रेड्याचा काय भरवसा? तुम्हाला वाईट वाटलं म्हनून मी तिकडे आले न्हाई. तिकडची कामं सोडून दिली."

मी सुन्नपणे रस्ता कापत होते. अचानक मला आठवले. एक प्रश्न विचारायला विसरले होते मी. मला विचारायचे होते. "शोभा, पण सध्या तू कुठे राहतेस? बापाकडे की नवऱ्याकडे?"

पण दुसऱ्याच क्षणी मनात आले. बरं झालं प्रश्न विचारला नाही ते. तेवढीच माझ्या मनावर फुंकर! कुणी सांगावं? की तिच्या.

❖❖❖

# उत्तरांच्या शोधातले प्रश्न

त्या गावढ्या गावात रेखीव अक्षरात इंग्रजी सही ठोकणारी बाई सापडेल असं स्वप्नात देखील वाटलं नव्हतं. रेणुका जी. शर्मा या बाईला पहाण्याची खूप उत्सुकता दाटली माझ्या मनात. आमच्या माताबालसंगोपन प्रकल्पाच्या वतीने सामशाला बैठक होती. गावातल्या बायका झाडून जमा झाल्या. आता एवढ्या बाया गुणिले पाचपट मुले! शेवटी मी बारक्या पोरांना गाणी गोष्टी सांगून घुलवले आणि माझ्या इतर मैत्रिणींनी बैठक घेतली. आलेल्या महिलांची यादी केली व सह्या घेतल्या. सह्या कसल्या? अंगठेच! तर, त्या अंगठ्याच्या घेऱ्यात ती सुरेख सही पाहून मी चकित झाले. रेणुका सहीइतकीच आखीव रेखीव होती.

"मी पी.यू.सी. झालेय ताई. पण आता मात्र सहीपुरतं इंग्रजी शिल्लक राहिलंय माझ्याजवळ." ती दुखरं हसू ओठावर आणीत म्हणाली. तिच्या कडेवरचं बाळ खूपच रडायला लागलं. मग घाईघाईनं तिला निघावंच लागलं.

"कधी आलात औरंगाबादला तर जरूर या घरी. ही भेट काही खरी नाही हं!"

मीही तिला मनापासून निमंत्रण दिले.

त्यानंतर कधीतरी तिची आठवण यायची. पण थोडीफार मीही विसरून गेले होते तिला.

एक दिवस, धुवट पायजमा, डोक्यावर टोपी, कपाळावर गंधाची टिकली, गळ्यात सोनसाखळी, अशा वेशातला तरुण दबकत दबकत घरी आला. आणि त्यानं चिट्ठी दिली,

*आदरणीय दीदी,*

*तुमची नेहमीच आठवण येते. पण घराच्या व्यापातून कुठली आलीय सुटका? येत्या रविवारी आमच्या शेतावर हुरडा खायला मुलांसह या. दुपारचं जेवण माझ्या घरीच घ्या, मी मनापासून वाट पहातेय.*

*तुमची*

*रेणुका जी शर्मा.*

मला वाटलं दुकानातल्या मुनीमावरोवर दिली असेल चिट्ठी.

"वाईंना सांगा मी निश्चित येण्याचा प्रयत्न करते. पण वाट पाहू नका." मी त्याच्याजवळ तोंडी निरोप दिला. तशी आग्रहाच्या स्वरात तो म्हणाला, "सचिनच्या ममीनं लई आग्रेवानं बोलिवलंय. तिचा हिरमोड करू नका. जरूर या.येताव आम्ही." तो छपरी मिर्शीवाला तरुण चहापाणी न घेताच निघून गेला.

रविवारी रेणू आमची वाटच पाहात होती. तिच्या उत्साहाला उधाण आले होते. सारखी हसत होती आणि धावतपळत होती. ऊस आणा, हुळा आणा, कोवळी वाळकं आणा...असा घोष चालला होता. मी त्या वातावरणाने काहीशी सुखावून गेले.

"रेणू, या आडगावात तुला पाहून खूप आश्चर्य वाटलं आणि वरंही वाटलं. अशा गावात खूप काम करू शकशील तू. पण इथवर पोचलीस कशी?"

"दीदी, धनवान माणसांच्या दानधर्म करण्याच्या रीतीही अशा असतात की त्या ओझ्याखाली माझ्यासारखीचा वळी सहजपणे दिला जातो." रेणू वरकरणी हसत होती, पण स्वर दुखावलेला होता.

"मी नाही समजले तुझ्या बोलण्याचा अर्थ." मी म्हणाले. खरोखरच मला तिचे बोलणे उमगले नव्हते.

"दीदी, कशाला जुन्या जखमा उकरून काढू मी? तुम्ही भेटलात. आलात. कित्येक विषयांवर मनसोक्त गप्पा मारल्यात. जीव सुपाएवढा झालाय माझा. आज आनंदाचा दिवस आहे. आज नकोत त्या जुन्या आठवणी! एकेकदा राख फुंकरून निखारा फुलवला की तो लवकर शांत होत नाही." रेणुकाला स्वतःविषयी बोलण्याची इच्छा नव्हती. मीही विषय बदलला.

त्या दिवशी निमंत्रणाची चिट्ठी द्यायला आलेला तरुण तिचा नवरा होता. तो स्वतः हुर्डा भाजायला बसला होता. अत्यंत नरम आणि गोड असा मऊचा हुर्डा. खोबऱ्याची चटणी. साईचं दही. कोवळी वाळकं. ओला टहाळ. रानातला मेवा समोर होता. माझी मुलं या नव्या मावशीवर खूश होती. माझं मन मात्र रेणूच्या मनाचा वेध घ्यायला उत्सुक होतं. तिच्या तुटक बोलण्याने मी आतून हवकले होते.

चतुर रेणूच्या ते लक्षात आले असावे. तिने हलक्या आवाजात मला विनवले. "दीदी, नाराज नका होऊ. औरंगाबादला येईन तेव्हा डोक्यावरचं ओझं तुमच्याच समोर मोकलून बसणारेय मी. डोक्याला हा भार कधी कधी पेलवत नाही. खूप बोलायचंय मला तुमच्याशी. खूप "

आणि एक दिवस खरोखरच रेणू आली. मुलं घरी ठेवून आली. रात्रभर राहिली. रेणू बोलत होती नि मी ऐकत होते.

"...मी आईच्या पोटात होते तेव्हाच माझे वडील वारले. जेमतेम सोळा वर्षांची होती आई. ब्राम्हणाची जात आधीच सनातनी. त्यात तिच्या माहेरी दारिद्य. ती

अडाणी बाई काय नोकरीधंदा करणार होती ? तिने हाती पोळपाटलाटणे धरले. मारवाडी समाजात ब्राह्मणांना खूप मान देतात. ज्या घरी ती स्वैपाकाला राहिली, त्या शेटजींनी तिला बहीण मानले. घरच्या स्त्रिया तिला रसोईवाल्या बाईजी या नावाने बोलवीत. मान देत. हे काम इज्जतीचे होते. त्यांच्याच वाड्यात एक खोली आम्हा मायलेकींना दिली होती. त्या घरच्या लेकरांबरोबरच माझेही नाव शाळेत घातले गेले. वर्गाची एकेक पायरी सहजपणे चढत गेले. लहानपणापासूनच मला घरकामाचा फार कंटाळा. अभ्यास मात्र मनापासून आवडे. दरवर्षी वर्गात मी पहिली येई. पण माझ्या हुशारीचं कवतीक ना माझ्या आईला की ना तिच्या मालकिणीला. लेकीच्या जातीनं कसं भरपूर काम करावं, शिळंपाकं खाण्याची सवय ठेवावी असं त्यांना वाटे. मी कळती झाल्यावर माझ्या लक्षात आले की जर मी कामाला हात लावला नाही तर माझं शिक्षणही बंद होईल. त्या धास्तीने मी घरकामही रेटून करू लागले. रात्री अभ्यासासाठी जागू लागले. दहा माणसांचं घर. त्यातून वड्या मालदाराचं. नेहमीच पैपाहुण्यांनी भरलेलं. त्यातून आमचा समाज धार्मिक. बारा महिन्यांचे अठरा सण. व्रतवैकल्यांची तर खैरात असे. माझी आई मला पूजापाठ कसा करायचा, कहाण्या कशा सांगायच्या, कोणत्या व्रताला कोणता स्वैपाक करायचा, त्याची बारकाईने माहिती देई. त्या तसल्या वातावरणात मी सातवीला बोर्डात पहिली आले. मालकांचा धाकटा मुलगा पुण्याच्या लॉ कॉलेजला शिकायला होता. त्याला माझ्या हुशारीचे अप्रुप वाटे. तो सुट्टीला येताना माझ्यासाठी पुस्तकं आणी. मॅट्रिकला ७९% गुण मिळवून मी पास झाले. हट्टाने कॉलेजला गेले. मालकांचा मुलगाही वकिली करू लागला होता. त्याच्याहून मोठा मुलगा दुकानावर असे. दुकानाच्या प्रचंड नफ्यापुढे वकिलीचे पैसे त्यांना चिरीमिरीसारखे वाटत. "म्हाका वकिलसाव दिनभर बड्डीबड्डी किताबां बाँचर थक जावे. कोरटमा जार आया की, व्याका काळा कोटमा देखण जावाँ तो दसकी पत्ती भी कोनी मिलवाकां. ( आमचे वकीलसाहेब जाडजाड पुस्तकं घेऊन बसतात, पण कोटातून आल्यावर खिसा चाचपावा तर दहाची नोट देखील त्यात सापडत नाही !") अशी कुचेष्टा त्यांची भाभी आणि इतर मंडळी करीत. त्यांच्या मनात माझ्याविषयी नाजूक भाव असावा. एक दिवस तो कॉलेजच्या कॉर्नरवर मला भेटायला आला. पण काय बोलावं हे त्यालाही कळलं नाही आणि मलाही कळलं नाही. हृदयातील ती वेगवान थरथर ... प्रचंड वादळात सापडलेल्या सायलीच्या वेलीसारखी. ती मात्र अजून आठवते. "

बोलता बोलता रेणू क्षणभर थांबली.

" आम्ही कॅन्टीनमध्ये चहा प्यायलो. आणि काही नाही. बस्स ! परीक्षा जवळ येत होती. डॉक्टर होण्याची नशा माझ्यावर चढत होती. थंडीचे दिवस संपले होते आणि शेटजींना पुण्य कृत्य करण्याची लहर आली. शेटजींना. विशेषकरून

शेटाणीजींना . त्यांना चार लेकी . त्याही शादीशुदा . आपल्या हिंदू समजुतीनुसार पंचकन्यांचे कन्यादान केले की फार मोठे पुण्य लाभते . मोक्षमार्गातील अडथळे दूर होतात म्हणे ! आणि आवश्यक असलेली पाचवी लेक घरातच असल्याचं त्यांच्या लक्षात आलं .आयुष्यभर त्यांच्याच अन्नावर वाढलेल्या आम्ही मायलेकी .नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता . विरोध करण्याची कल्पनाही आईला सहन झाली नसती .आणि मी ?

माझं मन खूप फडफडले , तडफडले . आकाशात झेपावण्यासाठी पंखात जरा कुठे बळ येतेय असे जाणवत असतानाच पंख कापून काढावेत तशी मी . माथ्यावर अथांग पण सुन्न आभाळ . माझी आई मात्र खूप खूश होती . तिला वाटे की ती रांडमुंड बाई . पाठीला आधार नाही . पोटाला लेक मुलगा नाही . माहेर नाही . त्यात पदराशी न्हातीधुती लेक . तिच्यासाठी कोण शोधणार चांगला मुलगा ? पुन्हा हुंड्यासाठी पैकाअडका कुठून आणणार ? शेटाणीजींच्या उपकाराखाली ती पार वाकून गेली होती .

मींही मुकाट्याने बळी जायचे ठरवले . आधाराची आशा असेल तर आकान्ताला अर्थ ! पण जिथे आधारच नाही तिथे तमाशा कशाला करायचा ? सगळ्या सोपस्कारांना मी सामोरी गेले . समोर आला त्याला माळ घातली . तो कोण ? कसा ? कांही चौकशी केली नाही . सचिनचे बाबूजी चौथी पास आहेत . त्यांना मायबाप नाहीत . म्हाताऱ्या आज्याने सांभाळ केला . घर आहे . पंधरा एकर पाण्याखालची शेती आहे . वाड्यात दुकान आहे किराणासामानाचं .

नांदेडसारख्या शहरातून या आडगावात सामशाला आले . आजेसासरा एवढा खडूस की रोज चहासाखर काढून ठेवी . सर्व सामानाला कुलूप लावी . मी पुस्तक वाचलेलं खपत नसे . एकदा मासिक वाचत होते , तर हातातला अंक चुल्हाणात फेकूनं दिला त्यांनी . सचिनचे वडील समंजस आहेत . त्यांना माझ्या शिक्षणाबद्दल आदर आहे . गेल्या आठ वर्षात मीही या घरात रुळले आहे . उरातल्या जखमा झाकून जगायला शिकले आहे .

पण . . . पण कधी कधी जीव इतका गुदमरून जातो की , तुळशीवृंदावनाच्या तळाशी पुरलेली स्वप्नांची भुतावळ समोर येऊन नाचू लागते . शेटजी आणि शेटाणीजीला पुण्य मिळालं की नाही ते देवच जाणे ! पण , मी शिकले असते तर आज कुठे असते ? कोण झाले असते ?"

गाडीला ब्रेक बसावा तशी रेणू थांबली .

मी डॉक्टर नक्कीच होऊ शकले असते . माझा नवरा कसा असेल ? माझं घर कसं असेल ?

माझ्यासमोर उत्तरांच्या शोधातले अनुत्तरित प्रश्न होते . कुणाजवळ आहेत त्यांची उत्तरं ?

❖❖❖

# बेशरमीची झाडं

उर्मिला

प्रिय मनू,

तुला भेटून गेल्यापासून तुला पत्र लिहायचं म्हणतेय. पण त्यासाठीही सहा महिने घालवावे लागले. किती अचानक भेटलीस तू? भीमाशंकराच्या निमित्ताने त्या एवढ्याशा गावात मी आले. आणि लहान लहान झोपड्यांचं हॉस्पिटल आणि शाळा पाहून फाटकाच्या आत शिरले. तर काय, तिथे चक्क तू होतीस! दोन मिनिटे डोळे फाडफाडून पहात होते मी! की खरंच तू आहेस ना? तुझं झोपडीवजा घर. आदिवासींच्या मनातला माणूस जागा करण्यासाठी रात्रंदिवस धुंद होऊन काम करणारा तुझा नवरा. शाळेत रमलेली तू. तुझ्या घरात, तुझ्या बिछान्याजवळ असलेली, सायलीच्या कळ्यांनी भरलेली नाजूक टोपली. टेबलावरचे तुझ्या मुलांचे फोटो, त्यांची पत्रं. तू प्रेमाने खाऊ घातलेले नारळाच्या दुधातले पोहे ... या साऱ्या गोष्टी मला आठवताहेत. खरं तर किती कमी बोललो आपण! हातात हात घेऊन नुसत्या हसत होतो. हसण्याचा पहिला बहर ओसरून बोलायला लागणार, तेवढ्यात माझा नवरा गाडी घेऊन मला शोधत तिथे आला. घाईघाईने मला घेऊन निघून गेला. मी त्या दिवसापासून अस्वस्थ आहे. तो मला घ्यायला आला तेव्हा धड बोलण्याच्याही अवस्थेत नव्हता. तुमच्याशी किती नाटकी बोलला तो! आठवलं तरी लाज वाटते मला. तू कुठल्यातरी बंगाली डॉक्टरांशी लग्न करणार असल्याची बातमी उडत उडत आमच्यापर्यंत आली तेव्हा आम्हाला तुझ्या नवऱ्याबद्दल खूप उत्सुकता वाटली होती. खरं सांगू? तू हे धाडस करत आहेस त्याबद्दल, अगदी खोल खोल ... मनाच्या तळात असुयाही वाटली होती. पण तरीही, असलं जातीबाहेरचं लग्न करून तू सुखी होशील असं मुळीच वाटलं नव्हतं. एका सरळ रेघेतलं मध्यमवर्गीय आयुष्य जगणाऱ्या आम्हां मुलींना तो एक अगोचरपणा वाटला होता. प्रेम करणं म्हणजे काहीतरी आचरटपणा करणं हीच आमची समजूत. तोच आचरटपणा आम्हीही केला. पण आईवडिलांच्या मार्गदर्शनाखाली! पहिली रात्रसुद्धा भटजीबुवांच्या मंत्रांनी युक्त

आर्शीवादाने साजरी केली. तुला आठवतं? माझं लग्न ठरलं तेव्हा आपण ज्युनिअर बी.ए.ला होतो. साखरपुड्याच्या वेळी माझ्या बाबांनी पाच हजार रुपयांचा चेक माझ्या नवऱ्याच्या हाती समारंभपूर्वक दिला. मीही दागिन्यांचा घाट आणि वजन निरखण्यात गर्क होते. माझ्या लग्नासाठी बाबांनी दहा हजार रुपयांचं कर्ज काढलं. पण त्यात मला काहीही गैर वाटलं नाही त्यावेळी. उलट वाटलं, मला इंजिनिअर नवरा मिळून माझा भविष्यकाळ सुखी जायचा असेल तर त्यांनी एवढा खर्च लग्नात करायला हवा. कॉलेजमध्ये येताना खुळ्यासारखं प्रदर्शन करायची मी, माझ्या साड्यांचं आणि दागिन्यांचं.

लग्नानंतर उटकमंडला गेलो. नवरा, नव्या साड्या, परदेशी वस्तू आणि मी. त्या पसाऱ्यात धुंद होत गेले. प्रणयाचे रंग गडद होण्यासाठी दारू हवीच हा माझा अडाणी गोड गैरसमज.

पहिली दोन वर्षे भिंगरीसारखी गेली. गौतमीच्या वेळी दिवस राहिले आणि मी थोडी जमिनीवर उतरले.

तीन महिन्यांच्या गौतमीला घेऊन घरी आले तेव्हा लक्षात आलं की नवरा दारूच्या कवेत गेलाय. आणि दारू घेतली की त्याला बाई लागतेच. मग ती कुणीही असली तरी चालते. मीही त्याच्या दृष्टीने बाईच होते. पण आई झाल्यामुळे माझ्यातले बाईपण हरवत चालले होते. त्याला जे हवं असे, ते मला देता येत नसे. मग काय बाट्टेल ते! कधी कधी त्याचे मित्र, त्याचे सहकारी, रात्री उशिराने त्याला घरी आणून टाकीत.

चार बायकांच्यात जायचीही मला लाज वाटू लागली. गेल्या सहा वर्षात तर मी स्वतःला इतरांपासून खुडून घेतलंय. मध्यन्तरी धाकट्या नणंदेला जवळ ठेवून घेतलं होतं. पण तिच्या मैत्रिणीवरही याची नजर गेली.

माझी गौतमी आता मोठी होत चालली आहे. खरं तर तिलाही खूप एकटेपणा वाटतो. पण तिला दुसरं भावंड देण्याची ताकदही या दारूमुळे संपली आहे. माझ्या घरात परदेशी रेकॉर्डप्लेअर आहे, टेप आहे, मिक्सर आहे, फ्रीज आहे, खूप काही आहे ... मीही आहे.

कधी कधी वाटतं, गौतमीला या घरापासून दूर एखाद्या वसतिगृहात ठेवावं. पण तेवढाच एकुलता एक रेशमी तुकडा माझ्या जीवनात आहे. तिच्या वडिलांना सोडून, दूर कोठेतरी एकटं राहण्याचा विचार माझ्या मनात खदखदतो आहे.

पण मना, कुठं जाणार मी? बाबा आता नाहीत. आईच हेमंताकडे रहाते. माझ्या लग्नाचे कर्ज हेमंताने फेडले. त्या दहा हजारात माझ्या उभ्या आयुष्याचं सूत्र माझ्या नवऱ्याच्या हातात देऊन टाकलं सर्वांनी. चार दिवस माहेरी गेले तर कौतुकाने वहिनी

माहेरपणा करीलही . पण हक्काचा आधार शोधण्यासाठी माहेरी जाण्याचा हक्क मी गमावला आहे .

आणि गेल्या वर्षी पस्तिशी ओलांडली मी . माझ्या एम .ए .च्या डिग्रीला काय किंमत आहे या क्षणी ? नुस्ते कागद आहेत ते माझ्यासाठी . माझ्या दारुड्या नवऱ्याच्या पगारातले निम्मे तरी पैसे गौतमी अन् माझ्यासाठी मिळतील अशी कुठे आहे सोय ? आहे असा कायदा ?

माझा नवरा क्लास वन ऑफिसर आहे . कामं कशी करायची आणि करवून घ्यायची हे तो चांगलं जाणतो . त्याचं दारू पिणं , स्त्रियांचा उपभोग घेणं हे समाजाला बोचणार कसं ? उलट त्यानं दारू प्यायलाच हवी . त्याच्या पोझीशनसाठी . अलीकडे त्याचे हात थरथरतात . शुद्धीवर असला की इतकं लाघट बोलतो की माझा ताठरपणा गळून जातो . आणि सहवासाने , संस्काराने निर्माण झालेला आपलेपणा मुळासकट करवाडून काढताही येत नाही . समजेनासं झालंय मला ,नेमकं काय करू मी ते !

गौतमीच्या भविष्यासाठी नवरा , घर , वैभव यांच्याकडे पाठ फिरवून , स्वतःचं अस्तित्व शोधून, कर्तृत्वाची जमीन शोधून ताठ उभी राहू? की गौतमीच्याच पालनपोषणाची आणि लग्नाचीही सोय व्हावी म्हणून , फ्रीजवर ठेवलेला चकचकीत प्लॅस्टिकचा फ्लॉवरपॉट बनून इथेच राहू मी ?

मन्ना , हे सारं करताना गौतमीचा मी ढाल म्हणून उपयोग करतेय का ? की मलाच स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घ्यायचा आहे ?

तुझा संसार पाहून खूप तृप्त झाले मी . आता पायाखाली जमीन सापडतेय असंही वाटू लागलंय . जीवनातला फार मोठा निर्णय घेऊन तुझ्याकडे आले तर ,मला हवं असलेलं घर आणि मला हवी असलेली पायाखालची जमीन मिळवून देण्यासाठी तू आणि तुझे चारुदत्त मदत करू शकाल का ?

मन्नू , मनात जे जे आलं ते लिहून टाकलं . तुला वाटलं तर हे पत्र फाडून टाक पण पत्र लिहिल्यानंतरही कसं निवान्त वाटतंय मला !

या निवान्तपणातूनही पुढचा रस्ता दिसेल .

तुझीच
उर्मिला

... माझ्या हातात ते पत्र आहे .

उर्मिलेला हवं असलेलं घर आणि जमीन देण्याचं सामर्थ्य माझ्यात तरी आहे का ? आपलं घर आणि ही जमीन आपली आपणच निर्माण करायला हवी .

या कणखर जमिनीच्या आधाराची आवश्यकता उर्मिलेला आज का होईना पण वाटली .

अशा हजारो उर्मिला सजून नटून काचेच्या महालात निर्जीवपणे वसल्या आहेत .



Acc No 552
Manavlok college of Social Science Library Ambajogai Dist. Beed 431517
मानवलोक संचलित
डॉ. राममनोहर लोहिया वाचनालय
अंबाजोगाई. ग्रंथ क्र. 552

त्यांना कोणी जाग आणायची ?

**सकीना**

ही सकीना. चार मुलांची आई. काळीसावळी. हातपाय फुलवातीगत काटकुळं. केस नेहमीच पिंजारलेले. फुंकर मारली तर उडून जाईल असं शरीर. उदास डोळे, कधी कधी कुठेतरी हरवून जाणारे. पण ओठावर मात्र हलकसं हसू नेहमीच रेंगाळत असतं.

हिचा नवरा ममदू. मजुरी करतो. कधी कधी रिक्षापण चालवतो. दिवसाकाठी दहापाच रुपये कमावतो. पण सहा माणसांचा संसार एकट्याला रेटत नाही. मुलं नेहमीच भुकेली असतात. इतर रिक्षावाल्यांपेक्षा ममदू जरा वेगळा आहे. तो मोर्चात पुढे असतो. सभांना आवर्जून जातो. कुणा रिक्षावाल्यावर अन्याय झाला तर हा त्याच्यासाठी वणवण करतो. त्याच्या झोपडीत दोन फोटो अगदी कोवळ्या मनाने जपलेले आहेत. एक आहे राममनोहर लोहियांचा. कुठल्यातरी मासिकावर आलेला हा फोटो त्याने प्लॅस्टिकच्या पिशवीत सुरेखपणे बसवलाय. आणि दुसरा त्याचा स्वतःचा. कोणत्या तरी सत्याग्रहाच्या वेळी घेतलेला.

तो शुद्धीवर असला तर त्याच्या गप्पा काम बाजूला ठेवून ऐकण्यासारख्या असतात. पण तो शुद्धीवर असणं हे कधीतरीच घडणार! त्यांच्या झोपडीशेजारी माझं दगडविटांचं घर आहे. ही झोपडी त्यांनी एका दिवसात उभी केली. ममदूने लाकडं आणून टाकली. पोरांनी नाल्याच्या कडेला उगवलेल्या वेशरमीच्या लवचिक फोकांचा ढीग जमवला. ही वेशरमीची झाडं कुठेही उगवतात. जरासं पाणी मिळालं की बस!

जांभुळफिक्या रंगाची फुलं अंगाअंगावर फुलवीत शेतांच्या, पांदीच्या कडेने वेशरम उभी असते. कितीही तोडली तरी तिला धुमारे फुटतच असतात. या वेलींची उभीआडवी वीण विणून सकीनाने झोपडीचे पट विणले. शेणमाती कालवून ते लिंपून घेतले. उकिरड्यावर पडलेले आरशाचे तुकडे आणून ते मातीत मढवून भिंतीत बसवले. एक तुकडा बाहेर नि एक आतल्या खोलीत. त्या दिवशी मी सारखी खिडकीत येऊन उभी राही.

झोपडीचं... उभ्या राहणाऱ्या झोपडीचं कौतुक पहाताना मला राम-सीतेच्या झोपडीची आठवण झाली. ती पण अशीच असणार! लक्ष्मणानं लाकडंवेली आणून टाकल्या आहेत, राम लाकडाची मेख रोवतोय, सीता मातीचा चिखल करतेय...

झोपडी उभी राहिली. ममदूनं अंगण दाबून घेतलं. सकीनाने शेणाचा दाट सडा घातला. माझ्या नि तिच्या लेकींनी रांगोळीची चित्रे अंगणात रेखाटली. रात्री सुखावलेली सकीना म्हणाली, "भावी, तुमी शेजार दिलात. लई चांगलं केलं. आता यानले तुमचा नि दादांचा धाक र्‍हाईल. दारू कमी व्हईल. माजा मार टळेल. पोरं सुखानं घास खातील. भौत अच्छा हुआ." चारआठ दिवस कसे छान गेले! एक दिवस

ञवलागणाच्या वेळी शजारी कल्ला झाला म्हणून वाहर आले, तर काय? ममदू दारू पिऊन तर्रर्र, सकीनाशी झटतीय. पोरं कसनुशी होऊन वाहेर उभी आहेत, हे दृश्य.

"कौन आया था इधर ? वोल. साली की चमडी उखाड दूंगा. कुनासंगं वोलत व्हतीस ? आँगनसे वाहर आयी तो देख. वेशरम कहीं की !" आणखीनही खूपसं, न ऐकवणारं तो वडवडत होता. ते सारं असह्य होऊन मी अंगणात आले.

त्याला रागावू लागले तर सकीनाच माझी समजूत घालू लागली. "भावी, आता ते मानसात न्हाईत. कुछ मत वोलो उनको. दारू हाय ती. माजी सवत."

तिचं वोलणं ऐकून तो आणखीनच उखडला. "गप ए. मी पुरुस हाय. मी काई वी करीन. तू वाईपरमानं रहा. आपल्या लोकात चार वाया करतात. पन आनली का तुला सवत ? तेरेकू मेरी किंमतच नई. किसी के साथ वात करी तो देख. कुऱ्हाडसे दो टुकडे कर दूंगा."

दर चार-आठ दिवसांनी हा गोंधळ असे. हळूहळू दररोजच हे घडू लागलं. कधीमधी सकीना दुपारी घरी येई. मन मोकळं करी. " भावी, मला वाटतं चार घरी काम करावं, गोधडी लई छान शिवता येते मला गोधड्या शिवाव्या. चार पैसे मिळवावे. पोरानला पोटभर खाऊ घालावं. पर या वावाला माजा इसवासच येत नाय. तरी तुमी पहाताव मला. अंगाला माती लावून न्हाते मी. कधी कधी वाटतं जावं वापाच्या घरला. पन ही पोरं, ही झोपडी, पाय मागे वळतात."

एके रात्री तर कहर झाला. सकीनाला नाकातून रक्ताची धार लागेस्तो मारलं. पोरं अम्मीको वचाओ करून ओरडताहेत. मी सुन्नपणे घरातून सारं ऐकत होते. वाहेर जाण्यासाठी मन तडफडलं. पण वाहेर जाऊन काय करणार होते मी ? त्याच्या लेखी मी कोण होते?

सकाळी सकीना आली. डोळे सुजलेले. हातावर, गालावर वळ, म्हणाली, "मैं जाती हू. दोन पोरीनला घेऊन जाते. एक पोरगी नि एक पोरगं राहतील वापासंगं. वाप त्यानला इंख चारील नाय तर हिरीत लोटील. मी कुनाकुनाची काळजी करू? नि कुठवर मार खाऊ? वापाच्या घरी तरी वसून थोडंच खायला मिळणार आहे? चार घरी कामं करीन, इज्जतीनं राहीन."

थोडी पुढे जाऊन ती परत माघारी आली नि हलक्या आवाजात वोलली." लक्ष न्हाऊद्या पोरांवर. उपासी न्हायली तर भाकरतुकडा द्यावा, मी तुमचे उपकार ठेवून घेणार नाई."आणि तटकन वळून निघून गेली.

चार दिवस गेले. आठवडा गेला. एक दिवस सकाळी सकीनाचा आवाज ऐकल्याचा भास झाला. माझी लेक कुंपणावरच्या वेलीवरच्या उसावरच्या शेंगा तोडीत होती. तिच्याशी सुलताना, सकीनाची लेक वोलताना दिसली. मी न राहवून वाहेर आले. सकीना घरापुढचं अंगण झाडत होती. मला पाहून ती रुखंफिकं हसली.

"देखो ना . चार दिनमें कितना उखाड दिया है आंगन . और घरमें देखो ! एवढी मेहनत करून चूल घातली मी , नुसती इखरून विखरून टाकलीय . वाई विना कळा नाय घराला ." मी नुसती तिच्याकडे वघत राहिले . वहुधा माझ्या नजरेने तिला प्रश्न विचारला असावा .

तू आलीस सकीना ? आपल्या पायांनी ? पराभूत होऊन ?

ती हातातला झाडू कमरेशी धरून जवळ आली . हलक्या आवाजात वोलू लागली , "भावी , माँ के घरमें कौन है अपना ? इनके पल्लोमे डाल दिया है . इधरीच ठीक है . आन् जाणार कुठे ? मी मेले तरी यानला वायकू भेटेल . पन् पोरानला माय मिलेल का ?

" तुमी एवढ्या शिकला . भाईर जाता , भासनं देता . पन् दादा वसकतातच की तुमच्या अंगावर ! हम औरताँ तो क्या , वेशरम के झाडा है . . . आम्ही वाया , वेशरमीची झाडं आहोत . किती वी तोडा , किती वी कापा , अमाले पानं फुटायचीच !"

वेशरमीची दिशाहीन , रसहीन , निस्तेज पण जिवंत झाडं . इथे तिथे जीव धरून जगताना पाहिली की जीव गुदमरून जातो . वाटतो ,
जुई कळ्यांनी आपले श्वास किती कोंडून घालायचे ?

**अनुबाई**

"वाई तुमचा परकल कसा पांढराफेक सोवच्छ धुतला वघा मी . या ना भाइर वगायला . दादांची पँट वी घासू घासू धुतलीया ." अनुमावशी वाहेरून हाक मारीत वोलल्या .

मी वाहेर गेले . दोरीवरच्या कपड्यांकडे डोळाभर कौतुकाने पहात ही वाई उभी होती . एकाच दिवशी भलामोठा धोवीघाट उरकल्याचा शीण कपाळावरच्या घामावरून काय तो जाणवत होता .

अनुमावशीची लहर असते . कधीकधी धुवायला टाकलेले कपडे त्या खुशाल घडी घालून खणात ठेवतात . तर लहर आली की चादरीसकट सगळं घरदार धुवायला काढतील . सगळा दणका एकाच दिवशी उडवून देतील . वाईचा कामाचा उरक जसा जवरी तसा आवाजही जणू हजार पॉवरचा वल्व . मला नेहमी सांगावं लागतं , मावशी जरा हळू वोला . घशाला त्रास होईल तुमच्या . त्यावर त्यांचं ठोकर आवाजात मावशींचं उत्तर मिळणार ,"माझ्या घशाला लागलीय धाड !"

स्वारी रंगात आली की खास आवाजात ओरडणारच . "वाई भाइर या . पितळेचं टीप कसं चक्क केलंय . तुमचं इस्टील झक मारील याच्या म्होरं ."

रुंदवंद दगडी वांधा . उंची भरपूर . भव्य कपाळ , गव्हाळ रंग , हसणारे वोलके टप्पोरे डोळे . कोऱ्या कपाळावरचं हिरवं गोंदवण आणि दणकट वागणंवोलणं . अशी ही आमची अनुमावशी . अनुसया पवारीण . कामाचा उरक दांडगा . पण ठोक कामच

करायला सांगा. बारीकसारीक. नाजूकसाजूक कामाचा मात्र कंटाळा.

"आज जरा फ्रीज पुसता का अनुबाई?" असं विचारलं तर सेरअटीक सांगतील. "बाई नसली बारीकाची कामं नका सांगत जाऊ. लई भ्या वाटतंय बघा. आमच्या वैनी बी मला भाजी चिराया बसले की दहांदा सांगती की बन्सं फोड जरा बारीक धरा. मला दणदण भाकरी थापायला सांगा. फरशा पुसाया सांगा. रानातली कामं सांगा. धुणं धुवाया सांगा. पयला नंबर काढीन मी. पन नाजूक काम म्हटलं की जीवच लई घावरा हुतो. वाटतं फुटतं की काय. हापटतं की काय. छातीत धाडधाड होतंय बघा."

तिच्या या आगाऊ बोलण्याला वैतागून मीही फ्रीज पुसता पुसता म्हणते, "अहो शिका मग. माझ्या पाच माणसांच्या संसारात कुठून आणू असली मोठी कामं? कधीतरी भाजी चिरून पहावी. खिडक्या नीटनेटक्या पुसाव्यात."

त्यावर बाईचं उत्तर तयार. "बाई सोवताचा संसार करायची येळ आली असता ना, तर समदं शिकले असते मी. पन हुबा जलम भावांचा संसार करण्यात गेला. आता कितीक दिस राहिलेत माझे? त्या झालं निभावून. आन हे बगा, म्होरल्या जलमात बी तुमच्याच घरी कामाला र्‍हाईन. पन लगीन होन्या आगुदर बरंका. मग समदं बारीक, नाजूक काम शिकवा, आनं द्या लावून लगीन बी तुमीच! चांगल्या नवऱ्यासंगं!" असं बोलून दिलखुलास हसणं.

अनुबाईला असं मनभरून हसता येतं म्हणूनच ती स्वतःची दुःखं विसरू शकते. अनुबाईला तिच्या पवारीपणाचा काटोकाट अभिमान आहे. मी कधी कधी मुद्दाम चिडवते तिला. "अनुबाई, पवारीण कशा हो तुम्ही? भिशीण म्हणा की! सासरचं आडनाव भिसे ना तुमचं?"

अनुबाई उसळून उत्तर देणार. "हात त्याचा मुडदा बशीवला. कोन कुठला भिशा आनला हो? माजून धा दिस तरी नांदवलं का त्या दादल्यानं मला? आन नांदवणार तरी कसा? पुरुषात तरी जिम्मा होता का त्यो? नव्हता असं समदी म्हणतात. देवालाच म्हाईत ते. मला तरी कुठं अनुभाव हाय? माजा जलम पवारांच्या दारात गेला. मग पवारीणच की मी."

एक दिवस थोडा अगोचरपणा करून मी तिला म्हणालेच, "अनुबाई, उभा जन्म पवारांच्या अंगणात का घालवलात! पाट का नाही लावून घेतलात? तुमच्यात पाटाचं लगीन होतं ना?"

तशी अनुबाईनं हातातलं काम टाकून दिलं आणि माझ्याकडे पहात ती कळवळून बोलली. "आताऽ काय म्हणावं बाई तुम्हाला? एक डाव बोलला. पुन्हा नका असं बोलू. पाटाची बाई काय पतिवरता असते? अवं कसा का असंना, देवाबामनासमुर त्याच्या पदरात टाकलं होतं मला माज्या मायबापांनी. येक दिवस बी त्यांच्यासंगं सौंसार केला न्हाई मी. पन कितीबी झालं तरी नवरा व्हता त्यो. त्याची सर पाटाच्या नवऱ्याला

कशी येईल ? अवं त्याच्या नावानं कुकु ल्याले की चार महिने !"

अनुबाईनं खाली वसकण मारली आणि आपल्या जलमाची चित्तरकथा तिनं सुरू केली. "आमच्या मायेला एक ईसाला कमी चार येवढी लेकरं झाली. त्यातली जगली फकस्त दोन. आमचे शिदूआण्णा मोठे. माजा लंबर खालून दुसरा. आमचे वडील देसायाच्या घरी सालदार हुते. शेतात भरपूर काम करायचे. खायला कमी न्हवतं. माझी माय एकतर गरवार असायची नाहीतर बाळातीण. लेकरू जलमताना चांगले असायचे. पन नंतर पोटाचा डबा व्हायचा नि दोन वर्षात मातीत जायचे. समदी अशीच गेली. शिदूअण्णांच्या पाठीला टेका द्यायला मीच काय ती जिती हाय. माझी माय शेतात कामाला जायची. भुईमुगाचे येल उपटायच्या कामात ती भाद्दर होती. भरपूर वाटा मिळायचा. खायलाप्यायला भरपूर व्हतं. पन शिवारात न्हाई शेत नि गावात न्हाई घर. आमच्या शिदू अण्णाला बायको कोणी देईना. तो ईसावर पाच वरसांचा झाला तरी गोसावीच ऱ्हाईला. माज्या बापाला लई घोर पडला. त्यानला वाटे, त्यांच्या समुर लगीन झालं न्हाई तर पुढे कोन पोरगी देणार ? आन् तसाच पुढे म्येला तर वंसाचा दिवा कोन लावणार ? त्यांना शांती कशी मिळणार ? बरं शिदूआण्णा शिकलेला असता तर दिली असती कोनीतरी पोरगी. पण हा अंगठे भाद्दर. तो मोंढ्यात हमाली करी. शेवटी आमच्या धाकल्या चुलत्यांनी तोडगा काढला. त्यांच्या बायकुच्या म्हायेरी एक घोडनवरा होता. त्याची भैण न्हातीधुती होती तरी अजून बिनलग्नाची होती. चुलते म्हणाले अनशीला देऊ त्याला आन् त्याची भैन आपल्या शिदूअण्णाला करून घेऊ.

"लगीन झालं तवा मी होते नऊ वरसांची. शिदूअण्णा होते ईसावर सात वरसांचे. मी लहान होते पण थोराड हाडाची होते. सासरी दुभतं होतं. सासू रोज सांजसकाळ मला दूध देई. बदामाचा नि वैदूच्या औषधाचा खुराक चारी. ती म्हणे, पोरगी थोराड हाये. खाऊपिऊ घातलं तर लवकर शाणी होईल. पोराला आसरांनी घट्ट धरून ठिवलं. देवऋषी लागीर यांनी उतार पडला नि तंवर पोरगी शाणी झाली तर निदान वंसाचा दिवातरी लागंल. पन त्यो निव्वळ येडा होता. सांज झाली की जोरजोरात ओरडायचा. घान घान श्या द्यायचा. लई भ्या वाटायचं मला. जेमतेम महिनाभर ऱ्हाईले मी तिथे. पंचमीला म्हायेरी आले ती परत गेलेच न्हाई. माईने पोर लहान आहे म्हणून म्हायेरीच ठिऊन घेतलं. भादवा संपत आला होता. एक दिवस सांगावा आला की त्यो मेला म्हणून. लिवलं असेल, तसाच जलम जायचा ! कशाला उगा घोर करून मन दुखी करायचं ? तुकाराम बाप्पानं सांगितलंय न्हवं ? ठेविले अनंते तैसेचि रहावे."

अनुबाई हसत उठून कामाला लागली. चहा टाकताना माझ्या मनात आलं, संताच्या शिकवणुकीमुळे महाराष्ट्रातला पुरुषार्थ दुबळा झाला असं म्हणतात. पण हे ही खरं की त्यांच्या शिकवणुकीमुळे दीनदुबळ्यांना, बायाबापड्यांना स्वतःचं दुःख सोसण्याचं बळ मिळालं !

❖❖❖

# जांभूळ झाडाखाली

LIBRARY

गदरलेल्या चिंचेसारखे, गाभ्यापासून सुटून ओथंबून वाकलेले आभाळ. एवढे वाकलेले की एक टप्पोरे जांभूळ फेकून मारले तर टचकन फुटेल आणि गळायला लागेल! आकाशात गर्द सावळ्या आभाळाची खिल्लारे सैरावैरा भरकटू लागतात, तसतशा रानातल्या जांभळी तुरटगोड गरांनी गदरायला लागतात. त्यांच्या जांभुळकाळ्या रंगावर वहात्या पाण्याची नि निरभ्र निळाईची चकाकी पसरते. अशा नेमक्या वेळी आम्ही रानात जांभुळमेवा खायला आलेलो. समोर भलेमोठे जांभळाचे झाड. ऐसपैस पसरलेले. अंगभरून हिरव्याकाळ्या घोसांनी लखडलेले. दुरून पाहिले तर त्याची समृद्धी लक्षातही येणार नाही. पण जवळ आल्यावर मात्र त्याचे नांदतेपण लक्षात येते. पानागणिक घोस लोंबताहेत. पण हा रानमेवा खायचा तर नजरेला हात हवेत आणि हातांना नजर हवी. आम्ही शहरी माणसं. खाली पडलेली, हाती लागतील ती जांभळं खाणारी. आतल्या आत कच्चाड तुरट चव सोशीत, 'मस्त! छान!' असे म्हणत, वाकडे तोंड करीत जांभूळ खाणारी! आमचे नाटक न समजण्याइतकी खेड्यातली माणसं भोळी नाहीत.

तुरटलेली जीभ मनातल्या मनात म्हणते, बाई ग ऽ, ही असली जांभळं खाण्यापरीस, शहरातली गाड्यावरची जांभळं किती राजस अन् देखणी! हिरव्या पानांच्या नखरेल महिरपीवर सुबकपणे मांडून ठेवलेली. ती जांभूळरास पहाताना तोंडाला पाणी सुटते. फक्त भाव विचारू नका. चाळीस पैशाला एक जांभूळ. खा किती खायची ती.

आणि इथे? वर जांभळाचे आभाळ. पायाखाली जांभळाची पखरण आणि तरीही आंबटच! इतक्यात फांदीवर चढलेल्या पोरानं फांदी गदगदा हलवली. आणि त्याने नेमकी टप्पोरी, जर्द जांभळी जांभळे माझ्या हातावर ठेवली. "धरा बाईसाहेब, जांभळं पारखायला अभ्यास करावा लागतो. त्यासाठी झाडांशी दुरून दोस्ती करून चालत नाही. ही संथा वयाच्या पाचव्या वर्षीच घ्यावी लागते."

खेड्यातल्या बारक्या पोरांनाही रानातल्या जांभळी, बोरींची चव झाडागणिकच्या वेगळेपणासह माहीत असते. त्यांच्या बहारण्याच्या सवयी, त्यांच्यात रस भरण्याचे

दिवस , सारं तोंडपाट !

आम्ही उभ्या आहोत ती नानांची जांभळ. ही मृग लागताना पणात येऊन रसाळते. तर हिरुकाकांची जांभूळ शाळेत संस्कृतच्या पुस्तकात भेटली होती. जांभूळवनाच्या काठाने वहाणारा तुडुंब झरा. पिकलेली जांभळं ,त्यात टपटपत नि मग पाण्यातले मासे ... एकटक जांभळाकडं पहात जिभेचं पाणी नि जांभळं वरच्यावर मटकावीत. त्याचा आवाज होई ,

गुलुगुग् गुलुगुग् ... गुलुग् गुलुग् ...
... जंवू फलानि पक्वानि पतन्ति विमले जले
तानि मत्स्यानि खादन्ति गुलुगुग् गुलुगुग् ... गुलुग् गुलुग् ॥

माशांना जे रसिकपण लाभले ते आम्हाला का लाभू नये ? परदेशातल्या चेरीवहराचे रसभरीत वर्णन आम्ही तोंड भरून करणार. जांभळींचे बहार किंवा पळसफुलांचे नक्षत्रलेणे आमच्या साहित्यिकांनी शव्दात साठवले आहेत. नाही असे नाही. पण आम्ही सामान्य माणसे निसर्गाच्या या रसरंगाच्या उधळणीकडे निवांतपणे , कौतुकभरल्या नजरेने पहातो का ? बोरांच्या दिवसात रानातल्या बोरींकडे पाहुणचार घ्यायला जायचे कितीजणांच्या मनात येते ?

हुर्ड्यांची आमंत्रणे कमी व्हायला लागली आहेत . इळाआवसेला , शेजारपाजारची लेकरंबाळं घेऊन रानात जेवायला जाण्याचे कुळाचारही हळूहळू नाहीसे होत आहेत. आणि वोरीची ,जांभळीची झाडं तरी कितीशिक शिल्लक आहेत ?

नानांच्या शेतातली ही जांभुळही वच्छाच्या हट्टामुळे टिकली. नाहीतर तीही कुणाच्यातरी लाकडाच्या वखारीत जाती !

आमचा जांभुळ अध्याय सुरू असतानाच अनेकजणींची भेट होत होती. कोणी शनवारच्या वाजारात माळवं ,भाजीपाला विकायला घेऊन जाणाऱ्या. तर कोणी शेताकडे लगबगीने निघालेल्या. डोक्यावरचा जड भारा तोलीत माझ्याशी दोन शव्द ओलावून बोलणाऱ्या. मी आपली त्यांना खुळचट आमंत्रण देतेय , या जांभळं खायला. (जसं माझ्या आजोळचंच झाडं !)

"खा तुमीच. शेहर गावच्या मानसांले जांभळाचं कौतिक. खाऊन खाऊन वासनाच मेली वं आमची !" एक.

"वासना मराय काय झालं ग ? हर साली जांभळीची चव न्यारी लागती. पन येळ हाय का ? अशा जांभळं खात पेंगत राहिलो तर मग झालंच ! काम कोन उरकील ? त्यो दादाप्पा ?" दुसरी.

"ताई , खाऊशी वाटली ना तर चारदोन पदरात टाकतो नि मग म्होरं कोनी नाईसं पाहून तोंडात टाकतो. पोर जिन्नस हाई , तंवरच पोरींची मज्ञा असतेया. खेड्यातली पोर एकदाका शानी झाली की समदं संपलं. कसल्या बोरी नि कसल्या

जांभळी ! त्यांच्या पाठी लागतात काटाळ वाभळी !'' तिमरी.

एवढ्यात जांभळींची मालकीण वच्छा आली. वच्छा माझी खास मैत्रीण. दोघीजणी या गावात सासुरवाशीणी म्हणून एकाच साली आलो. वच्छी होती तेराचौदाची आणि मी विशीतली.

"या वयनी, खा जांभळं. तुमच्याच शेतातली पन आग्रेव माझा. नाना कुठाईत ?'' हा म्हणाला. गावची शीव आली की शुद्ध गावरान भाषेत बोलण्याचे ह्याचे खास तंत्र आहे.

"त्ये कुठं असतात गावात ? जवा बघावं तवा आंव्याला न्हाईतर लातूरला पळायचं. घरात बायको हायना भक्कम. शेताकडे पाह्यला. बाजारचं नाव करून पुरुष पळतात शहरात. घरातल्या लक्ष्म्या हाईतच मागे, घरात नि रानात राबायला.'' वच्छा फणकाऱ्याने उत्तरली.

खरंच, बायांनी किती म्हणून राबायचे ? चूलसारवण, लेकरांचे हगणेमुतणे, सडाअंगण, खाणेपिणे, जनावरांचे शेण काढा, गवऱ्या थापा, शेतातले खुरपणं आहे तर कधी पेरणी तर कधी सुगीची धावाधाव. लाकूडफाटा गोळा करा. तुराट्या रचून ठेवा. शेतात दारं धरा. बाजारात माळवं विकायला बाईनंच धावायचं. कारण तेच पैसे तिच्या हातखर्चाचे ... मालकीचे ! डाळीसाळी करा. बीजभरणासाठी शेंगा फोडा. बैलामागे हुबे रहा. मळणी करा. उफणणी करा. ही सगळी कामं बाईनंच करायची. या अलिखित करारातील कामं दिवसेंदिवस वाढतच चाललीत. पूर्वी दवाखान्यात तरी लेकराला न्यायचा बाप. आताशा हे कामही बायाच करतात. किती आघाड्यांवर लढायचे बाईने ? बदलत्या काळासोबत मोकळ्या आभाळाखाली येण्याऐवजी बाई अधिकाधिक गुदमरत चालली आहे का ? मला गढवालमधील वंगाली गावच्या म्हाताऱ्याचे उद्‌गार आठवतात. "रंडवा होना बडा दुर्भाग्य है, सबके लिए. हमारा शास्त्र कुछ भी कहे ... विधुर होणे, पुरुषाआधी बाई मरणं फार वाईट. एकटी बाई सगळा संसार सावरते, चालवते. पण पुरुषाला ते जमत नाही. डब्याचे झाकण उघडावे तसा संसार उघडा पडतो. औरतमे इतनी हिम्मत है ! आदमीमे नही ...''

किती खरे आहेत हे उद्‌गार ! जरा अवतीभवती डोळे उघडे ठेवून पहा. अशा अनेक एकाकिनी, नवरे असलेल्या आणि नवरे नसलेल्या, दिसतील. फाटक्या पदराचा आडोसा लेकरांना सावली करून देणाऱ्या. त्यांना वाढवणाऱ्या पण ही यातायात करताना त्या मात्र निष्पर्ण वृक्षासारख्या वठून जरठून गेल्या आहेत. जीवनात माणूस म्हणून जगताना, मनात उगवलेल्या इच्छा, आकांक्षा, स्वप्ने, इतक्या निर्मळपणे फेकून द्यायला कोणी शिकवले त्यांना ?

धर्माने ?

समाजाने ?

की त्यांच्यातल्या मातृत्वाने ?

वाऱ्याचा पदर धरून मन तरी किती खुळ्यासारखे झुलतेय ?

कुठून कुठवर आले मी !

पण आता मात्र जांभळाची गोडांबी चव जिभेवरून पार उतरून गेली आहे. पावसाची झिमझिम सुरू होत आहे. लगबगत्या पावलांनी मैत्रिणी निघून गेल्या आहेत. मी नि हा त्या रसाळ जांभळीखाली उभे आहोत. थेंबाने तुटणाऱ्या पिक्या जांभळांचा सडा खाली सांडतोय. पहिल्या पावसाने सृष्टी बहाराला येतेय. पावसाच्या असोशी स्पर्शाने शहारून जाणारी धरती. इवलेसे हिरवे रेशमी शहार ... जणू जांभळीच्या झाडाखाली कुणीतरी ढोल वाजवतोय. आमंत्रण देतोय. साद घालतोय. पण या ढोलाच्या नादाने बेभान होण्याच्याही पलीकडे 'ती' चाललीय. कधी हे नाद ऐकू येतील, साद घालतील तिला ? तिच्या मुक्या पावलात कधी भरून जाईल ही लय ? कुणास ठाऊक !

❖❖❖

# मेंदी

काळ्याभोर ढगांनी बहरलेला आषाढ आता ओसरू लागला आहे. मेघांच्या घनघोर गर्जना, विजांचा लखलखाट आणि सहस्रधारांनी ओसंडणारा आवेग, हे सारं आता थंडावलंय. श्रावणाची हसरी खुलावट जागोजाग सजली आहे. एखादी सर हळुवारपणे भुरभुरून जाते. काळीचा शेव भिजतो न भिजतो तोच सुनहरी ऊनाची नॉयलानी घडी निसटून अंगभर उलगडते. त्या कोवळ्या सोनसळीच्या स्पर्शाने मेंदी उगाच लाजते. हिरव्या लेण्याने भरलेले पानतुरे अंगोअंगी थरथरतात.

पाऊसधारात अखंड न्हालेली मेंदी आता ताजीतवानी झाली आहे. ग्रीष्माच्या तलखीनं पान न् पान कोमेजून गेले होते. निर्विकार आभाळाकडे आशेने पहात, उन्हाचे अंगार काटकुळ्या फांद्यांनी रिचवून टाकले. पायतळीची कोरडीठाण माती अन् या वाळक्या काड्या एकमेकींना धीर देत ग्रीष्माचा अंगार मुकाटपणी पिऊन गेल्या. एक दिवस नैर्ऋत्येच्या दारातून हलकीशी झुळूक आली. मेंदीच्या कानाशी लागून गेली, काहीबाही सांगून गेली. मेंदीला खुदकन हसू फुटलं. झुळकीपाठी पाऊस आला. अंगण भिजवून गेला. बावरलेल्या मातीनं मेंदीला घट्ट मिठी घातली. मेंदी काय ते उमजली अन् एक लालजर्द वीज अंगभर लखलखून गेली.

रोहिण्या बरसू लागल्या. मेंदीच्या कुंपणाशी पाण्याचे लोट वाहू लागले. साठू लागले. आकाश भरून येई. सुसाटयाचा वारा दहादिशातून भणभणत धावू लागे. वाऱ्याच्या सैराट तालावर अंग घुसळून नाचणाऱ्या थेंबधारात मेंदी सचैल भिजून जाई. जीवघेणा पाऊस आणि आषाढवाऱ्याच्या धसमुसळ्या अंगलटीत ओढ होती, ओलावा होता.

... आता आषाढाचं पाणी पिऊन तृप्त झालेले पानाचे थवे रात्रंदिवस मनमुक्त झोके घेत बसतात. आषाढ मालवतो आहे. श्रावणाची तरळ हवा दिशादिशांत भरून राहिली आहे. श्रावणाचं भान काही न्यारंच! सारं कसं हलकंफूल. दिवस नि दिवस तार लवून कोसळणारी धार नाही की आकाश धरती वेढणारा वाभरा वारा नाही.

क्षणात फुलणाऱ्या आणि क्षणात मिटणाऱ्या थेंबकळ्या, क्षणात हसणारं आणि क्षणात रुसणारं मलमली ऊन. ग्रीष्माच्या चढत्या उन्हाच्या रखरखाटात श्रावण

स्वप्नावर मेंदी तगली . आज स्वप्नसजण दारी आला आहे . मेंदीचे रूप . रंग . गंध नव्याने मोहरले आहे .

खरं तर झाडाचं वैभव फुलांच्या बहरात असतं . पण मेंदीचं सारं लावण्य तिच्या इवल्याशा पानड्यांच्या गहिऱ्या रंगात ,दिमाखानं लहरणाऱ्या शेलाट्या पानतुऱ्यात साठलंय . मोराची मिजास त्याच्या पाचूच्या पिसाऱ्यात . पायाकडं मात्र नजर सुद्धा टाकायची नाही . मेंदीचंही असंच आहे . शेंड्यावर भरगच्च भरलेले हिरवेकंच पिसारं डोळे भरून पहायचे . पायथ्याच्या हडकुळ्या खोडाकडे मुळीच नजर टाकायची नाही . पण या वाळक्या खोडाचा , हिरव्या दिमाखाला घट्ट आधार आहे हे मात्र विसरायचं नाही !

मेंदी ऐनात आली आहे . कुंपणापाशी रोज कितीतरी कोवळी पावले थांबतात . पाचूपानड्यांवरून इवले इवले हात , तरुण अधीर हात फिरतात . पोरीबाळी परकराचे ओचे भरभरून ताजी पानं घेऊन जातात . रात्र निघून जाते . पहाटेच्यापारी दवात भिजलेली लाल पऱ्याची जर्द विमाने मेंदीच्या कुंपणावरून निघून जातात . मेंदीच्या डोळ्यासमोर येतात लालचुटुक नक्षीदार तळव्यांची असंख्य मोरपिसे . मेंदी मनोमन तृप्त होऊन जाते .

मेंदीची कितीतरी रूपं . तळव्याच्या रेशमी पोतावर दिमाखाने मिरवणारी नखरेल लाल नक्षी . हातभरून रंगलेली लाली . उगवतीच्या आभाळासारखी . वाटलेल्या मेंदीचा हिरवाकंच गोळा , नववधूच्या पावलांवर , मनगटापर्यंतच्या हातावर रेखलेली ओल्या मेंदीची फुलवंती ! पंचमीसाठी माहेरी आलेली गोरी माळण अंगणातल्या मेंदीची पानं अधिऱ्या हातांनी खुडते . वाटरीक वाटलेला मेंदीचा गोळा तळव्यावर ,नखावर रचतांना स्वप्नांची पाखरं भिरभिरतात . उद्या या केवड्याच्या पिवळ्याधमक पात्यांवर लालचुंदडी रंगेल , पावलांच्या काठांनी गुलमोहरी साज सजेल . अशा वेळी तिच्या मनात येईल , रानपाखरासारखं उडून जावं , चिरेबंदी वाड्याच्या नजरा चुकवून थेट त्याच्यासमोर हे रंगभरे तळवे धरावेत . काय म्हणेल तो ? काय बोलेल तो ? रात्र अशीच उडून जाते . गोऱ्या मालिनीच्या पावलांना भान येतं , तव्हा हात रंगून लालेलाल झालेले असतात . मेंदीत काथाच्या जोडीने गहिऱ्या आटवर्णीचे ओले रंग मनावर चढलेले असतात .

थेट कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत , नाहीतर द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंत कुठेही जा . मेंदीनं रंगलेले हात दिसणारच . भारतीय स्त्रीला मेंदीचा भलता सोस . तळव्यावर मेंदी रेखून आणि पायावर नक्षीच्या जयपुरी मुजोड्या मळवून इथेतिथे मिरवण्यात केवढा दिमाख असतो म्हणून सांगू ! खेड्यातल्या अडाणी पोरीपासून ते थेट साडीच्या बोळदार निऱ्या सावरीत महाविद्यालयाच्या पायऱ्या चढणाऱ्या कॉलेज कामिनीपर्यंत .

एकदा मी दिल्लीला गेलेली . कॅनॉट प्लेसच्या परिसरातील राजस्थानी एम्पोरियममध्ये

चक्रावून गेलेली. तिथल्या कलाकुसरीत हरवलेली. भान आले तेव्हा एक गोरी ललना, वहुदा स्वीस, असावी., मला मेंदीचा कोन दाखवून, हाताचा तळवा पुढे करून खुणवीत होती. त्यावेळी मेंदीचे क्लासेस वगैरे नव्हते. दुकानाच्या कोपऱ्यात जाऊन तिच्या हातावर मी जाळीदार सूर्यफुलांची नक्षी रेखाटली. केवढा आनंद आणि कृतज्ञता तिच्या डोळ्यात, शब्दात होती! कितीतरी वर्षे त्या हातांवरून वाहून गेली आहेत. आम्ही एकमेकींना पूर्णपणे अपरिचित. तरीही किती जवळच्या. नेहमीच एकमेकींना आठवणाऱ्या!

पहिली सर वरसून गेली की मलाही मेंदीचं खूळ लागतं. मेंदी का एरवी लावायला येत नाही? पण श्रावणातल्या उत्तररात्री रंगणाऱ्या मेंदीचा थाट काही न्याराच. श्रावणातली मेंदी खूप चढते म्हणे! रंगते नाही, चढते. खरंखोटं मेंदीच जाणे! इतकं मात्र खरंय. माहेरचं लेकुरवाळं अंगण, एकीकडे चहाटळ वहिनींच्या चहाटळ गोष्टी ऐकत, कुणाची तरी चोरटी याद करीत, वहिनीनं चढवलेली मेंदी गहिरी रंगते.

मेंदीचा शौक उत्तर भारतात जबरदस्त. त्यातल्यात्यात राजस्थानकाठेवाडात तर खूपच. विलक्षण कातीव रेषांची जाळीदार नक्षी हात भरून काढतात या ललना. मेंदीवर कितीतरी गोड गाणी. लोकगीते रचलेली आहेत. घोळदार घागरा. त्यावर चंदेरी गोटा आणि टिकल्यांचं जरीकाम. माथ्यावर विंदी, विंदीशी थवकलेली पिवळ्या ठिपक्यांची, लाल चुंदडी. हातभर लाखेचा लालम् चुडा. पायातल्या चार वोटांत साखळीच्या विछुड्या आणि रंगभऱ्या साजाला खुलवणारे मेंदीभरले हात. हे सारंच कसं लोभसवाणं.

राजस्थानी स्त्रियांचा कोणताही सण असो, मेंदीचा मान पहिला. लग्नाचे वा जेवणाचे आवतण द्यायला जायचे ते हिरव्याकंच मेंदीची खूण घेऊनच. लग्नात नववधूवरांना होमासाठी वसवताना त्यांचे हात मेंदीचा ओला गोळा हातात देऊन जोडून टाकतात. होम संपेपर्यंत मेंदी किती रंगली याची उत्सुकता सर्वांनाच असते. मग, मेंदी रंगली तर संसारही रंगतो म्हणा ! विचारी नववधू. कुणाचं लक्ष नाहीसं पाहून तळवा चोरून पहाते ती. मेंदी रंगली तर मनोमन हरखून जाते. आणि रंगली नाही तर?

मेंदी म्हणजे अहेवाचं लेणे, तारुण्याची तरारी नवेपणाची नवलाई. समर्पणाची गहिरी खूण. मेंदीचे शेलाटे तुरे जणू तारुण्याचे रूप. ताजेतवाने, ताठर अन् तकतकित. धरणीतून शोषून घेतलेले, तिन्ही ऋतूंच्या झोक्यांनी वहरलेले जीवरस, एका रात्रीत त्या रेशमी तळव्यांना समर्पून टाकायचे. त्यांना खुलवायचे. रंगवायचे, आणि हे सारं करीत असतांना स्वतः मात्र विरून जायचे. म्हणूनच ही तरुणींना प्यारी, त्याच्या प्रीतीसाठी, कीर्तीसाठी अवघ्या आयुष्याचे उत्सव ! कधी कधी नव्हे तर नेहमीच मनात येते. मंजुश्री, मीना, शोभना यांच्या हातावरची मेंदी रंगली होती ना? की...?

एक मधुर राजस्थानी गीत आहे . नवीनवेली बिनणी बहू घरात आहे . तीजेच्या आदल्या शिंजाऱ्याच्या म्हणजे शृंगाराच्या रात्री मैत्रिणींने किती सुरेख मेंदी रचली हातांवर . कौतुकाने त्याला , भंवरजीला दाखवायला गेली तर हा रुसून फुगलेला . त्याला होत होती मेंदीचीच अडचण ! तो बोलेना की नजर वर करून पाहिना . बिनणी संतापली नि थेट सासूकडे आली . आपल्या अरसिक आणि भांडखोर नवऱ्याची कागाळी करू लागली .

थारा बेटा लडोकडा
कुन निरख्यो म्हारा हाथ ?
मेहंदी रासणी ? . . .
. . . तुझा लाडका लेक
भलताच भांडखोर नि अरसिक .
माझ्या मेंदीभरल्या हाताचं .
कोण कौतुक करणार . . . ?

पंचमीचे झुले निंबावर , आंब्यावर , चिंचेवर अजूनही हिंदोळताहेत .

माहेरच्या अंगणातली दहादेशींच्या चिमण्यांची किलबिल अजूनही ताजी आहे . हा सुनहरी श्रावण , ही लालचुटुक मेंदी , धरती आकाशाला कवेत घेणारे उंच उंच हिंदोळे , मोहरलेलं अंगण , सारं उडून जाईल . पण रंगलेली मेंदी आणि तिच्याभोवती दरवळणाऱ्या सायीसारख्या दाट आठवणी उजळत राहतील , सुवासत राहतील , पुढचा श्रावण अंगणात येईपर्यंत ! तळव्यावर पुन्हा एकदा मेंदी रंगेपर्यंत !

❖❖❖

# आषाढातला एक दिवस

तिसऱ्या मजल्यावरच्या मोकळ्या गच्चीवर मी एकटीच उभी आहे.

दक्षिणेकडून ढगांचे बलदंड थवेच्या थवे.. हा शब्द चुकला ना? तू जवळ असतास तर ठसक्यात म्हणाला असतास. थवे नाही जथ्थे! जथ्थे!

थवे.. कधी पक्ष्यांचे. कधी हळव्या सुरांचे तर कधी तुझ्या हव्याशा शब्दांचे. तुझ्या वास्तवात मात्र नेहमीच जल्लोष असतो जथ्थ्यांचा. दुष्काळी मोर्चा : हजारो स्त्रीपुरुषांचे जथ्थे लाटांसारखे एका पाठोपाठ एक आवेगाने येणारे.

सेवादल : नव्या जाणिवा घेऊन परिवर्तनाच्या दिशेने झेपावणारा वेडया तरुणांचा जथ्था. आणि तुझा खेड्यातला दवाखाना? तिथेही रोग्यांचा करुण जथ्थाच ना?

तर, आभाळाच्या बलदंड हत्तींचा जथ्था दक्षिणेकडून वर सरकतोय. हा हा म्हणता दाही दिशा गर्द कोनफळी रंगाच्या सुस्त आभाळाने झाकून गेल्या आहेत. क्षितिजाच्या कडांनी विजा लखलखताहेत. एक टप्पोरा थेंब माझ्या ओठांवर टपटपला बघ! तू जर इथे असतास तर या गच्चीवर कशाला उभी राहिले असते अशी एकाकी! आज आकड्यांचे भान आलेय. वारा आषाढ तुझ्या संगतीने साजरे झाले.

सरता ज्येष्ठ असायचा. अचानक, एके दिवशी दक्षिणेचे दार मोकळे व्हायचे. भन्नाट वाऱ्याचे तुफान भर वेगाने दौडत यायचे. येताना काळाभोर खिल्लार वळवित आणायचे. अशावेळी माझे नकटे नाक खुलून जाई. दूरवर पडणाऱ्या पावसाचा खमंग ओलाकंच वास माझ्या श्वासात भरून जात असे. मग अंगातून एक आगळे उधाण ओसंडून येई. वाटत असे, नुस्ते धावत सुटावे. वारा प्यालेल्या वासरासारखे!

असे ओले दिवस उगवले की माझ्या हाताने चहात साखर जास्त पडायची किंवा पोह्यात मीठ घालायलाच विसरायची. तुला हे सारे कळे.मग तू म्हणायचास. फिरायला जाऊया. तुझी फटफटी मुकुंदराज दरीच्या दिशेने धावू लागायची. पावसाचे झुरुमुरू थेंब. वाऱ्याचा भन्नाट वेग. त्या वेगाला मागे सारीत पुढे धावणारी फटफटी. तुझा खांदा एका हाताने धरीत, दुसऱ्या हाताने भुरभुरत्या बटा सावरणारी मी. समोर उंचउंच जांभळे कडे. पावसाने भिजलेले काळे दगड. आपल्या काटकुळ्या हातांनी पावसाचे नवेपण गच्च धरून ठेवणारी, रस्त्याच्या कडेची झुडपे. मधूनच लखलखत,

लवलवणारी अगदी समोर येऊन , वेडावून लुप्त होणारी वीज . मग प्रचंड गडगडाट . अशा वेळी खांद्यावरच्या हातांची पकड आणखीनच गच्च होई . दरवर्षी आषाढ येत असे . कधी मुकुंदराजाच्या समाधीखालची बुट्टेनाथाची दरी तर कधी तळ्याकाठचा महादेव तर कधी शेतावरची नांदती विहीर . आषाढाचं नवेपण दरवर्षी नव्या तऱ्हेने साजरे होई .

आणि आज ?

हा तेरावा आषाढ .

यक्षपत्नीच्या वेदनांचे मुके वळ , आज माझ्या तनामनावर उमटले आहेत . माझ्या वेडांना पारिजातकाच्या फुलांसारखे अलगद ओंजळीत धरून जोजावलेस . मुक्तीचा नवा प्रत्यय प्रत्येक क्षणी देणारा तू . . .आज दूऽर गजाआड बंदिस्त आहेस . हेच ढग तुझ्या दगडी खोलीच्या वीतभर खिडकीतून तुला दिसत असतील . खुणावत असतील . उंच उंच , चिरेबंदी दगडांनी बांधलेला चौकोनी तुरुंग . भवताली विजेच्या काटेरी तारा . आणि त्या भिंतींच्या वरून , त्यांना न जुमानता धावणारे मुक्त आभाळ . ते भुरुभुरू धावणारे आभाळ पाहून तू नक्कीच खदखदून हसला असशील . हसता हसता तुझ्या डोळ्यात दाटून आल्या असतील . मी लिहून पाठवलेल्या गझलेच्या ओळी .

. . . गजाआड माती ,  
परि , मनमयूर मुक्त  
दूरातून जडवितो  
निखळता स्वरान्त  
शब्द शब्द पेंगुळले  
विझू विझू वाती  
मनातूनी मोहळती  
मग्न . . . भग्न . . . राती . . . .

शब्द माझे . पण मनाची उलघाल तुझ्याच . तुझ्या पत्रातल्या ओळी गजाआड असलो तरी मनाने तुमच्यात आहे . सारे सूर संपून गेलेत असं का तुला वाटतं ? अगं , आता कुठे सूर लागलाय माझा . माझं मुक्त मन ,सूर जुळवून तब्बेतीनं गातंय .हे दिवसही संपणार आहेत . सन्मानाने संपणार आहेत . तोपर्यंत तुझे सूर हरवू नकोस .

अरे राजा , माझ्या प्राणातला कोमल गंधार तू कोवळ्या शब्दांनी जपला आहेस . तीव्र मध्यमाचे कणखर स्वरही माझेच . प्राणांना शोष पडला तरी विझू देणार नाही मी ते !

पूजेसाठी आणलेल्या कमलकळीत भृंग निघाला नि इंद्राने यक्षाला शिक्षा ठोठावली . एक वर्षाच्या सक्तीच्या विरहव्यथेची . यक्षाची रवानगी रामगिरी पर्वतावर . तर , विचारी यक्षपत्नी अलकानरीतल्या घराच्या सौधावर उभी राहून वाट पहातेय ! हजारो

वर्षांचा कालावधी वाहून गेला. पण सामान्यांना धारेवर धरून शिक्षा करणारे इंद्राचे सिंहासन आणि इंद्र आहेच. कधी शिक्षा ठोकणार इंद्र तर कधी सिंहासन-विराजमाना इंद्राणी! सत्तरी ओलांडलेले माझे आजोबा. ऐन तिशीत विधुर झालेले. आपल्या कच्च्याबच्च्यांसाठी स्वतःच्या भावनांवर पालाण घालून एकाकी आयुष्य जगलेले. आषाढाचा पहिला दिवस आला की मला म्हणत. "शैला बयो, मेघदूत वाचलं आहेस? कोण होता कालिदास?"

मग माझ्या निमित्ताने कापऱ्या आवाजात गुणगुणत ...

... काचित कान्ता विरह करुणा ...

... आषाढस्य प्रथम दिवसे ... मेघमाश्लिष्ट सानु .......

त्या पावसाळी हवेत भिजलेले ते शब्द कळण्याची अक्कल तेव्हा नव्हती. पण आषाढातला पहिला दिवस आला की सारे आठवते. कालिदासाच्या यक्षाने कोसो दूर असलेल्या प्रिय पत्नीला मेघांबरोबर संदेश पाठवला. आज एक यक्षपत्नी- पुन्हा चुकले बघ- मी एकटीच का विरहिणी आहे? माझ्यासारख्या हजारो विरहिणी हिमालयापासून ते कन्याकुमारीच्या पायथ्यापर्यंत विखुरल्या आहेत. पावसाच्या पहिल्या स्पर्शाने त्यांच्याही अंगातून लक्षतारा रुणझुणल्या असतील आणि विरहाच्या वेदनेचे कितीतरी निःश्वास हवेत मिसळले असतील. दिवाळीतल्या दिव्यांची ज्योत,उन्मत्त वाऱ्याने जिथल्या तिथे लवलवते, तसे कितीतरी पंख आतल्याआत फडफडले असतील. अशा लक्षावधी यक्षपत्नींचे घायाळ मन घेऊन,मी या मोकळ्या आभाळाखाली ... उभी आहे. आभाळाचे थवे, हो थवेच,माझ्या माथ्यावरून भरारा वाहताहेत. त्या सावळ्या थव्यांच्या कानांत मीही तुला निरोप धाडला आहे.

रेशमी पदरात या अग्निफुले मी वेचिली
धुंद होऊन चालताना वेदना ओलांडली
यात्रा तुझी होवो सुखी या इथूनी चिंतिते
स्वप्न गहिरे मिटवुनी अर्ध्यावरती मी थांबते.

❖❖❖

LIBRARY

# हा भाद्रपदाचा महिना

आणि एक दिवस भादवा अंगणात येऊन उभा राही. आषाढश्रावणातल्या पावसाने अवघ्या जगाचे रंग बहरून येत. झाडाझाडांतून रेशमी पंखाचे मोर पंख फुलारून झुलायला लागत. आषाढश्रावणातल्या उदंड बरसातीने सुखावलेली नदी लेकुरवाळ्या प्रौढेसारखी अंगभरून वाहू लागे. श्रावणातल्या पंचमीसाठी मेंदीची पाने ओरबाडताना, पाट्यावर बारीक वाटताना, माझं मन अगदी आतून वाट पाही भादव्याची. मनात कितीतरी गाण्यांची सुरीली फुलपाखरं भिरभिरू लागत.

भाद्रपदाचा महिना आला
आम्हा मुलींना आनंद झाला
पार्वती बोले शंकराला
चला हो माझ्या माहेरा ... माहेरा -
गेल्या बरोबर पाट बसायला
विनंती करू यशोदेला
टिपऱ्या खेळू गाणी गाऊ
प्रसाद घेऊ नि घरी जाऊ ... घरी जाऊ ...

आमच्या चौकोनी घरात व्रतवैकल्यांना फारसा थारा नव्हता. गणपती, गौरी वगैरे दैवतं शेजारीपाजारी येत. नवरात्रातल्या एखाद्या रात्री शेजारी मंत्रजागराचा घनगंभीर समूहनाद मनात भरून जाई. त्या सर्वांची घरे अशावेळी उधाणून जात. पण आमचे घर मात्र शांतच असे. नाही म्हणायला श्रावणातल्या एका शुक्रवारी आई पुरणावरणाचा सुपोस स्वयंपाक करी. भांडी घासणारी चंद्राबाई नाहीतर पोळ्या करणाऱ्या सुमाताईंना रांगोळी काढून, थाट करून जेऊ घाली. मनोभावे सव्वारुपया किंवा खण पुढ्यात ठेवी. त्या दिवशी माझ्या हट्टाखातर, जिवतीचा रंगीत कागद घरात येई. तो समोरच्या दुकानातून आणताना पिवळा, निळा की लाल रंगाचा आणावा हे कळत नसे. येताना एक आण्याचा हार, दोन पैशांचा कापूर आणायचा. तो कागद भिंतीवर चिटकवून मी त्याची साग्रसंगीत पूजा करी. आईच्या माहेरी व्रतवैकल्यांचा लळा होता. पण या घरात आल्यावर ती पपांच्या विचारांत पूर्णपणे मुरून गेली होती. मात्र मुलाबाळांच्या समृद्धीसाठी, आरोग्यासाठी तिच्यातली भाविक आई श्रावणातल्या

शुक्रवारी जिवती पूजन असे. तर, या अशा घरात माझी अगदी घुसमटच व्हायची. ते वय तसं अधमुरं. असोशी हौशीनं मिरवायचे दिवस. पण श्रावणात ना हळदी कुंकवाचा दणका ना नवरात्रीतले मंत्रजागर. वाणासाठी नाहीतर नवरात्रात कुमारिका म्हणून मला आमंत्रण आले की माझे मन फुलून यायचं. कर्मकांडातले वैयर्थ आज कळत असले तरी, ते विधी करताना मनाला आगळा आनंद मिळे. मनगटावर केशरचंदनाच्या रेघा. कपाळावर ओले कुंकू नि वर तांदुळाचे दाणे. भुवयांत रेखलेली हळद. न्हालेल्या केसांवर फुलांचा गजरा. रेशमी परकरपोलका. या थाटामाटात आपण कोणीतरी खास आहोत असे वाटे.

आमच्या निरामय घरात भुलाबाई मात्र थाटामाटात माहेरपणाला येई. आमच्या घरात देव, सोवळेओवळे, शिवाशिव असल्या भानगडी नसल्याने, विविध जातीजमातींच्या मैत्रिणींचा घोळका अखंडपणे भवताली असे. आमच्या उंच चढणाऱ्या आवाजाला आणि धुसमुसळ्या पावलांना थोडाफार धाक असायचा आमच्या घरमालकांचा बाबांचा. पण हा धाक घरमालक म्हणून नसे तर आमच्या कन्याशाळेचे अत्यन्त शिस्तप्रिय मुख्याध्यापक, हेडसर म्हणून असे.

घरासमोरच्या गजानन कंपनीच्या ओट्यावर श्रावणभर गर्दी असायची. आधी राख्यांचा चमचमाट. पाठोपाठ पोळ्याची धांदल. मोर्चावाड्यातली मालणमावशी श्रावण पौर्णिमेनंतर एक दिवस आपला संसार ओट्यावर मांडीत असे. टोपल्या भरभरून रंगीबेरंगी बैलजोड्या येत. काही जोड्या साध्या मातीच्या लाल कावेने रंगवलेल्या. चार आण्याला खिल्लारभर मिळणाऱ्या. पण काही बैलजोड मात्र खूप देखणे आणि सुबक. अंगावर झळझळीत गोंडेदार झूल. कपाळावर बिंदीपट्टा. सोनेरी शिंगे.

पोळ्याची दंगल संपली की गणपतीबाप्पांची चलती सुरू होई. बैलांची जागा तऱ्हेतऱ्हेचे गणपती घेत. गणेशचतुर्थीच्या संध्याकाळपर्यंत गणपती ओट्यावर असत. रात्री उरलेसुरले गणपती थकलेल्या हातांनी ती भरून टेवी.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी उठून खिडकीत येऊन पहावे तर रंगीबेरंगी भुलाबायांची उतरती आरास ओट्यावर दिमाखाने सजलेली असे. दुरूनही डोळे सुखावून जात. आंघोळ न करताच, कुरळ्या झिपऱ्या सावरीत, पेटीकोटवर फ्रॉकची झूल न चढवताच मी रस्ता ओलांडून मालनबाईकडे जात असे. मालनबाई प्रेमाने मला म्हणे, "बईन, तुले कोंची हवी? ही गुलाबी पानळवाली ठीऊ? जा, तुज्या बापाले धा आने मांगून आन."

आता माझे मन सैरभर होई. कोणती निवडावी यातनं? माझा निश्चय होत नसे. एखाद्या जोडीतल्या भुलाबाईच्या पातळावरच्या बुट्या सुंदर असत. पण भुलोजींच्या शर्टाचा रंग पिवळाधोट! जोडीतल्या भुलोजींचा फेटा जर्दजांभळा नि सोनेरी जरीचा,

ऐटदार असे तर शर्टाचा रंग गुळमट विटकरी. एकूण काय, हरेक जोडी विजोड्च. तेव्हा खूप राग येई. आता मात्र कळतं की मालणबाईच खरी शहाणी. मेड फॉर ईच अदर वगैरे पडद्यावर, नाहीतर पुस्तकातच!

मला आवडलेली जोडी अखेर सापडे. उंच उभ्या तुऱ्याचा मुकुट ल्यालेला भुलोजी. त्याचा विटकरी शर्ट बेताचाच असला तरी लक्षात येत नसे. आणि भुलाबाई तर मोठी देखणी. कानात झुबे. माथ्यावर बिंदी बिजवरा. जामूनी रंगाची साडी. जर्द हिरवी चोळी. वर सोनेरी बुट्टे. मांडीवरच्या बाळाला आकाशी कुंची. पण ...

पण म्हणजे आमचे पप्पा. पप्पांच्या जवळ आत्ताच्या आत्ता हा शब्द चालत नसे.

"आज भुलाबाई पसंत कर. आणि दोन दिवस त्याबद्दल एक शब्द बोलायचा नाही. हट्ट करायाचा नाही. मग तेरवा भुलाबाई आणू. बघ माझ्याजवळ फद्यादेखील नाही." असे म्हणत सायकलवर टांग मारून ते कोर्टात निघून जात. आईला माहीत असे की भाद्रपदी पौर्णिमआधी चार दिवस भुलाबाई आणली तर दाखवादाखवीत ती नक्कीच फुटणार. कारण माझी भुलाबाई तुझ्यापेक्षा छान - यातच खरा आनंद.

शेवटी पौर्णिमेच्या आदल्या संध्याकाळी सर्वात सुंदर भुलाबाई, खणखणीत दहा आणे मोजून घेतली जाई. पाटावर बसून वाजतगाजत घरी येई.

आई, कोनाडा आधीच सजवून ठेवी. महिरपदार मखर, त्यावर रंगीत कागदाची फुलं चिटकवलेली. शिवाय झिरमिळ्या. पहिल्या दिवशी कोणती खिरापत करायची, यासाठी मी आईचा जीव खात असे. कुण्णाला ओळखता येणार नाही, असा खास पदार्थ हवा असायचा. तीही माझ्या उत्साहात सामील असायचीच. मग कधी लालभोपळा नि गूळ घालून केलेले घारगे नाहीतर ताज्या कोवळ्या मक्याच्या कणसांचा तिखट कणसारा ती करी.

... आडावरच्या ताडावर
धोबी धुणं धुतो बाई, धोबी धुणं धुतो
भुलाबाईच्या पातळाला, जामूनी रंग देतो बाई
जामूनी रंग देतो.
भुलाबाईच्या पातळावर, सोनेरी बुट्टे काढतो बाई
सोनेरी बुट्टे काढतो ...

मुली फेरात गात. तेव्हा मन कृतकृत्य होऊन जाई. हे भुलाबाईचं वेड वयाच्या सहाव्या वर्षी मनात भरलं ते अगदी सोळा वर्षापर्यंत टिकलं. भाद्रपद पौर्णिमेपासून ते शरदपौर्णिमेपर्यन्तच्या संध्याकाळी मंतरलेल्या असत.

शाळेतून यायचं, दप्तर दारातून फेकायचं, नि हातपाय धुवून टिपऱ्या हातात घेऊन जो फेरा निघायचा तो थेट रात्रीपर्यंत. प्रत्येकीच्या घरी किमान पाच गाणी

म्हणायचीच .

' यादव राया राणी रुसून बैसली कैशी ?' या गाण्यातली रुसलेली सून मला खूप आवडायची . तिला समजावायला मामंजी , सासूबाई , दीर सगळे जायचे . पण ही महा खट . तिला दागिने नको असायचे . आमच्या वर्गात उर्षी होती . तिचं डोकं नेहमी वेगळ्या दिशेने धावायचे . मंगळसूत्र किंवा लाल चावूक घेऊन जाणाऱ्या आणि राणीला लाच देऊन किंवा धाक दाखवून आणणाऱ्या पतिराजांपेक्षा हिच्या गाण्यातला पती वेगळाच असे . ती म्हणे . " . . . पती गेले समजावायला , चला चला राणीसरकार आपुल्या घराला , दौत नि लेखणी आणली तुम्हांला . . . "

दौत आणि लेखणीच्या आहेरावर खूश होऊन आमची आधुनिक राणी तिच्या घरी परतत असे . खरं तर अधमुऱ्या गोड दह्यासारखं आमचं वय होतं . जाळीदार पडद्याआडून पल्याडचे भास जाणवावेत तसे सासरमाहेरचे वेगळेपण आम्हाला जाणवे . आणि म्हणूनच निगूतीने , खपून केलेल्या करंज्या , तवकात भरून पालखीतून माहेरी पाठवताना होणाऱ्या आनंदापेक्षा ,

. . . माहेरीच्या वाटे , गुलालबुक्का दाटे
सासरीच्या वाटे , कुचूकुचू काटे . . .

या ओळी दणक्यात गाण्याचा आनंद अधिक असे .

टिपऱ्या , खिरापती , कोजागिरीची जाग्रणं , खेळ , नाटकं , नाच अशा शेकडो आठवणींचे जिवंत मोहोळ या व्रताभोवती गुंफलेले आहे . आज पस्तीस वर्षांनंतरही ते जागले की मन मोहरून येतें .

खानदेश , विदर्भ , बागलाण या परिसरात भाद्रपदपौर्णिमेपासून ते अश्विनी पौर्णिमेपर्यंत ८ ते १५ वयाच्या मुली भुलाबाई मांडतात . भुलाबाईला व्रत म्हणण्याऐवजी लोकोत्सव असे म्हणणे अधिक योग्य होईल . कारण या उत्सवात- या व्रतात कोणतेही कठोर कर्मकांड नसते . जणू तो एक खेळाचाच प्रकार . आठ ते चौदा वयोगटातील कुमारिका , सर्व जातीतील मुली हा उत्सव साजरा करतात . पश्चिम महाराष्ट्रात सांगली , कोल्हापूर , पुणे , नगर भागात या लोकोत्सवाशी अगदी मिळताजुळता असा भोंडला मुली मांडतात . दोनही उत्सवातील नमनगीत आणि इतर एकदोन गाणी वगळल्यास बहुतेक गाणी सारखीच आहेत .

वऱ्हाड , खानदेश , मालेगाव , बागलाण भागात भुलाबाई भाद्रपद पौर्णिमेला माहेरपणाला येते . रोज सायंकाळी आळीतल्या मुली एकत्र येऊन , प्रत्येकीच्या घरी , भुलाबाईसमोर टिपऱ्यांवर गाणी म्हणतात . भुलाबाई आणि भुलोजीची जोडमूर्ती असते . भुलाबाईच्या मांडीवर बाळ असते . भुलाबाई बाळंतपणासाठी माहेरी आलेली असते . पहिले अकरा दिवस बाळाची बाज असते . बाराव्या दिवशी बारसे , बाळाचे नाव रोज ठेवले जाते . तेही असे . . .



college of social Science Library Ambajogai 431517 Dist. Beed

आकाश वाई आकाश
अस्सं कस्सं आकाश
भुलोजीला लेक झाला
नाव ठेवा प्रकाश ...

शेवटी बाळाचे नाव गणपती वा गजाननच ठेवतात. भाद्रपद महिना वर्षाऋतूतल्या अखेरच्या चरणातला. पिके पोटऱ्यात आलेली असतात. अश्विनथंडी बरोबर रानातल्या तुरीवर पिवळा फुलोरा फुलायला लागतो. नवी साळ तयार होत आलेली असते. अशावेळी येणारा हा उत्सव जणू भूमीच्या उर्वराशक्तीच्या, तिच्यातील सर्जनशक्तीच्या सत्काराचे प्रतीकच! कदाचित काळाच्या प्रवाहात मूळ उत्सवाचे स्वरूप बदलले असेल. कुमारिकांच्यात असुशक्ती ... म्हणजे एकप्रकारची जादुईशक्ती असते असा समज होता. वयात येणाऱ्या, ज्यांच्यातील उर्वराशक्ती, जननशक्ती जागृत होण्याच्या मार्गावर आहे, अशा कुमारिकांकडून शेताभाताची पूजा करण्याचा आणि त्याद्वारे धनधान्य समृद्धीची कामना करण्याचा संकेत तर या उत्सवामागे नसावा?

भाद्रपद आश्विनात सायंकाळी उत्साहाने बहरलेल्या पोरीसोरींचा घोळका या घरातून त्या घरात जाताना दिसे. आज मात्र असे घोळके फारसे आढळत नाहीत. भुलाबाई मांडणाऱ्या मुलींच्या गटात जातीभेदाला मुळीच थारा नसे. ब्राह्मण, मराठा, सोनार, साळी, माळी सर्व जातींच्या पोरी एकत्र असत. माझी एक दलित मैत्रीण भुलाबाई मांडल्याचे सांगते. भुलाबाईची जागा बहुदा देवघरात नसे. आश्विन पौर्णिमेला एकत्र जमून जाग्रण करायचे. त्यादिवशी सर्व पारंपरिक गाणी म्हणायची. प्रत्येकीने मोठ्ठा डबा भरून घसघशीत खाऊ आणायचा. आणि जाग्रणाच्या निमित्ताने नाच, गाणी, नाट्यछटा, नाटके असा भरगच्च कार्यक्रम. रात्रभर धिंगाणा असे. सकाळी घरोघर परतायचे ते पुढच्या वर्षीच्या आश्विनभादव्याची स्वप्ने मनात गोंदवून.

आता ते रुणझुणते भादवे हरवले आहेत. आता दरवर्षी श्रावण बरसतो आणि हरवलेल्या भादव्यांची स्वप्ने आठवीत कधी भाद्रपद उलटून जातो तो कळत नाही.

❖❖❖

# आंब्याच्या कोयीवरून घसरताना

उन्हाचे वाभूळवन आता चांगलेच फोफावलेय. अशी लखलखीत उन्हे की, पहाता क्षणी नजर भाजून निघावी. अशा या उन्हात दारासमोरच्या गुलमोहराचे लालचुटुक छप्पर नजरेला थोडा थंडावा देते. छतावरचे पंखे पांचावर ठेवले नि कलरच्या जाळीतून वाळ्याचे गंधगार वारे खोलीत खेळवले तरी अंगाची काहिली होतच रहावी, असा सरता मे महिना. माथ्यावरचे छप्पर नि खिडक्यांची दारे वितळवून टाकणारा अंगार शिगेला पोचला असतानाच, एक दिवस वर्तमान पत्रातून बातमी येते. मान्सून केरळात लवकरच दाखल होणार. त्या कल्पनेनेही मनाला गारवा येतो आणि काय? एक दिवस चक्क एक थंडगार, गंधदार झुळूक घामेजल्या अंगावर फुंकर घालून गेली. दुसऱ्या दिवशी मी मान्सूनची बातमी शोधू लागले. तर मान्सून ढगाचे गडद सावळे छायाचित्रच समोर दिसले. आणि माझ्या नाकाला मातीचा खमंग गंध . . ., आकाश आणि मातीचा पहिल्या भेटीचा मादक गंध हुळहुळून गेला. आता जून नक्कीच जवळ आलाय. एकतर रोज न् रोज कोणत्या ना कोणत्या परीक्षांचे निकाल लागत आहेत. आणि या मान्सून-स्वागताच्या बातम्या. म्हणजे उन्हाळा नक्कीच संपत आला तर!

गेल्या वर्षी केवढी वाट पहिली या जूनची! घरात एक परदेशी पाहुणी उतरलेली. ती स्कॉटलंडची. भर बर्फाच्या प्रदेशातून २५ मे रोजी निघालेली ती २७ मे रोजी थेट अंबाजोगाईला येऊन थडकली. अगदी मराठवाड्याच्या फुफाट्यात, खिडकीतून येणाऱ्या गरम वाऱ्याच्या स्पर्शाने ही गोरी पोर पार लालेलाल होऊन जाई! आणि तरीही तिचा हट्ट दुपारी खेड्यात जाण्याचा. शेवटी मी तिला विनवले, बाई ग ऽऽ मृगाची बरसात होऊ दे. मग खुशाल खेड्यापाड्यातून भटकंती कर.

जून उजाडला की मनावरची मरगळ झडून जाते. पोरांना वेध लागतात शाळेच्या पहिल्या दिवसाचे. वह्या पुस्तके, त्यावरची खाकी कव्हर्स, गणवेशाची खरेदी यांची धांदल. खरे तर या वेळेपर्यंत सुट्टीसुद्धा अजीर्ण व्हायला लागलेली असते. घरादारातून लोणच्याचा पसारा पडलेला असतो. हळद, मीठ, तिखट, फोडी यांच्या पसाऱ्यात अडकलेली आई. हिंगमेथीची खमंग फोडणी, मसाल्यात घोळलेल्या फोडी. या फोडी आजी नि आईची नजर चुकवून, बचक भरून, लपवून आणण्याने त्याची चव

आणखीनच खमंग व्हायची. मग कुणाला कळणार नाही अशा अडगळीच्या खोलीत किंवा घरामागच्या पायऱ्यांवर बसून निवान्तपणी ती आंबटनिखट चव जिभेवर घोळवीत शाळेला आठवायचे. यंदा गणितात बढती मिळालेली. इंग्रजीत पोटापाण्यापुरते गुण मिळालेले. एकीकडे मनातल्या मनात लाज वाटत असे. पण दुसरीकडे नव्या वर्षात खूप अभ्यास करण्याचा निश्चय मनातल्या मनात होत असे. तर असे निश्चय करण्याचा, शाळकरी मुलांचा लाडका महिना... जून!

पण मनाला रुखरुखही लागत असे. जून आला म्हणजे आंब्याचे दिवस संपत आल्याची जाणीव मनाला होई. ज्याला खरे आंबे म्हटले जात ते हापूस लहानपणी क्वचित खायला मिळत. एरवी रायवळ आंब्याचे तऱ्हेतऱ्हेचे नमुने बाजारात येत. हापूसची, आंब्याच्या राजाची चव चाखली उंबरगावात. हे समुद्रतटावर वसलेले चिमुकले गाव आमच्या आत्याबाईचे. तिच्या घरी आंब्याची प्रचंड वाडी होती. सकाळी उठल्यावर आम्ही तोंड खंगाळून थेट आढीत जात असू. तिथे आत्याबाई आणि काकांनी निरनिराळ्या तऱ्हेचे आंबे काढून ठेवलेले असत. आंबा जरा आंबट निघाला तरी आम्ही तो खुशाल फेकून देत असू. दिवसभर आम्ही आंब्याच्या खुराकावर असायचो. तरीही शेजारच्या वाडीतून, दगड मारून पाडलेल्या पाडाची गुळमट, आंबट चव जिभेवर चांदण्या गोंदवून जाई. आणि आज ? आंबे मिळताहेत किलोवर, शेकड्याचे युगही संपलेय. पूर्वी छकडी मापाने शेकडा एकशे वीसचा असे. आम्हाला आजी म्हणायची, "दळभद्री पोरं गं तुम्ही. आमचे काळी मुठीमुठीने काजूखिसमिसचा खाऊ मिळायचा. तुम्ही खा लिमलेटच्या नि चाकलेटच्या. आंबे, केळी, पेरवांनी लादन्या, कोठ्या भरून जात. पण विकण्याचं शहाणपण नव्हतं हो. लोकांना वाटता वाटता दम लागत असे."

आता आम्ही आमच्या नातवंडांना काय म्हणावयाचे ? वंट्या एकच चमचा रस घे हं. पुन्हा रस मागायचा नाही! उद्या पुन्हा चमचाभर देईन!

आंब्याबरोबर आठवते वटसावित्रीची पूजा. माझ्या आजोळीच आम्ही असायचो. ज्येष्ठी पौर्णिमेला समोरच्या पार्लेश्वर मंदिरात सकाळपासून रीघ लागत असे. रेशीमसाडीचा लफ्फेदार पदर सावरीत, नाकातली नथ डाव्या हाताने नेटकी करती उजव्या हातातले जाळीदार झेल्याने झाकलेले तबक सावरीत सवाष्णी येत. त्या आमच्या आजोळच्या नांदत्या घरात, सवाष्ण या शब्दाचा अर्थ, नकळत्या वयात कळला. घरातल्या काही स्त्रिया लगबगणाऱ्या. वहारून कामे करणाऱ्या. तर काही नेहमीच पांढऱ्या साड्या नेसणाऱ्या. माझी मोठी मामी नि आजी कसनुसल्या सारख्या असत. इकडेतिकडे तोंड लपवित डोळे गाळणाऱ्या बायका. वटसावित्रीच्या दिवशी मीही रेशमी परकर नेसून आईबरोबर पूजेला जाई. बरोबर मावशी असे. माझ्या

अप्पामामाला हापूसच्या पेट्या आणायचा भारी शौक . भाचरांना भरभरून आंबे खाऊ घालण्यात त्याला आनंद असे . आई नि मावशीला पाहून गुरुजींचे डोळे , चकाकत . त्यांच्या ताटातले रत्नागिरी हापूसचे आंबे त्यांच्या डोळ्यांना , नाकाला अगदी भिडून जात . त्यांना माहीत असे की इथले आंबे चोखे रायवळ असणार नाहीत . पूजा सांगून झाली की ताटातले रसरशीत पिवळे आंबे अगदी हळुवार हातांनी ते उपरण्यात बांधत .

वय वाढत गेले तसे सत्यवानाची सावित्री अधिक उमजू लागली . यमाला प्रश्न विचारणारी , त्याच्याशी वादप्रतिवाद करणारी , शब्दांच्या जाळ्यात गुंगवून त्याच्याकडून पतीचे प्राण आणणारी सावित्री . पण या सावित्रीच्या चातुर्याकडे लक्ष न देता , वडाला दोरा गुंडाळणाऱ्या नि हळदीकुंकवाच्या पूजेत धन्यता मानणाऱ्या स्त्रिया पाहून मन वैतागत असे . याच सुमारास ओळख झाली नव्या सावित्रीशी . शेणकचऱ्याचा मारा फुलासारखा झेलून पोरींबाळींसाठी शाळा चालवणारी , ज्योतीबाची सावित्री ! पतिपत्नींच्या सहजीवनाचा इतका सुंदर आविष्कार मनाला मोहवून गेला . ज्योतीबाच्या हृदयातील प्रत्येक नवा विचार या सावित्रीने आत्मसात केला . पोकळ पातिव्रत्याचा नव्हे तर पतिपत्नीमधील सुजाण बांधिलकीचा नवा ऋजू आदर्श सहजपणे मनावर खोल खोल कोरला गेला . या सावित्रीने महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाची ज्योत चेतवली . अंधारयात्री स्त्रियांना प्रकाशाची वाट दाखवली . आज महाराष्ट्रात स्त्रिया विविध क्षेत्रात आघाडीवर आहेत . या सावित्रीची आठवण किती जणींना येते ? आठवण जाऊ द्या , पण किती जणींना या सावित्रीच्या कर्तृत्त्वाची खरीखुरी ओळख असते ?

आपला जोडीदार दीर्घायुषी व्हावा , त्याची साथसंगत आयुष्यभर लाभावी असे कोणाला वाटत नाही आणि वाटणार नाही ? पण तो साथी असायला हवा . आश्वासक श्वासांनी फुलवणारा जोडीदार हवा . कितीजणांना असा साथीदार मिळतो ? माहेरातून सोनेनाणे वा भेटवस्तू आणण्यासाठी पत्नीचा छळ करणाऱ्या ,तिला मारणाऱ्या , नरपशूबद्दल तो केवळ नवरा आहे , म्हणून कितीजणींना अंतरात्म्यातून प्रेम . . . ओढ वाटत असेल ? आणि वडाची पूजा करून का कुणाचे आयुष्य वाढवता येते ? हे का कळत नसेल त्यांना ? पण हजारो वर्षांपासून चालत आलेल्या परंपरा कुणी नि कशा तोडायच्या ? जग काय म्हणेल ? हे सारे कळूनही वडाला दोरा बांधण्यात धन्यता मानणाऱ्या स्त्रिया कमी का आहेत ?

अलीकडे वडाच्या पारावर जायला लाज तर वाटते . पण व्रत न केल्यास काय घडेल याचे भयही वाटते . मग कुंडीतल्या वडाच्या फांदीची पूजा करायची ! हे असं का ? कधी संपणार ही अज्ञानयात्रा ? या व्रताला नवे रूप का देऊ नये ? व्रताच्या भोवती एक गोडवा असतो . मानसिक निर्धार असतो . त्या निमित्ताने अनेकजणींचे एकत्र येणे , मनाची झटकून जाणारी मरगळ , गाणी , जगण्याच्या आनंदाचा प्रत्यय



...navic College of Social Science Library Ambajogai-431517, Dist. Beed

नव्या सावित्रीत आणि जुन्या सावित्रीत एक साम्य आहे. ते म्हणजे ज्ञानांच्या प्रकाशाच्या दिशेने जाण्याची जिद्द. ' तमसो मा ज्योतिर्गमय ' चा ध्यास. माझ्या खेड्यापाड्यातल्या भूमिकन्यांना हा नवा विचार नक्कीच सांगता येईल. पण डोळे असून ते मिटून घेतलेल्या शिक्षित भगिनींच्या मनावर चढलेली बुरशी कशी दूर होईल ?

आंब्याच्या कोयीवरून घसरून किती दूर आले मी ! तर आता जून उजाडलाय. दर वर्षी तो ठरल्याप्रमाणे येतच राहील. उद्या एखादी नाचरी सर झिमझिमून जाईल. उन्हाचे धुळकट राप गळून पडतील, वाहून जातील. मन पुन्हा एकदा ताजेतवाने होऊन, नव्या ऋतूचे, नव्या विचाराचे, नव्या ज्ञानाचे स्वागत करण्यासाठी उत्साहाने भरून जाईल. अशा वेळी माझ्याही ओठावर येतील स्वरगंधात न्हालेले ओलेचिंब शब्द.

लाख धारांचा ... धारांचा
कसा सोसावा बहर ?
काळ्या रेशमी पोतात
जडवीले निळे मोर ऽऽ
चहु अंगांनी ... चहु अंगांनी
रान मोरांचे ... मोरांचे
लाख डोळ्यांचे शहार
अंग रंगात ... संगात
सहा ऋतूंचे बहर
चहु अंगानी ... चहु अंगांनी ...

❖❖❖

# शारदा, कमला ... अन् स्त्रीमुक्ती वर्षही !

ही शारदा,

वरी आहेस ना? मी विचारताना माझी नजर तिच्या उंचावलेल्या पोटावर स्थिरावलेली. ती संकोचली नि लाजली.

हाय की वरी. वरी नसाया काय झालंय? तिच्या शब्दात खोच.

केव्हा आलीस आईकडे? माझा प्रश्न.

लई दीस झाले की, लगीन झाल्या झाल्या चार महिने होत्ये सासूपाशी. पंचमीला आले ती हितंच हाय की! पुन्हा नेलंया कुठे! आन् नवरावी हितंच हाय कॉलेजात. त्यो हितं आन् मी काय करू तिकडं जाऊन?

कितवा महिना? हाय सातवा ...

काय बोलावं हे तिला सुचेना. ती तशीच जमिनीकडे पहात उभी राहिली. पण मनात काहीतरी खदखदत असावे. मूळचा हळदी रंग आता आणखीनच खुललाय, नाकावरचं गोंदण इतकं सुरेख दिसतंय की मोरणी दिसतंय फिकी पडावी. पण डोळ्यांच्या कडा टोपसून आलेल्या. पायावरही सूज असावी. नजर सुन्न खिन्न.

मोठ्या दवाखान्यात दाखवून आलीस? औषध वगैरे घेतलेस का? आणि वाताचं इंजेक्शन दिलं की नाही? एक फालतू प्रश्न. खरं तर हा प्रश्न आपोआपच विचारला मी.

इतका वेळ रोखलेला बांध फुटला नि ती भडाभडा बोलायला लागली. कुटचा दवाखाना नि कुटचं काय? अवं धा महिनं झालं लगीन होऊन पर त्येच्या घरचं कोरभर कापड न्हाई पोलक्याला. पातळ पार चिंधाटून गेलयं. दांड बी घालता यीना. पण कुनाला काय माया यीना माजी. हा हिते न्हानार नि मी जावाभावांजवळ शेतात दिवसभर राबायचं. या लोकांच्या घरी तुकडाबी मिळाया मारामार. लाल मिल्लोची अर्धी भाकर नि चिमुटभर चटनी. कामाचं काई नाई वाटत हो- पर पोटाला पोटभर हवं की नको? अन् त्यात ह्यो कार. मोप पपया खाल्ल्या, चोरु चोरु खाल्ल्या, पर काई झालं नाई.

बाईचं देखणं रूप जीवावर उठतंया. काय सांगावं तुमा लोकानला? दीराची

बायकू बाळातीण. आपरीशन केलेलं.. त्यो दोन म्हईने भुका. ह्ये हितं लिवायला. एकदा रातीचा काईबाई बोलाया लागला. मी इराकत कराया लागले तर तितंच आडविलं. नगं म्हणाया लागले तर म्हनला तुज्या नवऱ्याला सांगीन, तुझी बायको छिनाल हाय. काय करावं या भोगाला? सांगा! दुसऱ्या दिशी पंचमीचं निमित्त करून थेट इथं आले ती गेलेच नाई. नवऱ्याला सरकारी पैशे मिळतात. कालरशिपीचे चाळीस नि पाच. त्यातून एकादं धडूतं घ्यावं म्हनलं तर म्हनतो भाऊ रागवल. चार म्हहिनं झालं हितं हाय. तर्शी त्यांचं समदं करते. खोली झाडते. दोगावी मित्रांचा सैपाक करते. पानी ... सडा ... सरपण समदं. पर त्याला इतकुशी बी माया येईना. कदींची माय म्हणतीया. बाईकडे जा. एकादं लुगडं नि पोरांचे कपडे आण. बाळातपणात सोय हुईल. पर माझं मनच हुईना.

बाई लगीन झालं नसतं तर होता का जंजाळ? पर माईला कुटला ईसवास हाय? धरलं लेकरू न की बांधलं दावणीला ...

तिचे डोळे भरून आलेलं. ती मुक्यानं, नजर नि पायाचा अंगठा जमिनीत रोवीत गच्च उभी रहाते.

ही माझ्याघरी आली चार वर्षापूर्वी. जेमतेम अकरा वर्षांची असेल. गोरीपान, धरधरीत नाक, हिरवे गोंदण, छोटीला छान सांभाळायची. माझ्याबरोबर थेट पुण्यामुंबईपर्यंत हिंडून आली. कुणीही म्हणे कुणाची गं ? मारवाडी का ब्राह्मण? ही खरी चांभाराची पोर. अगदी सनातनी मारवाडी घरातही घरच्यांच्या पंक्तीत जेवून उठली. पण कुणाला संशय आला नाही. कामातही हिची नेहमी लुडबूड. गॅसवर चपात्या करणं, मिक्सरवर चटण्या वाटणं, बटाटेवडे, दहिवडे सगळं हौशीने शिकली. आम्ही घरी नसताना येणाऱ्या पाहुण्यांची कशी आवभगत करायची! कुणाला चहा द्यायचा, कुणाला जेऊ घालायचं याची गणितंही हिला पटापट जमली. एक दिवस तिची माय आली. म्हणू लागली बाई पोर शाणी झालीया. लगीन करावं म्हणते. चौदा वर्षाच्या पोरीचं लग्न. कसंसंच वाटलं. इतकी घाई कशाला? जाऊ द्या चार वर्ष. मग मी सुद्धा पाहीन चांगलासा मुलगा, मी समजावण्याचा प्रयत्न केला.

अवं जेचा माल त्येच्या पदरात. माझ्यावर ओझं नगं. शाणी पोर घरात ठेवायची म्हंजी पदरात इस्तू बांधून न्हायचं. तिचा ठोक हिशोब.

शारदाचं लग्न झालं. अवघ्या आठ नऊ महिन्यांपूर्वी. आज माझ्यासमोर शारदा उभी होती. पंधरा वर्षांची. कृश शरीर. पिळवटलेली नजर. उंचावलेले पोट, पोटाचा भार शरीराला पेलवेनासा झालाय. मनाला तर कुठला पेलवणार? पण पोरीच्या मनाचा विचार कोण करणार? का करणार?

कमला

कमला आलीय डोळे तपासायला, ही माझ्या अगदी दूरच्या नात्यातली. सासरेबुवांनी इथे आणून घातली. सतरंजीवर अवघडून बसलेली. उंचीपुरी, शेलाटी, चेहरा कसा दिसावा? हातभर घुंगट काढून मान घालून बसलेली ही!

आम्ही बाजारात जाऊन येताव. काई बोलणो, जिको बाईसानं बोलो. डागदरसाब थाका ससुरा लागे. ध्यानमा रखजो ...

सासरेबुवांची सूचना. समजणाऱ्यांनी समजून घ्यावी, ती ओठातल्या ओठात काहीतरी पुटपुटली. शब्दांची खसखस नि पापण्यांची फडफड मला तलम घुंगटाआडूनही जाणवली. तिने पर्स उघडून विसाची नोट समोर टाकली. चप्पला टूटगी म्हारी. सासऱ्यांनी पैसे उचलले. काय करायची चप्पल नि फिप्पल. आजकाल छोऱ्याकी रीतही न्यारी निराली. सासरेबुवा कुरकुरत बाहेर.

मला उकाडा असह्य झाला. दार लावून मी तरातरा आत आले नि तिचा घुंगट मागे ओढला. नही जी सासूजी. कोई देख्या तो. तिची दीनवाणी विनवणी.

सासूजी गेली खड्ड्यात. घुंगट तुझा नि उकडतंय मला. हे काही घानोरे नाही नि तुझे सासरे पोचलेसुद्धा बाजारत. खुशाल खांद्यावर पदर घेऊन मोकळी होऊन बैस. आता जरा ती मोकळी झाली. अंगभर दागिने, अंगावर अगदी लेटेस्ट साडी. हातात घड्याळ, तरतरीत नाक, लांबट चेहरा, पाणीदार डोळे नि पापण्याची दाट झालर. पण त्यात अपार कारुण्य. डोळे सारखे दुखतात ही तिची तक्रार.

का गं चुलीचा धूर सोसवेना का? मी हसून विचारले.

ती पुन्हा गोरीमोरी झाली. गळ्यात हुंदके दाटून आले. अंग थरथरू लागले.

माझ्या खांद्यावर माथा टेकून ती हमसून रडायला लागली.

खरं सांगू भाबी? रडून रडून डोळे विरघळून जाणार आहेत माझे. आंधळी होणार आहे मी. अजून सोळावं पुरं संपलं नाही तर बाईंनी लग्न लावून दिलं. विहिरीत ढकललं असतं तरी सुखानं मेले असते हो. हे जीवन सोसवत नाही मला. मग खूप रडते. खूप रडते.

कमलचं माहेर बार्शीचं. विधवा आईची एकटी लेक, मॅट्रिकपर्यंत शिकलेली. अड्डुसष्ट टक्के गुण घेऊन पास झालेली. पण गरीबाची. कल्याण करण्याचा सोसही अनेकांना असतो. त्यात लग्नाची मध्यस्थी करून तर पुण्य मिळतं म्हणे. एक श्रीमंत शेटजींनी धानोऱ्याची सोयरीक आणली. आणि धर्म म्हणून लग्न करून दिले.

मुलगा सातवी पास झालेला. थोराड अंगाचा, खेडवळ वळणाचा, आईबाप नसलेला. आजोबांच्या लाडात वाढलेला. घरी भरपूर शेती. किराणा दुकानही. सासऱ्याला हवी होती देखणी सून. सासूला हवा होता स्वस्तातला जावई. मुलगी



Balbhim? ... College of Social Science Library ... Ambajogai- 431517, Dist. Beed

मारवाडी समाजात दहा हजाराखाली कोण हुंडा घेणार ? शिवाय शेटजींना साधायचा होता पुण्यधर्म . तिघांचीही सोय झाली . लग्नाच्या सौद्यात सोय पाहिली जाते बापाच्या खिशाची . पोरगी घराबाहेर काढायची इतकंच तिला महत्त्व .

कमल धानोऱ्यात आली . सासरं सनातनी . घुंघटाची लांबी इंचाइंचानं मोजणारं . काही वाचायला मिळावं म्हणून ही आसुसायची . एकदा नवऱ्याने मासिक आणून दिले .' असली थेरं माहेरी करा . इथे इथल्या रीतीने रहावं लागेल ,' अशी समज मिळाली .

घरी कुणी बाई बोलायला आली तरी सासरा आतबाहेर चकरा मारणार . कुणाला चहा करावा तर कपाटाच्या किल्ल्या सासऱ्याच्या कडोसरीला . नवरा तसा बरा . पण तो दिवसभर रानात आणि दुकानात . रात्रीच भेट . तेव्हाही दुसऱ्याच बोलण्याची घाई . शिवाय आईबापावेगळे लाडात वाढवलेले लेकरू . त्याला दुखवून चालणार नाही हा धाक . कमलच्या हाती उरलंय रडणं . फक्त रडणं . डोळे विरघळेस्तो रडणं .

## विमा

परवा विमा आली होती , तिखट हळद कुटायची का विचारायला . ही डी .एड .झाली आहे . लहानपणापासून कामाची सवय . चार घरी धुणीभांडी , दळणकांडं करीत शिकली . वडील लहानपणीच वारलेले . घरी आई , ही नि दोन वर्षांनी धाकटा भाऊ . आई चार घरी धुणंभांडी करायची . विमल पास होत गेली . शिकत गेली . नकळत संसाराची स्वप्नं रंगवत गेली . पण दोन वर्षे झाली डी .एड .होऊन . नोकरी नाही . मामा लग्न जमवायचा प्रयत्न करताहेत . पण त्यातही यश नाही . कधी रूप आडवं येतं , तर कधी गरीबी . आज खूप रडली . लोक म्हणतात , तुमची वस्तूही अशीतशीच नि पैसाही लावणार नाही . कसा जमावा सौदा ?

" परजातीत लग्न करते का ? मी पहाते एखादा होतकरू मुलगा ," मी विचारले .

काही तरी भयंकर आपत्ती कोसळावी असा तिचा चेहरा .

परजातीत ? बाई जितं मारून टाकील मामा . मला सगळं पटतं हो . पण कुणाच्या आधारावर जात तोडू मी ? एकादा बिजवर जरी समोर उभा केला तरी माळ घालायची . मी म्हणजे मढं झालंय . चालणारं . . . बोलणारं . . . तिचे डोळे अगदी भरभरून आले . तिने पटकन डोळे पुसले नि मिरचीचा डबा घेऊन ती निघून गेली . मन अस्वस्थ होतं . पण नुसतंच अस्वस्थ . शेवटी हे अस्वस्थपणही वांझोटंच !

## वीणा

अगदी अचानकपणे वीणा भेटली . जवळजवळ बारा वर्षांनी . मन उधाणून आलं . नवरा मोठ्ठा पगारदार . घरी मिक्सी , फोन , डायनिंग टेबल सगळं . पण ही

आपली बारकुळीच. मी आपली भसाभस बोलत होते. पण हिचं बोलणं काहीसं मिटमिटतं. भेटीचा आनंद फक्त चेहऱ्यावर. पण ओठ गच्चच. वीणे, जरा माझा आदर्श घे. फार नाही. थोडा. इतकी कशी गं तू बारकुडी. सुखसुद्धा सोसता येऊ नये?

नंतर दुसरीकडून कळलं. वीणाचा नवरा खूप दारू पितो. घरात जवळजवळ नसतोच. एरवी वागायला बरा.

एक दिवस तिचं पत्र हातात पडलं.

"लिहू नये पण लिहिते. सगळी दृश्य सुखं आहेत. पण मुन्नीचे वडील चिकार पितात. तुला माहीतच आहे माझं माहेर किती सोज्वळ! मोकळं वातावरण होतं तिथे. त्यांचं पिणं मी नाही सहन करू शकत. प्रचंड दुरावा आला आहे आमच्यात. दूर जाऊन मुक्त होण्याची ताकदही माझ्या मध्यमवर्गीय मनात नाही. मुक्त व्हावंसं फार वाटतंय... पण समोर क्षितिज नाही. आज वाटतंय शिक्षणानं मन ... संस्कार दिले नसते तर फार बरं झालं असतं. निदान ही गुदमर तरी निर्माण झाली नसती."

तिचं पत्र समोर पडलंय माझ्या. मला आठवतेय दोन वेण्या झुलवित खोखो खेळणारी वीणा.

मी

तू इथे नसलीस की बोअर होतो बुवा मी. अरे, सुट्टी आहे तोवर ताजं जेऊ घाला आम्हाला. इथेच रहा बुवा तू." तो.

"ते काही नाही हं. मी बिहारला जाणारेय. सुट्टीतच जमतं सगळं. मग आहेच बांधिलकी." मी.

"तिथं या दिवसांत लू असते. माणसं पटापट मरतात सनस्ट्रोकनं. बघ बुवा. आपण काही नाही म्हणत नाही. पण तुला सोसवेल?" तो.

"न सोसवायला काय झालंय ऽऽऽऽ?" मी.

"शहादा, सोमनाथ, यूथ फेस्टिव्हल ... किती हिंडलीस या वर्षात? ए बिहार वगैरे नाही हं. वाटल्यास आईकडे जाऊन ये चार दिवस. आज काय तारीख आहे? पंचवीस. पुढच्या चार तारखेला नाईट क्वीनवर येतो मी तुला घ्यायला. निघा आजच. बघ किती उदार आहे मी!" तो

❖❖❖

# सोनकणीस

गावापासून दूरदूरवर महादेवाचें भलेमोठं तळे आहे .ऐन उन्हाळ्यातही त्यात पाण्याचे सुख उदंड साठलेले असते . निळ्याशार आकाशाचे लोभस रुपडे डोळ्यात साठविणारे संथ पाणी पहायला मी नेहमीच उत्सुक असते . शिशिरातल्या झांझरदवात न्हालेला , पहाटेच्या धुक्यात लपलेला ओला काठ पापर्णात साठवून घ्यायला आवडते तें ऐन आश्विन कार्तिकात . तळ्यातल्या संथ पाण्यावर तरंग वलये उमटत असावीत , वेल वृक्षाच्या घनदाट सावलीत ,बुंध्याला टेकून बसावे नि डोळे मिटून घ्यावेत . त्या गंधखुळ्या हवेत आपणही स्वप्नगंधा होऊन विरून जावे !

तळ्याला लगटून केवड्याचे प्रचंड वन आहे . काट्यांनी भरलेल्या या कुरूप काटेरी रानाकडे एरवी कुणाचे फारसे लक्षही जात नाही . मोठ्यामोठ्या फड्डेदार नागासारखी लांबचलांब हिरवी पिवळी काटेरी पाने पहिली की उरात अनामिक भयाची वीज मात्र थरकून जाते . पाय आपोआप चार पावले दुरून चालतात .सुस्तावलेल्या प्रचंड अजगरासारखे हे वन आठ महिने नुस्ते पडून असते . पायतळी सुकलेल्या पानांचा ढीग , अंगावर कोळीष्टकांची जाळी . काटेरी पानांचे वेढे .असे हे शुष्क वन पाहिले की गोष्टीतली जख्ख म्हातारी चेटकीण आठवते .

पण , एक दिवस जादूचा असतो . दक्षिणेच्या दारातून वलदंड मेघांचे सावळे थवे सुसाटत येतात .गरजून वरसून जातात . मृगाच्या स्पर्शांनी या काटेरी वनाला जाग येते . वोचऱ्या काट्यांतून तरल चैतन्याचे पाट वाहू लागतात . त्या उन्मादाच्या भरात , गंधवती धरेच्या कणाकणातला सुगंधरस पिऊन केवडा वेहोष होतो . सरता ज्येष्ठ आणि आषाढाच्या ऐनातले ओढाळ पाणी पिऊन सुखावलेल्या पानांच्या मधोमध अपार गंधाची कळी आकारू लागते . पिवळ्याधमक सोनसळी रंगाचे झगमगीत सोनकर्णीस डोकावू लागते . त्या गर्भरेशमी वडस पानांच्या सात पदरी पडद्यांमधून फुटणाऱ्या गंधलाटा कणाकणांतून लहरू लागतात .

केवडा म्हटला की घनदाट गंधाची लहर .सुरेख पिवळ्या रंगाची , टफेटा कापडाच्या पोताची तरतरीत पाने . आणि पानांच्या दुहेरी कडांनी डोकावणारे तीक्ष्ण काटे आठवतात . शहरातून केवड्याच्या गच्च पाणकणसाची मजा क्वचितच अनुभवायला

मिळणार. चार आणे फेकून मिळणारे एखादे पान घ्यायचं नि नाकाला टेकून दीर्घ श्वासात साठवायचे ! बस्स. पण माळ्याच्या दुकानातून विकत घेतलेल्या सोनकणसापेक्षा केतकीवनाचे काटेरी रस्ते तुडवून, हातापायात गेलेल्या काट्यांची सल सोशीत, महत्प्रयासाने खुडून आणलेल्या कणसातले अगदी गाभ्यातले कोवळे पान वेणीवर माळण्यात केवढे सुख असते ! दर सोमवारी आम्ही तळ्यातल्या महादेवाकडे जायचोच. केवड्याच्या कणसांसाठी भाऊरायांना लोणी लावावं लागायचं. सगळ्या अटी मान्य कराव्या लागायच्या. भलामोठा टोकर घेऊन आमच्या स्वाऱ्या भर उन्हात ... अर्थात् श्रावणातलं ऊन ... तळ्याकडे जायच्या. कोणी येण्याच्या आत पाचदहा कणसांचा फडशा पाडून आम्ही धूम घराकडे यायचो. केवड्याच्या नादात नागाचे भयही विसरत असू आम्ही. मात्र ही मर्दुमकी घरी सांगण्याची हिंमत नसे. मग आईला कशा नि सारख्याच थापा मारायच्या यावर चर्चा होई. "आई ग, पक्षकार नाही का? मोराण्यांचा. त्याने दिलीन् बघ." अशी लोणकढी थाप. शिवाय, "ए तुला नव्या पद्धतीची वेणी देऊ करून?" अशी मखलाशी वर करायची !

पृथ्वीला गंधवती धरा म्हटले आहे. मातीच्या कणाकणांत साठलेल्या गंधाच्या अत्तरी कुप्या फुलाफुलांतून पानापानांतून मुक्तपणे उधळून देत असते ती. सुगंध तरी किती तऱ्हेचे. जुईकळ्यांचा हळवा आर्त गंध. तर दूरवरूनही भारून टाकणारा केवड्याचा मत्तगंध ! सारेच मधुर आणि हवेहवेसे वाटणारे.

केवड्याचे एखादेच पान घरात असले, तरी घरभर दरवळत रहाते. वरून हिरव्या काटेरी पानांनी झाकलेले कणीस उलगडण्याचा मोह तळव्यांत काटे रुतले तरी आवरत नाही. काटेरी पाने दूर केल्यावर, आतल्या गहूरंगी, तकतकीत, उभार पानांची एकमेकांत गच्च मिटलेली ओंजळ, गर्भवतीच्या तेजाने झळकणारी. एकटक न्याहाळली तरी नजर निवत नाही. फूल आणि गंध यांची सांगड चटकन जुळते. पण पानांना गंध असतो हे मानायला मन तयारच होत नाही.

स्वर्गीय गंधाचे लेणे ल्यालेला केवडा हा पानांचाच एक प्रकार आहे. खाली बुडाशी अरुंद, मध्यात रुंदावत, वर निमुळत्या होत गेलेल्या पन्हाळीसारखे दिसणारे केवड्याचे पान दिसते मोठे सुरेख ! गोऱ्यापान ओलेतीच्या रेखीव पाठीच्या पन्हाळीसारखे, जणू दोन पाने कलती करून मधोमध जोडली आहेत.

केतकी आणि नागांचे सख्य कथापुराणांतून सांगितलेले असते. केतकीच्या बनांत नागांची वेटोळी दिसतात. कोणी म्हणतात की या साऱ्या भाकडकथा. नागाला गंध येत नाही. घ्राणेंद्रिय त्याला नसतेच. पण एक मात्र खरे, केवड्याच्या पातीचा आतून वळलेला रुंद भाग, पिवळ्याजर्द नागाच्या उभारलेल्या फण्याची उन्मेकून आठवण करून देतो. पानांचे पिवळेपण नितळ नि तकतकीत. श्रावणातल्या तलम, फिक्या उन्हासारखा हळुवार पण तेजस्वी, केतकी रंग पाहिला की जडावल्या पावलांनी भारलेला, गोरापान गर्भालस तेजस्वी मुखडा समोर उभा रहातो.

केवड्यासारखे गोरेपण असणे भाग्याचे सौंदर्यलक्षण मानतात आपल्याकडे. 'केवड्याच्या पातीसारखी गोरीपान आहे हो सूनबाई!' असे सांगताना सासूबाईंचा आवाज कौतुकाने भरून येतो. शेवंतीचा रंग पिवळाच. पण नको तितका गडद असणारा. झेंडूचा जर्द पिवळा गोंडेदार. पण डोळ्यात खुपणारा, सोनचाफ्या पिवळा रंग मात्र मोहक असतो. पण केवड्याच्या पिवळेपणातले मार्दव त्यात नसते. पानाच्या कडेचे छोटेच पण तीक्ष्ण काटे. तर पात्याचे मधले अंग मऊसूत आणि नितळ असते. या उंची टफेटापोताला नखाएवढी जर चिरी पडली तरी सारी बादशाही शान ती बिघडवून टाकते. चिरेपाशी केवडा काळा पडतो. केवडा सुकला वा काळा पडला तरी त्याचा गंध मात्र रतिभरही कमी होत नाही. तो अक्षयच असतो. वही वा पुस्तकाच्या पानात खूण म्हणून केवड्याचे पाते ठेवले की पुस्तकालाही केवड्याचा गंध येई, पान उघडताच गंधाचे थवे अवतीभोवती उडत.

केवड्याच्या कणसाच्या मध्यात, पिवळसर मातकट रंगाचा तुरा असतो. त्यात केवड्याची पावडर गच्च भरलेली असते. या तुऱ्यातून पानांची मुळे फुटलेली असतात. पेंढीसारखे मातकट पिवळे तुरे नि बारीक पराग. हा तुरा आपटून खाली सांडणारी पावडर तोंडाला फासण्याचे उद्योग लहानपणी सगळीच करतात. या तुऱ्यांचे छोटेछोटे तुकडे कापड्यांत ठेवले तरी कपड्यांना सुरेख सुवास लागतो. शिवाय कसरही लागत नाही.

केवड्याच्या वेण्या खूप तऱ्हांनी गुंफतात. तिपेडी वेणी, दुपेडी नागमोडी वेणी, खण बांधून कार्डावर टाचून केलेली वेणी; सतरा प्रकार! वेटोळे करून वेणीत खोवले तरी छान दिसते. मला खूप आवडे. रंगापेक्षाही त्याच्या रेंगाळत्या मधुगंधाचे खरे कौतुक.

मंगळागौरीच्या वा हरितालिकेच्या पूजेची मांडणी करताना केवड्याचे पान फडा काढून डोलणाऱ्या नागासारखे डौलदार दिसते. महादेवाला बेल प्रिय, पण पिंडीवर ठेवलेले केवड्याचे पान पाहून मन प्रसन्न होते. गणपतीबाप्पांना तर केवडा हवाच. गणेशचतुर्थीला एरवी दोन आण्याला मिळणारे पान आठ आण्याला मिळे. पण घ्यावेच लागे. आजोबा होते तोवर दर श्रावण सोमवारी केवडा घरात येत असे. केवडा महागेल या हिशेबाने गौरीगणपतीच्या आधी चार दिवस भलेमोठे सोनकणीस घरात येई. ओल्या फडक्यात नीटपणी गुंडाळून ठेवण्याचे काम आई करी. वेणीत माळायला हवे म्हणून एखादेच पान गुपचूप पळवायचे तरी हिम्मत होत नसे.

श्रावणातल्या कलत्या दुपारी, उतरत्या उन्हात लकाकणारे सोनकणीस फार लोभस दिसते. मावळतीची मृदुल किरणे शेंड्यावरच्या कणसावर पसरतात नि केवड्याच्या पिवळेपणावर आगळीच लकाकी चढते. अशावेळी पावलं आपोआप तळ्याच्या वाटेने वळतात. हे सारे नजरेत साठवून घेताना मीच सोनकणीस होऊन दरवळत रहाते.

❖❖❖

# आकाशमोगरी

आकाशमोगरीचे फूल पाहिले आहे कुणी ? आ . .का . .श . .मो . .ग . .री ! काऽही आठवत नाही ना ? बटमोगरी . .दुधीमोगरा . .बत्तीसमोगरा . . हजारीमोगरा . .मदनबाण , सारे मोगऱ्यांचे बहर नजरेसमोरून तरळून जातात . पण आकाशमोगरी काही आठवत नाही .

मग अजरणीची किंवा बुचाची फुलं पाहिली आहेत ? सगळेजण अगदी मोठ्ठा होऽ लांबवाल .अर्थात मनातल्या मनात ! मग ऐका तर , याच फुलांना म्हणतात आकाशमोगरी . सांगलीमिरज भागात या फुलांना अजरणीची फुलं म्हणतात . तर खानदेशमराठवाड्यात बुचाची फुलं म्हणतात .

श्रावणझडी ओसरतात . भादव्यातली संतत धार थांबते . आकाश कसे निरभ्र होते ! कधीकधी नजर चुकवून एखादे ढगांचे पिल्लू भटकायला निघाले तरच दिसायचे . झाडांचे तरतरीत शेंडे न्हाऊनमाखून , ऊन खात , चकाट्या पिटीत बसतात . पूर ओसरतात . पाणथळी जिरतात . सारे कसे शांत शांत होते . एका अश्विनी पहाटेला उमलत्या थंडीची बोटे झाडापानांवर , कळीपाकळीवर गुदगुल्या करीत फिरू लागतात . या गारेगार स्पर्शाने पहिली जाग येते आकाशमोगरीला .

आकाशाचा ध्यास घेतलेल्या या उंचच उंच झाडांवर आषाढ कोसळून जातो . श्रावण झिमझिमून जातो . भादवा बरसून जातो . पण ही झाडे रिती ती रितीच ! आकाशाकडे एकटक नजर लावून बसण्याचं वेड काही कमी होत नाही यांचे . दिवाळीची जंतरमंतर हवा येते . रेंगाळत्या सरी आश्विनमाळांसोबत बरसून जातात . अन् याचे खोड जागून उठते . पान न् पान तरारून जाते . पहाटे धुकं दाटतं . बुचाच्या झाडात पसरतं . फांद्यांच्या टोकांशी , डहाळांच्या शेंड्यांशी देठदार कळ्यांचे झुबके धरतात . बाळाच्या नखुल्याएवढ्या असणाऱ्या या कळ्या थंडीच्या कुशीत सटासट वाढू लागतात . आठचार दिवसांत , लांबचलांब पुंगळीदार देठांच्या टोकाशी शुभ्रकळी टप्पोरते . अगदी मोगरीच्या कळीसारखी ! कळ्यांच्या अनिवार भाराने फांद्या जमिनीकडे झुकतात . आकाशाचा ध्यास घेणारी नजर मातीच्या सावळेपणालाही भुलते . एका आश्विनपहाटेला पायतळी सांडते पांढऱ्याशुभ्र फुलांची तरतरीत नक्षी .

आमच्या शाळेत ही बुचाची झाडं अगदी चिक्कार . पण एवढ्या पाचशे पोरींच्या केसांवर माळण्याइतकी फुलं कशी ढाळणार ती ? मग फुलांसाठी आमच्या माऱ्यामाऱ्या व्हायच्या . झिंज्यांची ओढतोड . या नादात परकराच्या नाहीतर झग्याच्या ओच्यात गोळा केलेली फुलं मातीत सांडायची . मातकटून जायची .

मी अगदी छोटी होते तेव्हापासून या फुलांचं मला वेड . मनात येई , इतक्या टवटवीत सुंदर फुलाला हे अडाणी नाव कसं ? बुचाची फुलं नाहीतर अजरणी ! मी मनातल्या मनात बहुधा सुरेखशा नावाचा शोधही घेत असेन . कविवर्य बा .भ .बोरकरांनी या फुलांना दिलेले आकाशमोगरी हे नाव वाचण्यात आले नि माझ्या मनाचा शोध थांबला . तेव्हापासून अगदी हौसेने हेच नाव वापरते मी !

आकाशमोगरी . मोगरीसारखे राजहंसी . फुलांचा बांधा उभार , पण टोक वरी घेरदार कळी , मोगरीच्या कळीसारखी कबुतरी ! घुमारलेली .रंगही शुभ्र , किंचित लालच झांक असलेला . पाकळ्या रेखीव , एकाला एक जोडलेल्या , दाटीवाटी नाही . जिथल्या तिथे फुललेल्या . पाकळी नितळ , तरीही काश्मिरी गालिच्यासारखी दडस . दोन बोटांत धरून चिरमळायची आणि फूऽफू करून फुगवायची . छान फुगा फुगतो . लगेच कुणाच्या तरी कपाळावर टचूकन फोडायचा . नुकत्या फुललेल्या चारपाच फुलांची देठं शाईच्या दौतीत खोचून द्यायची . झाली ऐटदार फुलदाणी तयार . किंवा कानाच्या भोकातून देठ अडकवून फुलांच्या कुड्या घालायच्या . शाळेतल्या बाकांवर अशा फुलदाण्या ऐटीत मिरवायच्या आणि पोरींच्या कानातल्या सुगंधी कुड्या खऱ्या मोत्यांपेक्षा झगमगत . बुचाच्या फुलांतला मध देठाच्या पुंगळीतून चोखताना मज्जा यायची . लांबच लांब देठातून सुक् सुक् असा आवाज करीत मध ओढायचा . जेमतेम जिभेवर उतरेल इतकाच थेंब . पण स्ट्रॉमधून कोकाकोला पिण्यापेक्षाही त्याची लज्जत न्यारीच !

बुचाच्या पुंगळीदार , रेशमी देठांना एकमेकांत गुंतवून केलेल्या वेण्या किती देखण्या दिसतात ! वरच्या बाजूला नेटकेपणानी जडलेली फुलांची रांग ,खालच्या बाजूला हारीने उभारलेली देठं आणि दोहोना सांधणारी तीनपदरी साखळी . एकेरी दुहेरी वेणी . पैंजणवेणी . एक ना दोन , नाना प्रकार या वेण्यांचे . आई वेण्या करायला शिकवायची . शिकण्यात निम्मीशिम्मी फुले देठापासून तुटून पडत . शिवाय देठांची मिठी सैल होऊन वेणी निखळायला वेळ नाही . मग घरभर फुलांचा पसारा .

बहरलेल्या आकाशमोगरी झाडांचा गंध शंभर हातांवरून श्वासांना जाणवतो . सोनचाफ्यासारखा गडद गंध नाही की जुईकळ्यासारखा हळवा गंध नाही . पण तरीही अतीव मधुर , थंडीचा शिडकावा असलेला , श्वासाश्वासांत रेंगाळणारा . मला या गंधात मातीच्या खमंग गंधाची एक मात्रा मिसळली आहे असे वाटते . बकुळीचा सडा पायतळी

सांडतो . पारिजाताचाही . बकुळीला एक उदास कोमजलेपण असते . पारिजातांची फुले पहाता पहाता कोमेजतात . पण बुचाच्या फुलांचा गालिचा पहाटेसारखा ताजातवाना ! जणू शुभ्र पहाट झाडाखाली विसावलीय . उन्हं चढत जातात तसतसा मातकट रंग पाकळ्यांवर चढत जातो .

बुचाचे झाड तसे विलायतीच . देव्हाऱ्यात समर्पण करण्याचे भाग्य या फुलांना लाभत नाही . दारात वा अंगणात हौशीने हे झाड क्वचितच लावले जाते . संस्कृत कवींनी रानीवनीच्या बहारांचे वर्णन मोठ्या रसिक नजरेने केले आहे . त्याकाळी हा वृक्ष नसावा . एरवी आकाशमोगरीचे मिनारी सौंदर्य त्यांच्या नजरेतून खासच निसटले नसते . आकाशाला नजरेत घेणारी आकाशमोगरी . आकाशमोगरीचे खोड , उंच बांध्याचे असते . निबोणी खोडाचा अडबूखडबूपणाही नाही किंवा चाफ्याच्या खोडाचा नितळ मऊपणाही नाही . पानेही सुरेख नसतात . मातकट हिरवी आणि डिक्षांची . लिंबाच्या पानांसारखी मोहरेदार . हे झाड कळ्याफुलांच्या झुबक्यांनी गच्च लखडते तेव्हा मोठे देखणे दिसते . रात्रीच्या अंधारात फुलांनी लखलखलेले हे झाड . जणू आकाशगंगाच झाडावर उतरलीय .

आश्विनातली पहाट असावी . आकाश नितळ निरभ्र असावे . आकाशमोगरीच्या पायतळी सांडलेले चांदणे ओंजळीत साठवावे . धुंद गंध श्वासाश्वासांत भरून घ्यावा आणि आपणही आकाशमोगरी व्हावे !

❖❖❖

Manavlok college of social Science
Library
Ambajogai- 431517, Dist. Beed

# अधुऱ्या स्वप्नांची अक्षय वेल

माझ्या मनातल्या आश्विनाला पांढऱ्या बूच फुलांचा घनदाट गंध आहे. पंचवीसतीस वर्षांपूर्वीचा तो उंचउंच बूचवृक्ष आज हयात असेल का? कदाचित नसेलही. आणि त्या वृक्षाशेजारीच असलेलं राजलक्ष्मी नायरचं ते छोटंसं घरही नसेल. त्यावेळीच ते घर मोडकळीला आलेलं होतं. राजूच्या अम्मीचा हात घरावर फिरल्यानं सुबक आणि नेटकं वाटत असे.

दर वर्षी आश्विन येतो. बूचफुलांचे गालिचे पायतळी पसरून, बुचाचे उंच झाड आभाळात डोके खुपसून विरक्तपणे उभे असते. त्या देठदार फुलांच्या वेण्या मुलीच्या लांड्या केसांत माळता माळता माझं मन मागे ... मागे जाते.

मला आठवते राजू. राजलक्ष्मी नय्यर. सावळ्या कृष्णतुळशीच्या रंगाची. न्हालेल्या केसांवर खोबरेल तेलाची तकाकी पसरलेली. बुचाच्या फुलांची दुपदरी वेणी केसात माळलेली. उंच कपाळावर चमकीची टिकली. भांगात हळदशेंदूराचा ठिपका. कपाळावर भस्माची आडवी चिरी. डोळ्यात काजळाची रेघ. काहीशी बाहेर डोकावणारी. पायांत मुके पैंजण.

राजूचं घर खिस्ती आणि मुसलमानांच्या वस्तीत होतं. घराशेजारीच ख्रिस्ती लोकांचं स्मशान होतं. मोकळ्या जागेत राजूचं दुमजली घर. खाली स्वैपाकघर आणि पडवी. वरती झोपायची खोली. पडवीची अर्धी भिंत बांधलेली. आणि त्यावर लाकडी पट्ट्यांची जाळी बसवलेली. त्या जाळीला लगटून गारवेल थेट वरपर्यंत चढलेला. समोर चिमणंसं अंगण. अंगणात एक नारळाचं झाड, बुचाचं झाड नि बाकी झिपरी शेवंती. त्या घरात राजू आणि राजूची आई रहात असे. त्या एकाकी घराभोवती गूढ वलय होते. राजू कधीच कुणाला घरी नेत नसे किंवा आमच्यातही मिसळत नसे.

आम्ही आठवीत होतो तेव्हाची गोष्ट. त्या वर्षी कसे कुणास ठाऊक, पण सारेच ऋतू आम्हांला खूप काही देऊन गेले. सातवीपर्यंन्त शाळेचे पटांगण दणाणून सोडणाऱ्या आम्ही काहीशा संथ झालो होतो. मधल्या सुटीत गरुडबागेतली बकुळीची फुलं वेचण्यासाठी भरारा धावणाऱ्या आम्ही किंवा सोनसाखळी नाहीतर शिवणापाणी खेळण्यासाठी भरारणाऱ्या आम्ही, चक्क कोंडाळं करून खुसूखुसू गप्पा मारू लागलो.

कशाच्या बरं असायच्या त्या गप्पा ?

... कोणीतरी कोणालातरी दगडाला बांधून पत्र पाठवलेले असायचे. किंवा कोणीतरी कुणाचातरी रोज येताना पाठलाग करीत असायचा. मग अय्या, इश्श, वगैरे, आम्ही वेगळ्या वळणाने वाढू लागलो. आणि राजूच्या घराभोवतीचे धुके अधिकच गूढ होऊ लागले.

मला राजूबद्दल एक विचित्र ओढ वाटे. तिला मुली दूर का ठेवतात ? तिच्याशी तुटक का वागतात, हे कळत नसे !

माझं घर काळाच्या वेगाने धावणारं होतं. घरात शेकडोंची ऊठबस असे. स्वैपाकघरात कोणीही जाऊन पाणी पिऊन येई. मला मुलगी म्हणून वेगळ्या रीतीभाती आवर्जून शिकवल्याच नाहीत. त्याचा परिणाम असेल. मी राजूला माझ्या शेजारी जागा देई. पण पट्टीनं घरी म्हणून कधी नेलं नाही.

एक दिवस दुपारी खेळताना राजूचा वेगळेपणा मला जाणवला. मी तिच्या कानांत कुजबुजले. ती दुसऱ्याच क्षणी कावरीबावरी झाली. अनुभवी आणि शहाण्या चिमणीसारखा मी तिला धीर दिला, आणि मधल्या सुटीत दप्तर घेऊन तिला तिच्या घरी नेऊन पोचवले. त्या दिवशी तिचं घर जवळून पाहिलं. तिच्या आईने माझ्या पाठीवरून हात फिरवला. खोबऱ्याचा लाडू खायला दिला, आणि सांगितले राजूशी खेळायला येत जा. मला राजूची आई खूप आवडली. राजलक्ष्मीसारखीच सावळी. पांढऱ्या खड्याची नाकातली चमकी तिला शोभून दिसे.

एकदा राजू खूप नटूनथटून आली होती. मला खुशीत येऊन तिने सांगितले की तिचे वडील आले आहेत. ही बातमी मी अख्ख्या वर्गात अक्षरशः सगळ्यांना सांगितली. राजूला वडील आहेत हा केवढा दिलासा वाटला होता मला ! आज इतक्या वर्षांनी मला स्वच्छ जाणवतेय ती भावना. जणू माझ्याच माथ्यावरचं मळभ दूर झालं होतं, अन् लख्ख ऊन पडलं होतं. कारण एकदा नव्हे तर चारचारदा पुष्पी, कमळीनं मला बाजूला नेऊन हलक्या आवाजात विचारलं होतं, राजूच्या घरीं एक भलामोठा सोनेरी पलंग आहे म्हणे ! तू पाहिलास का ग ? आणि राजूची आई कशी आहे ? खूप नटते म्हणे ! हे विचारताना खाजगी सल्ला दिला होताः तिच्याकडे जात जाऊ नकोस. आमच्या घरात मुळीच आवडत नाही.

राजूचे बाबाही सर्वांच्या बाबांसारखे नाहीत तर पपांसारखे प्रेमळ गृहस्थ होते. वयस्कर, टक्कल असलेले, मोठमोठ्या मिशा. मला राजूने खास जेवायला बोलावले होते. राजूची आई खूप हसरी आणि मनमोकळी बनली होती. राजूच्या बाबांची बदली मुंबई नागपूर लाईनवर झाल्याने ते अधून मधून घरी येत. आई नि बाबा असे दोघेही घरात असल्याने घरही जणू रुणझुणायला लागले होते.

दिवस जात होते. आम्ही अकरावीला गेलो. अभ्यासात आकंठ बुडालो राजू लागोपाठ चार दिवस आली नाही. म्हणून घरी गेले तर काय? घरावर अवकळा पसरलेली. अम्मी आणि राजूचे डोळे रडून सुकले होते. घरात राजूचे मामामामी आले होते. सामानाची बांधबांध सुरू होती.

राजूच्या वडिलांची वदली मिलॉन एक्सप्रेसवर झाली होती. अपघातात ते दगावले होते. तब्बल पंधरा दिवसांनी त्यांना ही बातमी मिळाली होती. ती तिच्या मामाने आणली होती.

राजूच्या आईचे घर केरळमध्ये आहे. त्रिवेंद्रमजवळच्या लहानशा खेड्यात. तिथल्या घरात तिच्या मावश्या, आज्या, मामा असे सगळे रहातात. खूप मोठा परिवार. घरातल्या मुली लग्नानंतर नवऱ्याकडे जात नाहीत. नवराच अधूनमधून पाहुण्यासारखा येतो. राजूची आई त्रिवेंद्रमच्या एका दवाखान्यात नर्स होती. तिथेच तिची आणि राजूच्या वडलांची ओळख झाली. अम्मीला तिच्या घरातले वातावरण आवडत नसे. ती हुशार होती. डॉक्टरही झाली असती. पण भावाने विरोध केला. शेवटी ती नर्स झाली. राजूचे बाबा केरळातलेच. पण जातीने वेगळे. अम्मीला स्वतःच स्वतंत्र घर हवं होतं. खेड्यातल्या घरात मुक्कामाला येणारे मेहुणे, मावसे यांची वर्दळ तिला आवडत नसे. आई वडील, मुले यांचे घर तिला हवं होतं. घरातल्या कुबट वातावरणाला कंटाळून तिने धारवाडच्या भिंती ओलांडल्या. ती राजूच्या बाबांबरोबर मुंबईत आली. पण तिथेही तिच्या स्वप्नांना तडा गेला. मुंबईत राजूच्या वडिलांची पहिली पत्नी व तीन मुले होती. त्यावेळी राजूचे वडील धुळे-चाळीसगाव लाईनीवर कामावर होते. त्यांनी अम्मीला धुळ्याला आणून ठेवले. तिथेच राजूचा जन्म झाला.

राजूच्या अम्मीला स्वतःचे घर हवे होते. फक्त आपलाच असणारा जोडीदार हवा होता. प्रतिष्ठा हवी होती. पण आयुष्यभर ती एकाकीच राहिली. अफवांना पचवीत राहिली. एकच आशा मनात होती. ती राजूला खूप शिकवणार होती. तिच्यासाठी तिचं हक्काचं घर आणि जोडीदार शोधणार होती. तिला न मिळालेली प्रतिष्ठा राजलक्ष्मीला मिळवून देणार होती. पण त्या आघाताने सारी स्वप्ने पुन्हा एकदा उखडली गेली.

राजूचे मॅट्रिकचे वर्ष पूर्ण होईपर्यंत तरी धुळ्यात रहावे अशी अम्मीची इच्छा होती. पण मामा कोणाचेच ऐकायला तयार नव्हता.

राजू वयाच्या पंधराव्या वर्षीच आपल्या आईचं मन कळण्याइतकी प्रौढ झाली. शेवटच्या आमच्या भेटीत राजूने माझे हात हातात घट्ट धरून आश्वासन दिले होते.

... मन्नू, त्या घराच्या भिंती मी नक्की फोडून बाहेर येईन आणि तुला पत्र पाठवीन. अगदी दहापंधरा वर्षांनीसुद्धा! तू उत्तर पाठवशील ना मला? विसरणार

नार्हीस ना?

आज मी मॅट्रिक पास होऊन बत्तीस वर्षे झाली आहेत. मी राजूच्या पत्राची वाट पाहिली. काही वर्षे उत्कंठतेने वाट पाहिली. पण ते आलेच नाही. या उलटणाऱ्या वर्षांचे भान मधूनच येते आणि राजूच्या न आलेल्या पत्राची आठवण येऊन मनाची उलघाल होते.

आश्विन येतो. पांढऱ्या संगमरवरी फुलांच्या झुबक्यांनी बहरलेली उंचउंच सावळी बुचाची झाडे पाहून मला राजलक्ष्मी नायरची याद येते.

कुठे असेल ती? तिला त्या भिंती ओलांडता आल्या असतील का? तिच्या अम्मीला हवं असलेलं घर राजूला मिळालं असेल का? की राजूही तिच्या लाडक्या चिमणीला मोकळ्या खिडक्या असणारं घर मिळवून देण्याचं स्वप्न पहात असेल? राजूचं स्वप्न तरी पूर्ण होईल का?

अधुऱ्या स्वप्नांची ही वेल! खुरटलेल्या कळ्यांना जोपाशीत किती दिवस जगणार आहोत आम्ही?

❖❖❖

COLLEGE OF SOCIAL SCIENCES
LIBRARY

# आजीच्या प्रेमाची गोडी

अत्यंत दिमाखदार इमारत. पाच मजली. इमारतीसमोर अष्टकोनी हौद आणि झुरमुरत्या कारंज्याची नक्षी. अवतीभवती ट्युलिप्सची रंगवावरी वेटे.

विद्या, एल्के आणि मी अशा तिघी त्या इमारतीच्या दरवाजाजवळ गेलो, तो दरवाजा आपोआप सरकला. हे आधुनिक तिळा उघड, तिळा वंद प्रकरण मला नवंच होतं. प्रवेशद्वारातून आत शिरताना मनात आलं... जर या क्षणी तिळा वंद झाला तर? पण अगदी सुरक्षितपणे आत पोचलो.

शेजारच्या काचबंद खोलीत दोन स्त्रिया काम करीत होत्या. त्यांनी आमची दखल घेतली नाही. मग पुढे चालत राहिलो. पुन्हा एका प्रशस्त पण बंदिस्त बागेत आलो होतो. मांजरीच्या चेहऱ्यासारख्या, आपल्याकडे नजर रोखून वघणारी तऱ्हेतऱ्हेच्या रंगातली फुलं जिकडेतिकडे फुलली होती. जांभळी, पिवळी, तपकिरी, गुलाबी, लाल, अशा फिकट गडद रंगातली ती फुलं पाहून मन अक्षरशः प्रसन्न झालं. या फुलांचे नाव आहे स्टेप मदर. सावत्र आई. या फुलांचे रोखलेले डोळे आणि सिंड्रेला किंवा हिमगौरीच्या सावत्र आयांचे डोळे यातलं साम्य मी शोधू लागले.

एवढ्यात माझी नजर गेली त्या तीन आजोबांकडे. वागेत तीन खुर्च्यात हे तिघे बसले होते. तिघेही किमान नव्वदीपलीकडे गेलेले असावेत. अगदी पिकल्या फळागत त्यांचे चेहरे .नजर शून्यात पोचलेली. भूत, भविष्य आणि वर्तमानाच्या पल्याड गेलेली.

असणे आणि नसणे या दोहोंच्या सीमेवरील ती भकास, निर्लेप, शून्य नजर पाहून माझ्या अंगावर सरसरून काटा आला. इतक्यात एक वयस्क गृहस्थ आमच्याजवळ आला. एल्के त्यांच्याशी जर्मन भाषेत बोलू लागली. आमच्याकडे पहात तो काहीतरी विशेष बोलत असावा असे वाटले. तो गेल्यावर एल्केने एक निःश्वास टाकला नि म्हटले, ते आजोबा म्हणत होते की गेल्या कित्येक वर्षात एकाच वेळी दोनतीन स्त्रियांचे इतके ताजे आणि तरुण आवाज ऐकले नव्हते. त्यांना आपली बडबड खूपच उत्तेजक वाटली. तुमच्या रेशमी साड्या खूप आवडल्या त्यांना, आपल्याला शुभेच्छा दिल्यात त्यांनी!

ऐकता ऐकता माझे डोळे भरून आले. विद्या मुकी झाली. पाश्चिमात्य देशांतील वृद्धांची समस्या मी ऐकून होते. पण त्याचे इतके आर्त आणि निरागस रूप मला प्रत्यक्षात छेदून जाईल असे वाटले नव्हते.

वृद्धांची समस्या आपल्याही देशात आहे .पण आपल्याकडे हरेक सामाजिक जखम झाकून टाकण्याची वृत्ती आहे आणि या सर्व सामाजिक जखमा , झाकल्या-पाकल्यामुळे आतल्या सात सडून चालल्या आहेत . तो वृद्धाश्रम पहाताना गेल्या वर्षी ऋषिकेशला भेटलेली आजीवाई आठवली . लक्ष्मण झुल्याच्या अलीकडे अचानक मराठी शब्द कानावर आले .' पांडुरंगा ,आमच्या देशाला वी पाऊस पानी हाय की न्हाई तूच जाने .' आणि आमची पावलं गचकन थांवली . मागे येऊन आम्ही आजीशेजारी बसकण घेतली .

आजी सोलापूर-उस्मानाबादच्या खेड्यातली . नवरा तरुणपणी मेला . लेकरूबाळ नाही . दहापाच वर्षे दिराच्या घरात कष्टात घालवली . एक दिवस दीर म्हणाला , वैनी गावातली माणसं देवाला जाताहेत . तुमीपण जा . मी पैसा देतो . यात्रा करताकरता सगळे हरिद्वारला आले . आम्ही केदारनाथ , वद्रीनाथ करून येतो . तवर तुम्ही इथेच थांबा . असे सांगून बरोबरीची मंडळी गेली . ती परत माघारी आलीच नाहीत .

इस्टेटीचा वाद सोडविण्याचा खास मार्ग दिरांनी शोधून काढला . ही आजी गेली पंचवीस वर्षे इथेच आहे . १० वर्षापूर्वी एक मराठी भिकारी इथे आला . दोघे धर्माचे बहीणभाऊ एकमेकांच्या आधाराने त्या परिसरात रहातात .

आमच्या घरात शहरातल्या आणि खेड्यातल्याही - वृद्धांना पूर्वी जी सुरक्षितता आणि पत होती . तो आज आहे का ? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर शोधून आपणही वृद्धांच्या प्रश्नांकडे नव्याने पहायला हवे .

जर्मनीतल्या या आश्रमातील वृद्धांशी प्रत्यक्ष बोलण्याची व त्यांची निवासस्थाने पहाण्याची संधी मिळाली नाही .

मग एल्केने आम्हाला दुसऱ्या वृद्धाश्रमात नेले . खरं तर माझ्या दृष्टीने खरा वृद्धाश्रम मी काही क्षणातच अनुभवला होता .

एल्केच्या गावचा वृद्धाश्रमही अत्याधुनिक होता . इथे खोली पहाण्याची आणि एका वृद्ध महिलेशी गप्पा मारण्याची संधी मिळाली .

आम्ही दारावरची वेल वाजवली तर आजी आमची वाटच पहात होत्या . आजीचे हे घर खूपच सुबक होते . दारातून आत शिरताच डाव्या हाताला सुसज्ज न्हाणीघर . उजव्या हाताला कपड्यांचे कपाट आणि त्यापलिकडे चिमुकले स्वैपाकघर . स्वैपाकघर म्हणणे अयोग्यच होईल . कुकिंग रेंज आणि त्याला लगटून एक विलक्षण गोंडस शेल्फ . त्यावर जाम , जेली , चहा , साखर यांच्या नखरेल बरण्या . शेल्फच्या खाली छोटासा फ्रीज . तळमजल्यावर जेवणाची सोय आहे . पण वेळ घालवायचा म्हणजे चहा , कॉफी वगैरे टाईमपास हवाच . एक सुबक खोली कम् दिवाणखाना कम् बेडरूम . या खोलीत आजीचे सारे कुटुंब भिंतीवर , कपाटावर विराजमान झालेले दिसले . आजींनी स्वतः खपून तयार केलेले आर्भ्रे ,पेंटिंग्ज इ .नेटकेपणाने मांडले होते . या आजी वृद्धाश्रमातील सर्वात तरुण . म्हणजे फक्त त्र्याहत्तर वर्षांच्या आहेत . या वृद्धाश्रमात एकूण तीनशे जणांची सोय आहे . पैकी फक्त चाळीस पुरुष आहेत . बाकी स्त्रियाच आहेत . काय

कारण असेल या विषम संख्येमागे? स्त्रियांच्यात जीवनशक्ती जास्त असते का? आमची परिषद ज्या समाजकेंद्रात झाली होती, त्या मौलाफगावच्या केंद्रातही खूप वृद्ध स्त्रिया वसंतऋतू घालवायला आलेल्या दिसल्या. त्या मानाने पुरुष कमीच दिसायचे. आजींनी दिलेले उत्तर असे. पुरुष शिल्लक होते कोठे?

आज सत्तरीपुढच्या लोकांना एकाकी जीवन सोयीस्कर वाटते. त्यांची मुलं, नातवंडे, सुना, लेकी अधूनमधून भेटून जातात. सारीच मंडळी नोकरी करणारी. त्यांच्या घरात आजींना करमत नाही. इथे अधिक मनासारखे जगता येते. आजींना मिळणारा वार्धक्य भत्ता या वृद्धाश्रमाचे भाडे देण्याइतका नाही. पण उरलेले पैसे मुलं भरतात. वेळेवर पैसे दिले नाहीत या सववीवर येथून घालवून दिले जात नाही.

पश्चिम जर्मनीत हिंडताना खूप वृद्ध भेटले. मोझल नदीच्या काठावरच्या एका किल्ल्याच्या परिसरात एक विलक्षण दृश्य दिसलं. एक अगदी जख्ख म्हातारी, पांगळी. आणि तिला धरून चालविण्याऱ्या दोन पंचाहत्तरीच्या वृद्धा. त्या तिला गोडीने चुचकारीत तर कधी बळजवरी करीत. बहुदा त्या तिला व्यायाम देत असाव्यात. वृद्ध वृद्धांना मदत करताना पाहिले, तरी मन कसनुसले.

आणि तो ब्रेमन स्टेशनच्या दारात भेटलेला म्हातारवावा, सुरेख व्हायोलिन वाजवून पैसे मिळवणारा! आमच्या घरी वर्षभर आमच्यातीलच होऊन राहिलेल्या स्कॉटलंडच्या ब्राईडी रसेलचे उद्गार मला नेहमी आठवायचे. ती म्हणायची, "शैला, तुमची कुटुंवसंस्था अजूनही खूप जिवंत आणि माणुसकीची आहे. ती अधिक सुदृढ व्हायला हवी. तुम्ही आमच्या पाश्चात्य देशातील स्त्रीमुक्ती चळवळीचा अभ्यास जरूर करा. पण तुमच्या मातीतच तुमच्या समस्यांची उत्तरं शोधा. स्त्रीचे स्थान कुटुंवात खऱ्या अर्थाने अधिकारी झाले, तर वृद्ध आणि लहान मुले यांच्या ज्या समस्या आमच्या देशात निर्माण होत आहेत, तेवढ्या त्या भयानक रूपात तुमच्या देशात निर्माण होणार नाहीत..

आमच्या या जर्मन आजी दिसायला देखण्या आणि चोखंदळ. त्यांचा निरोप घेताना विद्या म्हणाली," तुम्ही सांगता म्हणून तुमचे वय त्र्याहत्तर म्हणायचे एरवी पन्नाशीच्या दिसता तुम्ही." दुसऱ्याच क्षणी उत्तरल्या त्या," अग! चार दिवसांनी येतीस तर तुझ्यापरिस दोनचार वरिसांनी मोठी दिसले असते. महिन्याच्या वावीस तारखेला मी माझ्या व्यूटीपार्लरमध्ये जात असते. तेथे जाऊन आले की वीस वर्षांनी तरुण होते मी!" या उत्साही आणि तरुण आजीला मनात अगदी जपून ठेवलंय मी. आणखीन तीस बत्तीस वर्षानंतर अत्तरासारखी तेवढीच तरुण सोबत!

इलाना आणि उदो हे ग्रेव्हन ब्रॉईशजवळच्या कॅपलेन या चिमुकल्या खेड्यात राहतात. आणि दोघेही ड्झलडॉर्फला नोकरीसाठी येतात. उदो तिथल्या अग्निशामक दलात नोकरी करतो. तर इलोना एका कारखान्यात टायपिस्ट आहे. आमच्या वालसदनमधील चंदाचे हे काळजीवाहू पालक...फॉस्टर पेरेंटस्. मूलवाळ नाही. अवघं मन चंदात गुंतलंय. तिला भेटायला गेल्या चार वर्षात दोन वेळा भारतात येऊन

गेले . मी चार दिवस त्यांच्यावरोवर खूप मजेत घालवले .

गेले त्या दिवशीच उदोच्या आईचा वाढदिवस होता . ८५ वे वर्ष लागणार होतं . आई डुझलडॉर्फला एका फ्लॅटमध्ये एकटीच राहाते . संध्याकाळी उदो इलोना बरोवर मीही शुभेच्छा द्यायला गेले . पाचव्या मजल्यावरच्या सुरेख घरात आई एकटीच राहात असली तरी आज तिच्या घरातल्या टेवलावर तऱ्हेतऱ्हेचे केक्स दिसत होते . आईचा चेहेरा रेशमी सुरकुत्यांनी वहरलेला . डोळ्यातून घनदाट माया सतत झरतेय . आज तिने गुलावी रंगाच्या फुलांचा नवा फ्रॉक घातला होता . तिच्या शेजारपाजारच्या तरुण मैत्रिणींनी केक्स आणून दिले होते . आई या संपूर्ण इमारतीत भलतीच लोकप्रिय आहे . परदेशातले हे शेजारपणाचे प्रेम मला जरा थक्क करून गेले . आईला इंग्रजी ओ की टो येत नव्हतं . पण मी तिच्याशी भरपूर गप्पा मारल्या . आईने दोनही महायुद्धे खूप जवळून अनुभवली . त्यात मुलांचे वडील रशियाच्या कैदेत . आई माहेरी मुलांसह रहायची . रेशनवर एक पाव मिळायचा . आई , तिचे आईवावा दिवसभरात पाण्यावरोवर एक एक तुकडा खायचे . उरलेला पाव मुलांना द्यायचे . उदोला ते पाण्यावरोवर खाल्लेले पावाचे तुकडे , त्यांची चव अजून आठवते . युद्ध संपले . जर्मन स्त्रियांनी प्रचंड परिश्रम केले .

आई सांगत होतीः आपण वसलो आहोत हा भाग वॉम्वहल्ल्यांनी पूर्ण वेचिराख झाला होता . आम्ही हाताला फोड येईस्तोवर काम केले . इमारती वांधल्या . गाड्या चालवल्या . रस्ते वांधले . सगळा जर्मनी पुन्हा उभा केला . या भागाशी मी इतकी एकरूप झालेय की इथून कुठेच जायची इच्छा होत नाही . उदो , इलोना , मोठा मुलगा दर आठवड्यातून दोनदा तरी येऊन जातात . शिवाय माझ्या शेजारणी , त्यांची मुलं माझी काळजी घेतात . आईने तिच्या मैत्रिणींची सांगितलेली हकीगत तर काळीज कुरतडणारी . या मैत्रिणीचा नवरा रशियनांच्या कैदेत होता . तो १९५५ मध्ये ११ वर्षानंतर घरी परतला . तो येण्यापूर्वी सारे कुटुंव स्वागताची प्रचंड तयारी करीत होते . पण तो आला तो एक मानसिक रुग्ण वनून . स्वतःच्या कोवळ्या मुलाचं आयुष्य उद्ध्वस्त करण्यापर्यंत त्याची मजल गेली .

या आईच्या घरात चंदाचा उदोनी काढलेला एक हसरा फोटो नजरेत भरेल असा टेवलेला होता . मी परतताना आजीने माझे हात घट्ट धरून ठेवले नि सांगितले , " उदो , माझा धाकटा आणि म्हणून लाडका . त्याला मूल नाही . पूर्वी खूप खिन्न असायचा . पण चंदात तो आता गुंतलाय . इलोना फार गोड सून आहे . तीही चंदाला मनापासून चहाते . मी चंदाला नात मानते . आता माझे किती दिवस राहिलेत ? तू पुढच्या वर्षी एक महिन्यासाठी चंदाला सुट्टीत इथे पाठवू शकशील ? मी मग अगदी शांत मनाने मृत्यूची वाट पाहीन . . "

आजी वोलत होती . ते ऐकता माझ्या मनात येत होतं , भारतातल्या असो नाहीतर पश्चिम जर्मनीतल्या , सगळ्या आज्या सारख्याच !

❖❖❖

# हा बसंत रंग भरित ...

एक नुकतीच उमलू पहाणारी ताजीतवानी पहाट. अंधाराचे मावळते ठसे घरादारांच्या, कोवळ्या चैत्रपालवीच्या पापण्यांवर रेंगाळत आहेत. घरट्यांना अजून जाग यायची आहे. कळींचे सुगंधी टप्पोर अजून फुटायचेत. चार भिंतीच्या आड, पुस्तकांवरून निर्जीवपणे फिरणारी माझी नजर थकून, मरगळून गेलीय. जागल्याच्या घुंगुरकाठीचा लयदार ठेका जवळजवळ येत जातो. त्या ठेक्याच्या नादावर उमटलेली एक सहज सुरावट, मावळत्या अंधाराला कोरून जाते. अशा वेळी पुस्तकाचे जाड गठ्ठे आपोआप मिटले जातात. जाळीदार गवाक्षाबाहेर बहरणाऱ्या बसंती पहाटेच्या गुलबासी पाऊलखुणा निरखताना, डोळ्यापुढची ठोकळेबाज, डोकेउठाड लिपी दूरदूर विरघळून जाते.

घड्याळाचा काटा आत्ताशी चाराच्या पुढे रेंगाळतोय. पण रुख्याफिक्या कोनफळी रंगाची छटा चौफेर शिंपली आहे. नव्या दिवसाच्या उजेडाची हलकी चाहूल झाडांच्या, छपरांच्या पेंगुळल्या डोळ्यांना जाग आणते आहे. कालची सारी रात्र उकाड्याने घामेजून गेली होती. वडापिंपळाची वाभरी पानं सुद्धा रात्रभर चिडीचिप्प होती. पहाटेचं सोनेरी पाखरू शिरीषाच्या फांदीवर कधी येऊन बसलं ते रात्रीलाही उमगलं नाही. पण उकाड्यानं पेंगलेल्या देहावरून सुगंधी लहर भिरभिरून गेली नि त्या स्पर्शानं रात्रीचा अवघा देह मोहरुन झुलला. तिनं कौतुकानं शिरीषाकडे नजर टाकली. शिरीषाचा माथा सुगंधी रेशीमचौऱ्यांनी झिळमिळला होता.

यावर्षी पाऊस नको तितका रेंगाळला. थंडीनेही साईसुट्ट्यो उशिरानेच दिली. अगदी कालपरवापर्यंत थंडीचे कडक कडाके सारा आसमंत गोठवून टाकीत होते. झाडाझुडुपांवर वार्धक्याचे ठसे उमटवून शिशिर केव्हाच दूर गेला होता.

एरवी, या दिवसात, पिंपळ हिरव्यापोपटी लक्ष लक्ष मोरपिसांनी झुळझुळत असायचा. पण शिशिराचे थरथरते हात पिंपळाच्या फांद्याफांद्यातून फ़िरले नि सारा वृक्ष रिकामा झाला. वावटळी यायच्या, पिकल्या पानांची विमानं पळवत निघून जायच्या. विस्कटलेल्या वैभवाची विकल साक्ष देणारं ते प्रचंड रिकामं झाड! मनात रुतायचं. एक टवका खवळून दुखवायचं. सोनेरी सुगी संपलेली. खळीदळी झालेली.

नजर जावी तिथे सुनासुनाट. ओकीबोकी धरती. निवोर्णाच्या जाळीतून डोकावणारा चांदोवा, उजाड फांद्यांच्या आडून दीनवाणा वाटायचा.

माझ्या रोजच्या येण्याजाण्याच्या रस्त्यावर तीन चार शिरीष वृक्ष आहेत. विरळ पानांचे रेशमी जावळ आणि पिवळ्यधमक रंगाचे खुळखुळेच जणू, अशा रुंद फताड्या शेंगा वागवीत ही झाडं मुकाट उभी असतात. जातायेता माझी नजर या झाडांकडे आपोआप वळत असे. माझे श्वास अधीरतेने शोध घेत. निराश होऊन पाय रस्त्यावरून पुढे सरकत. होळी पुनव होऊन गेली होती. गच्चीवर बिछाने पडायला लागले होते. आणि उत्तररात्री अचानक जाग आली. एका विलक्षण गंधाची अत्तरी लाट, श्वासाश्वासातून अंगभर पसरत होती. दूरदूरवरून, वाऱ्याच्या पंखावरून येणारा विलक्षण मधुर गंध. समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर आदळत रहातात...थेंबाच्या कारंज्यात भिजवत रहातात तशाच या सुगंधी लाटा. तनामनाला गच्च वेढून टाकणाऱ्या.

आणि माझ्या शरीरातून वीज लकाकून गेली. गेले कित्येक दिवस ज्याची मनोमन, क्षणोक्षणी वाट पहात होते, तो वसंत आला होता.

या रंगराजाच्या आगमनाची पहिली चाहूल लागते ती शिरीषालाच! एरव्ही डोळ्यात भरायचा नाही हा वृक्ष. शेवटच्या बाकावर बसणाऱ्या अबोल पोराप्रमाणे हे झाड वर्षभर एकटेएकटे असते. वाऱ्याने गदगदा हिंदकळले तरी चारदोन पाने झडायची. लांबरुंद शेंगाचे खुळखुळे तेवढे वाजायचे. दुपारच्या चढत्या उन्हात या खुळखुळ्यांचा आवाज उरात उदासी निर्माण करतो. इतकीच काय ती याची चाहूल. आता मात्र ही झाडं फिक्कट हिरव्यापोपटी लाड्यागोंड्यांनी रसरसली आहेत. शिरीषाचं फूल तर अतीव कोमल. फुंकरीनेही मलूल होईल असं. लांबलांब चवरपाकळ्यांचे किंवा केसरांचे झुबके डोळ्यावरून अलगद फिरवावेत अन् स्वप्नांच्या महालाचे चंदेरी मिनार नजरेत रेखावेत. फांद्याफांद्यावर जणू सुगंधी स्वप्नांचे बहार, ऋतुराज वसंताच्या स्वागतासाठी आले आहेत.

शिरीषाचे रंग दोन. अगदी फिक्कट हिरव्या रंगाचे शिरीषफूल उमलत्या पहाटेसारखे सौम्य आणि मुग्ध. तर हलक्या बसंती रंगाचे फूल क्षितिजावर रेंगाळणाऱ्या संध्येसारखे मोहक आणि रंगकिमयेने नजर मोहवणारे. मात्र या बसंती...शरावी रंगाच्या फुलात सुगंधाची कुपी ठेवायला विधाता विसरला असावा. शिरीषाच्या रंगरूपापेक्षाही त्याच्या गंधाची उधळण अधिक प्यारी, श्वासांना भुलवणारी. या फुलांना स्वप्नांचा गंध आहे. श्वासांतून तरळत रहाणारा गंध. पापणीचे तीर भारावून टाकणारा. शिरीषाचे कौतुक करावं तर लगेच गुलमोहर पलीकडून खुणावू लागतो.

थंडीने नाकाचा शेंडा लाल व्हावा तशी एखादी लालम परी हिरव्या पानपंख्यातून डोकावते तेव्हा मार्चची चाहूल येत असते. पहाता पहाता लालमपऱ्यांची जर्द विमाने हिरव्या पानांवर दाटीवाटीने उतरू लागतात. पहात पहाता सारा वृक्ष लालपिवळ्या

फुलांनी भरभरून जातो. एरवी सतत सळसळणाऱ्या हिरव्या पानांचे तुरे पार नाहीसे हातात. इथून तिथून हळदकुंकवाचा गच्च सडा. पायतळी आणि फांद्यावरही. ऋतुराज वसंताच्या चाहुलीने गुलमोहर वहरतो तो थेट आषाढमेघांचे पहिले थेंब अंगावर उडेपर्यंत! मदनमंजिरींच्या लत्ताप्रहाराने आणि त्यांच्या मुखांतून उधळलेल्या मद्याच्या स्पर्शाने अशोकवृक्ष मोहरतो असे कालिदासादी संस्कृत कवींनी वर्णिले आहे. पण फुलांनी डवरलेला अशोक मी तरी अजून पाहिलेला नाही.

मात्र ऐन वसंत आणि ग्रीष्मात गुलमोहर वृक्षांवर उधाणलेली लाल नवती वघितली की वाटतं, वसन्तोत्सव साजरा करीत हिंडणाऱ्या अप्सरांच्या ओठांतून उधळणाऱ्या लालवसंती मद्याच्या चुळा या झाडांनी वरच्या वर तर झेलल्या नाहीत ना? नाहीनर असेही असेल. रंगोत्सवातील रंगभऱ्या पिचकाऱ्या चुकवीत धावणाऱ्या परीकन्या फांद्याफांद्यातून लपून तर वसल्या नसतील? फांद्याची ओंजळ रंगानं काठोकाट भरून घेताना गंधाचं भान मात्र गुलमोहराला राहिलंच नाही. सपोत निळ्या निळाईवर उठून दिसणारे लालशेंदरी भरगच्च तुरे, डोळाभर पहाताना गंधाची सय येतच नाही. नकळत, सहजपणे फूल नाकाशी नेले तर काहीसा उग्रट दर्प जाणवतो.

चैत्रगौरींची आरास मांडताना गुलमोहरच्या डहाळ्या का मांडत नाही कुणी? असा प्रश्न मला नेहमीच पडत असे. त्या फुलांचा चटपटीत रंग मला एवढा आवडे की छोटेपणी मी हट्ट धरून वसायची की याच फुलांचा गजरा करून दे म्हणून! आईचा डोळा चुकवून गुलमोहराच्या डिक्षा अपऱ्या केसांत खोवून आरशासमोर उभे रहाण्यात मस्त वेळ जाई. शिवाय गुलमोहराच्या फुलांतली पाचवी फिक्कट पाकळी चवीला छान लागायची. किंचित तुरट...आंवट.

माझी ही गुलमोहरी हौस अचानकपणे तृप्त झाली. उन्हाळ्याचे दिवस. आमची वस पुसदच्या रस्त्याने चाललेली. कलत्या संध्याकाळी कुठल्याशा तांड्यावरच्या वंजारा तरुणींचा घोळका गुलमोहराच्या रंगीत फांद्या नाचवीत, गाणी म्हणत, फेर धरून झुलत होता. होळीचे दिवस होते ते. भवताली लालभडक दिवल्यांचे पेटते झाड असावे तसा गुलमोहर. दरवर्षी वसन्त येतो, आणि मनात वहारून येते ते दीपकळ्यांचे केशरी झाड आणि रंगवाँवरा झुलता थवा. वंजारा तरुणींचा.

कॉलेजच्या रस्त्याच्या दोनही कडांनी निंवोणीची डेरेदार झाडं आहेत. पाडव्याच्या आधीच ही झाडं जोंधळी तंवराच्या नाजूक मंजिऱ्यांनी लखडून जातात. रस्ताभर त्या फुलांचा किंचित कडवट तरीही मधुर गंध सतावीत रहातो. निंवोणीची सावली थंड गारवा देणारी. कोवळ्या अंजिरी पानांच्या कडवट चवीतही आरोग्याचे अमृतघट भरलेले! निंवोणीची कोवळी पानं खाल्ल्याशिवाय पाडवा साजराच होत नाही आपल्याकडे. राजस्थानात या लिमडीमाचे महत्त्व फार. राजस्थानी रमणींचा लाडका सण वडी तीज. तोही साजरा केला जातो लिमडीच्या पूजेने. घरात पाडव्याचा कितीही

पसारा असो , त्यातल्या त्यात वळ काढून लिंबाच्या कात्रेदार पानांच्या आणि इवल्याशा फुलांच्या डिक्षांच्या माळांची झिळमिळती तोरणं दारादारांवर माळली जातातच. निंबोणीची कवळी पानं, गूळ घालून तयार केलेला घोळाणा घरातल्या दादाजींनी हातावर ठेवल्यावर , तोंड वाकडं न करता खायचा . हो , कारण त्याशिवाय पुरणपोळी ताटात नाही पडायची !

कॉलेजमागच्या तळ्याच्या काठचं ते एकाकी झाड नेहमीच उदास वाटायचं . उंच बांधा . मातकट हिरवी पानं . डोळ्यात भरण्यासारखे काही नाही . परवा सहज नजर वळली . त्या झाडावर जर्दकेशरी रंगाचे पोपट जणू दार्टीवार्टीने बसले होते . नकळत पावलं तिकडे वळली . त्या केशरियाला अगदी जवळून निरखण्याचा मोह आवरला नाही . फांद्याफांद्यांवर वाकदार केशरीफुलांचे नखरेल झुवके पसरलेले . त्या झाडाजवळ जाऊन पाय उंचावून . . .उड्या मारून एक झुवका घरी आणला . त्या झाडाचं नाव मनोमनी केशरिया ठेवलं . घरी हा येताच माझा नवा शोध दाखवला . तो खो खो खिजवीत म्हणाला , अगं हा पळस . डोंगरात , जाशील तिथे ही झाडं आहेत . या फुलांच्या रंगानं होळी खेळतात . संस्कृत साहित्यातला पलाश होता तर तो ! एकच एक दुपदरी वाकदार कळी . त्यातून झिळमिळणाऱ्या रेशमी पाकळ्या . दरवर्षी वसंत येतो . डोंगरातली झाडं केशरिया बनून भरदिवसा झगमगायला लागतात . वाटतं , सूर्याचा ताप सहन न झाल्याने सावलीसाठी वणवण फिरणाऱ्या सूर्यकन्या धरतीवर तर आल्या नाहीत ना !

ऐन फेब्रुवारीत वसंत पंचमीच्या आधीच आंब्याचे डेरेदार वृक्ष मधुमंजिऱ्यांचे गजरे माळून नटले . रेखीव नाकाच्या आणि पाणीदार डोळ्यांच्या सावळ्या कोळिणीच्या भरदार अंबाड्यावर सुरंगीचा भरगच्च गजरा माळावा तशी ही सावळी घेरदार झाडं . मोहरल्यावर देखणी दिसणार . हे देखणं रूप नजरेत ठरेस्तोवर बालकैऱ्यांचे झुमके पानांच्या आडून डुलायला लागतात . जशी जशी कैरी टपोरायला लागते तशी तकतकीत होते नि जिभेला सुटतं पाणी . त्यातून ते झाड असतं शेजीबाईच्या अंगणात . दुपारी आई लवंडली की अंगणात जमायचं नि कैऱ्यांवर नेम धरायचे . एखादी टपकन पडली की काळजात धस्स् ! त्या कैऱ्या दगडाने फोडायच्या . हलक्या पावलांनी आणलेले तिखटमीठाचे पुडे . आणि पाठच्या दारी वळचणीला बसून ओरपलेली ही आंबट मिठाई ! आज ते दिवस आठवले तरी तोंडाला पाणी येतं .

उन्हाळ्यात आंब्याची सायसावली किती शीतल असते . महाबळेश्वरचा थंडाई तुकडा जणू काढून इथे आणलाय ! कैऱ्या , चैत्रगौर , कैरीचं पन्हं , कैरीची डाळ , कैरीची मसाला फोड . . . या नुसत्या आठवणींनीही कलिजा खल्लास !

वसन्ताची चाहूल रानातल्या झाडाझुडपांना लागते आणि शिशिरस्पर्शाने गारठलेल्या काटक्यांमधून अमृताचे जीवट रस सळसळायला लागतात . हिरव्या पानड्यांचे कोवळे

हात जोडून , नवी नवलाई फांद्याफांद्यातून फुटायला लागते . जणू त्यांना या इवल्याशा जीवनातील अपूर्व आनंदोल्हासाचा सत्कार करायचा असतो , मृत्यूतून फुलणाऱ्या वसंताची साक्ष द्यायची असते .

बसंताच्या जादुई स्पर्शाने अंगणातल्या जुईमोगरीही लाजून चूर होतात . मोगरीचे किती म्हणून प्रकार . वेली-मोगरीवरचे लांबट टपोरे मदन बाणकळे रात्रीच्या वेळी निरखावेत . जणू सुगंधी आकाशगंगेचा प्रवाह भूमीवर उतरून आला आहे ! मोगरीच्या झुडुपांवर कबुतरी कळ्यांचे टप्पोर पानापनांतून डोकावतात . राजहंसी रंगाच्या या फुलांचे प्राण त्यांच्या मधुर गंधात साठलेले आहेत . एखादीच कळी केसात अडकवा किंवा पाण्याच्या माठात टाका . अवघा आसमंत गंधाने झुलू लागतो .

तर , असा हा वसंत ! कोकिळेच्या स्वरांतून झेपावणारा , गुलाबी वाऱ्यातून अंगांगाला सुखावणारा , फुलपानांच्या रंगगंधातून मातीला खुणावणारा , तरुणाईच्या हृदयातील स्पंदनाना चैतन्य देणारा . घरदार . . .स्थळकाळ . . .नातीगोती यांच्या पल्याड जाऊन आयुष्यात एकदातरी याचं स्वागत गच्च मिठी मारून करावं . मग येत्याजात्या वाऱ्यासोबत वयाचे हिशेब वाढत गेले , डोक्यावर सोनेरी कृतान्तकटकामलध्वजा फडकू लागल्या तरी , नजरेत , हृदयात साठवलेले बसंतीगाणे उतत नाही की मातत नाही , भेटला बसन्त टाकत नाही !

❖❖❖

# मी युग विरहिणी

मी आदि, मी अनादि, मी अनंत, मी युगविरहिणी.

प्रत्येक श्रावणात पाऊसधारात सचैल ... चिंब भिजणारी, आणि आकंठ निथळताना प्राणातून जळणारी. आजही श्रावणगंध दहा दिशांतून घमघमतो आहे. आषाढ पर्जन्याचा असोशी धसमुसळेपणा मातीच्या अंगांगांतून रुजलाय.

नको नको म्हणत सोसलेल्या त्या कळा आज, लेणं बनून अंगांगावर झिळमिळताहेत. गोरंगोमटं तान्हुलं कुशीत असावं. बाळाच्या रूपाकडे पहात सुखावताना, त्याच्या दुराव्याची नाजूक कळ सरसरून जावी, सुखाचेही शहारे उमटून जावेत, तशी धरणी.

धरणी, ऐन श्रावणात ग्रीष्माच्या अंगारकी आठवणीत हरवून जाणारी... निष्पर्ण एकाकी रात्रींना, श्रावणस्वप्नांचा मिणमिणता दिवा पदराआड झाकून निरोप देणारी.

धरणी, युगविरहिणी.

शेकडो वादळं वाहून गेली. लाखो श्रावण बरसून गेले. पण माझ्या मोकळ्या केसांच्या बटा अजूनही सैरभैर उडताहेत. आशांचे दिवे होऊन तेवणाऱ्या डोळ्यातले काजळ गालांवर ओघळून सुकले आहे. हातापायांच्या फुलवातीतून गळून पडलेली काकणं चूर झाली आहेत. पैजणांचे घुंगरू मुके झाले आहेत. माझ्या हातातली ही वीणा, कधी या यक्षपत्नीच्या कृश बोटांनी तर कधी वासवदत्तेच्या स्पर्शांनी विरहाचे गर्भरेशमी गीत गुणगुणणारी, आजही तेच, अगदी तेच, आर्त तरीही उत्सुक सूर छेडतेय.

आकुळ व्यागुळ रैण विहावा, विरह कलेजो खाय  
दिवस ना भूख न निदरा रैणा, मुख सूँ कह्या न जाय  
कोण सुणे ? कासुँ कहियारी, मिल पिव तपन बुझाय  
प्यारे दरसण दीजो आज, थे बिण रह्या ण जाय.

तुझ्या मीलनासाठी माझ्या प्राणांनी मांडलेला आकान्त, तुझ्या घनगर्द मिठीत मिटून शून्य होण्यासाठी माझ्या रक्ताने घेतलेला ध्यास, त्या सोळा वर्षांच्या ब्रह्मचाऱ्याला कळला. माझ्या डोळ्यातले पूर, त्याचे अंगण भिजवून गेले. माझ्या सनातन वेदनांचे

वळ कुरवाळीत उन्मनी होऊन तो बडबडला,

घनु वाजे घुणघणा वारा वाहे रुणझुणा
भवतारकुहा कान्हा वेगी भेटवा का...

चांदण्याच्या शीतल चंदनरसात नहाताना उरातून जळणारी, जुईफुलांच्या कोमल शेजेवर तळमळणारी ती, मीच होते ना ?

तुझ्या श्वासांची, पावलांची चाहूल लागताच कशीबशी उठून, केस सारखे करण्यासाठी दर्पणासमोर उभी राहिले मी .. तर काय? मी होते कुठे?

दर्पणभर पसरला होतास तू. तू आणि तू...

आणि तुझ्यात विरून जाण्यातली तृप्ती निहारताना, अनुभवताना, माझ्यातली मी केव्हाच मुक्त झाले होते. सुसाट धावत सुटले होते, विरहाच्या कोवळ्या कळा कवटाळण्यासाठी!

विरहवेदनेचे विखारी अमृत मी प्याले उर्मिलेच्या थरथरत्या हातांनी. ते पिताना ठसका लागला तेव्हा पाठीवरून हात फिरले वनवासी सीतामाईचे. सुरकतलेले शुष्क हात. भोवंडून उडू पहाणाऱ्या जीवाला घट्ट सावरून धरले मीरेच्या एकतारीने. पुराचे पाणी वाहून जावे तशी वाहून जाणारी वर्षे. पण मी मात्र तशीच. एकाकी. नुस्ती वाट पहाणारी.

प्रत्येक श्रावणझडींना आठवत असेल एखादी उंच गढी. त्या गढीच्या टोकावरचा ऐन महाल .आणि त्यातली मीलनोत्सुका मी. महालातले खसाचे पडदे उतरून ठेवणाऱ्या सखीला मीच तर म्हणाले होते,

"बाई गं, या तलखीनं जीव उडून चाललाय माझा. खसाच्या पडद्यावर चिंब पाणी शिंपडायचे सोडून हा उलटा उद्योग कुणी सांगितला तुला?"

सखीने हातांचा आधार देऊन सौधावर आणलेन मला. आणि दाखवले दूरदूरवरचे फडकते निशाण. तिथल्या कनातीत मुहूर्ताची वाट पहाणारा तू नि तुझे शिलेदार. अजून आठवतेय ती सावनी सांज.

कलत्या उन्हाच्या रेशमी बटा हिरव्या झाडापानांवर झुळझुळताहेत. तृप्त मातीच्या कुशीत पहुडलेली हिरवी बाळं टुळूटूळू नजरेनं आभाळ न्याहाळताहेत. पहाता पहाता आभाळाचं गर्द निळं भिंग बनून गेलय. त्या आरस्पानी भिंगातून निळयाजांभळ्या केशरी लाटा कल्लोळत पुढे पुढे धावताहेत. त्या लाटांत बुडून जात आहेत झाडं, पानं, डोंगर आणि मीही.

तिन्हीसांजेच्या अर्धुक्या उजेडात सखी माझ्या हातापायांवर मेंदीची नक्षी रेखतेय. उरातली वाढती तलखी... आणि चढत जाणारी रात्र, चढत जाणारी मेंदी! पहाटे पहाटे तुझा पंचकल्याणी घोडा विजयाचे तोरण माथ्यावर बांधून अंगणात येतो. समईतल्या वाती विसावून शान्तावतात. तुझ्या असोशी घनगर्द मिठीत विरघळून

जाताना मला मात्र आठवत राहतात विरहाच्या न कटणाऱ्या रात्री.

प्रीतम विनि तिम जाइन सजनी, दीपक भवन न भावै हो
फूलन सेज सूल होई लागी, जागत रैणी विहावै हो
सइयाँ तुम बिनी नींद न आवै हो ...

त्या चिरेबंदी दगडी वाड्यात रुंद भिंतीत अडकेलेले ओले निःश्वासही माझेच होते की! सत्तावीस मोत्यांची पंजेदार नथ नाकात घालताना डोळ्यात आलेले पाणी, उजाड श्रावणासाठी माझ्याच डोळ्यातून वाहून गेले होते. पहाटेच्या मिणमिण उजेडात, माळवदातून टपटपणाऱ्या थेंबाच्या धीम्या लयीत, मनीची व्यथा दगडी जात्याला सांगणारी ती मीच होते.

सरावन राजा
मुकामो आला.
धरित्रीचा शेला
कोन रंगवून गेला ?
कोन भिजवून गेला ?

आणि अगदी कालपरवाची गोष्ट. तू गजाआड. माझ्यापासून शेकडो मैल दूर. बारा वर्षांनंतर माझ्या शब्दांना पुन्हा एकदा कोवळे पंख फुटले. कोसळणाऱ्या पावसातून, नदीनाले पार करीत, तुझी डोळाभेट घेण्यासाठी मी येत असे. दहा तासांच्या प्रवासात, तुझ्याशी काय काय बोलायचे त्याची रंगीत तालीम मनातल्या मनात चाललेली असे. पण मला माहीत होते कीं तुला पहाताच ऐन वेळी शब्द आटून जाणार! परत निघताना तुझ्या बेटीला जवळ ओढून घेत असे. तू खूप जवळ.

... स्पर्शाचे सामर्थ्य बारा वर्षांनी जाणवलेय मला. पुराच्या पाण्यात स्वतःच्या रक्तामासाचे बाळ सोडून देताना, कुंतीच्या प्राणांना आलेल्या झिणझिण्या माझ्याही प्राणांना आल्या. तुझ्याकडे पाठ फिरवून येताना.

आज ते दिवसही उडून दूर देशान्तराला गेले आहेत. भरल्या गाडग्या - मडक्यातून, जिवन्त विहीररहाटातून न रमलेली माझ्यातली युगविरहिणी. मी पुन्हा एकदा देशान्तराला निघाली आहे. तिचा कधीही न भेटणारा प्रिया शोधण्यासाठी.

तिच्या ओठांतून ते स्वर उन्मुक्तपणे स्त्रवताहेत.
कहो तो कसूमल साडी रँगवॉ, कहो तो भगवा भेस
कहो तो मोतियन माँग भरावाँ, करो छिटकावाँ केस
चाला वाही देस प्रीतम, चालाँ वाही देस...

❖❖❖

# आई : साधीसुधी तरीही असामान्य

आज ती या जगात नाही. पण तरीही ती मनभरून, घरभरून उरली आहे. परवा पपांना धुळ्याला नेऊन पोचवले तेव्हा पायरीवर अडखळले. मनात आले, आई नसलेल्या घरात जाण्याची ही पहिलीच वेळ. ती नसलेल्या घरात वावरण्याची सवय करायला हवी. हे मनात येईस्तो मी घरात प्रवेश केला होता नि लक्षात आले, घर आजही प्रसन्न आहे. सुस्नात आहे. तिच्या असंख्य आठवणी भोवताली भिरभिरताहेत. पूर्वी बांगडी फुटली असे म्हणत नसत किंवा दिवा विझला म्हणत नसत. तर बांगडी वाढवली, दिवा वाढवला असेच म्हणत. तशीच आई वाढवली आहे.

गरुडबागेतले ते घमघमते बकुळीचे झाड चक्क वठले आहे. परवा गरुड बागेत जायचे झाले आणि पहाते तर काय .आतून खंक वाळलेले, खंडलेले खोड उभे. फांद्याचा भार एवढा जड झाला की तो उतरावा लागला. पण माझ्या मनातले फुलांनी रिमझिमणारे बकुळीचे झाड मात्र ताजेपणाने उभे आहे. पायतळी किनारदार फुलांचा सडा गच्च सांडला आहे. झग्यांचे ...पदरांचे ओटे भरभरून गेले तरी ती फुले संपणार नाहीत नि झाडही अक्षयपणे घमघमत राहणार आहे. आमच्या घरातले ते बकुळीचे झाड नजरेआड गेले तरी अनेकांच्या मनात गंध पेरीत रहाणारच आहे.

शब्द वापरीत रहाणे ही आपली अंगभूत सवयच. आई आणि तिचे मूल यांचे जोडलेपण किती तऱ्हांनी व्यक्त करतो आपण ! पण या शब्दांच्या अंतरातले गाभे लक्षात यायला, स्वतःला खर्ची घालावे लागते. आईच्या शेवटच्या आजारपणाचे निदान कळल्यानंतरची गोष्ट.

"तू गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता" ग्रेसच्या कवितेतील या ओळींनी काळीज अक्षरशः तळमळून गेले.

आज तिच्या आठवणी आठवायला निघाले तर एकही आठवण सलगपणे येत नाही. पण एकात एक मिसळलेल्या लक्षावधी क्षणांची-स्मृतींची गर्दी होते. किती रंग...किती रूपे! खसाखसा केस चोळून मला न्हाऊ घालणारी आई. डोळ्यात जाणारे शिकेकाईचे पाणी. डोळे चुरचुरल्यामुळे मिटलेले. नागरमोथ्याचा उष्ण गंध. मी डोळे किलकिले करून पाहिले तर आई तिच्या टप्पोऱ्या डोळ्यांनी मला अंगभर

न्याहळत होती. मग खूप विचित्र दुरावा तिच्या नि माझ्यात आला. तो दुरावा माझी जुवा मोठी झाली तेव्हा अचानक संपला नि मनाला खंत लागून राहिली की मी अगदी आतून, किंचितशी का होईना आईपासून दुरावले होते. पण तेव्हा पासून मात्र मागचे अंतर जोडून घेण्यासाठी मनोमन धडपडत, तडफडत राहिले.

आमच्या पपांनी व्यवसाय म्हणून वकिली केलीच नाही. जणू तो फावल्या वेळातला उद्योग. समाजवादी पक्ष, विविध चळवळी, स्थानिक प्रश्न, राष्ट्र सेवा दल, महिला सदन इत्यादी अनेक व्यापांनी त्या दोघांचे कुटुंबजीवन रसरसलेले होते. मला आठवते तेव्हापासून ती राष्ट्र सेवा दल परिवाराशी पूर्णपणे जोडलेली होती. आमचे घर या सामाजिक पाहुण्यांनी नेहमीच बहरलेले असे आणि आई या सर्वांचे स्वागत उत्साहाने करी. कुणाला काय आवडते हे तिला नेमके माहीत असे. एक निर्लेप साधेपणा आमच्या घराला होता. फणीकरंड्याच्या आरशापुढे ऐसपैस बसून दाढी करणारे मधु दंडवते, नाना. मस्तपैकी खुर्चीवर बसलेले नि चाकवताची ताक घालून केलेली पातळ भाजी नि भात चवीने खाणारे नाथ पै. पत्ते खेळताना, पान लक्षात न ठेवता टाकले म्हणून आईलाही धपाटा घालणारे भाऊ रानडे. संजूच्या लग्नात सेवा दल बहिणींना खादीची साडी आहेरात देण्याचे स्वप्न रंगवणारे डॉ. अंबिके. शकुंतलाबाई तुम्ही स्वयंपाकघरातून थोड्या जास्त बाहेर या असे रोखठोक सांगणाऱ्या नि डॉ. राम मनोहर लोहियांवर अपार प्रेम करणाऱ्या, सातपुड्यात हिंडता हिंडता अचानक धुळ्याला येऊन डॉ. अष्टपुत्रेबाईंना कडकडून भेटणाऱ्या इंदूताई केळकर. अनुताई लिमये तर आमच्या मावशीच वाटत, आईसारख्याच निग्रही पण अतीव कोमल हृदयाच्या. त्याही अधूनमधून येत. सिंधूताई मसूरकर, आताची डॉ. सिंधू पार्थ चौधरी. तिच्या लग्नाचा काळ मला स्पष्ट आठवतो. कुसुमताई लेले, सिंधुताई, रेशमाताई, या सगळ्या जणींना आई जणू मैत्रीण वाटे. आंतरजातीय वा प्रेमविवाह करणाऱ्यांना आईने नेहमीच दिलासा दिला. सुमनताई भालडे, कमलताई दलाल, श्यामलताई पाटील या माझ्या आईच्या माहेरवाशिणीच. आणि हा स्रोत कालपरवापर्यंत अव्याहत सुरू होता. आपल्या या लेकींचे कौतुक ती मनापासून करी. दशरथतात्या पाटील नि कमलताई जणू आमच्या घरातच उगवलेले. तात्या वा कमलताई आठ दिवस आले नाहीत तर तिला करमत नसे.

शिवदासभाऊ चौधरी माझी पहिली पाठवणी करायला अंबाजोगाईला आला होता. फुले आणताना आईचे पाय फक्त तापीराम माळीच्या दुकानाकडे वळत, तर जगूभाऊ आजळकर, शिवराम बगदे, रामभाऊ मोरे हे समाजवादी पक्षाचे हाडाचे कार्यकर्ते. कोणी कामगार तर कोणी कारागीर. पण यांचीही आईकडे फेरी असे. असे हे माझ्या आईचे विशाल कुटुंब.

•

कुटुंबनियोजन हा तिच्या जगण्याचा गाभा होता . मी , प्रकाश , पपा आणि आई असे चौकोनी कुटुंब . पण त्या चौकोनाच्या सीमा क्षितिजापर्यंत भिडल्या होत्या . या कुटुंबाला तिचा धाक होता . एखाद्याचा संसार नको तितका वाढतोय हे लक्षात येताच ती आपल्या मुलांना छानपैकी झापत असे . तिच्या सहवासात आलेल्या सर्वांपर्यंत तिने कुटुंबनियोजनाचा विचार तळमळीने पोहचवला . खेड्यातून येणाऱ्या पक्षकारांपर्यंतही . दुपारच्या वेळी तिच्याकडे स्त्रिया आपले मन मोकळे करायला येत . कुटुंबातील , पतीपत्नींमधील कलह सोडविण्याचे काम ती जीव ओतून करी . तिच्या एका मुलाची पत्नी असाध्य रोगाने आजारी झाली . धुळ्यात उपचार होऊ शकत नव्हते . त्याच्या घरात कोणी शिकलेले नाही . आईने त्याला बोलावून बजावले , " तुला दुसरी बायको मिळेल . पण मुलांना आई मिळणार नाही . तिला मुंबईला घेऊन चल . मी बरोबर येते . " ही बाई आम्हांला घरी ठेवून मुंबईला गेली . तिथे त्या सुनेवर मोठी शस्त्रक्रिया झाली . एकीकडचे हाड काढून दुसरीकडे बसवले . मुलांची आई वाचली . आज ती सून नातवंडांच्या मेळ्यात सुखेनैव नांदते आहे .

सध्या कॅनडात स्थायिक झालेले डॉ . जगन्नाथ वाणी , तिचा लाडका लेक . जगन्नाथबद्दल , त्याच्या हुशारीबद्दल , तिला अपार अभिमान होता . जगन्नाथच्या पत्नीला कॅनडात पाठवण्यासाठी तिने खूप प्रयत्न केले . सातवी आठवी पास झालेल्या मुलीने कॅनडात संसार थाटायला जाणे ही गोष्ट ३० वर्षापूर्वी सोपी नव्हती . पण तिची मानसिक तयारी आईने केली . इतर तयारीही केली आणि ही सून तीस वर्षांपूर्वी कॅनडात जाऊन संसार करू लागली . जगन्नाथने १९७२ मध्ये तिच्यासाठी तिकीट पाठवले . कॅनडा , अमेरिकेची वारी तिने एकटीने केली . खूप हिंडायचा नाद होता तिला . भारतातही खूप भटकली . हिमालय तिला खूप प्यारा .गंगोत्रीजम्नोत्रीपर्यंत धडक देऊन आली . माणसे जोडण्याचा तिचा धर्म होता . जिभाऊ , पपांचे पक्षकार . त्यांची मोठी सून निर्मला लग्न झाले तेव्हा मॅट्रिकला होती . तिची शिकण्याची खूप इच्छा . पण रहाणार कुठे ? आईने सहजपणे सांगितले , हे घर आहे . शैलाबरोबर तीही राहील . निर्मलाने आज डॉक्टरेट मिळवली आहे . मुंबईला असते . सून , जावई आले आहेत . माझ्या अभिजितच्याही आधी , निर्मलाच्या सलीलने तिला आजी होण्याचे कौतुक दिले .

विजयाताई चौकयांचे सामाजिक व्यक्तिमत्त्व घडवण्यात आईचा सहभाग होता . स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या वेदना सहन करण्यासाठी लागणारे नैतिक बळ तिने अनेक जणींना दिले . आई जायच्या आदल्या दिवशी तिने मलाच विजया म्हणून हाक मारली . शैला इतक्याच विजया , सुलभा , ज्योत्स्ना , शामल , कमल आणि अनेक तिला प्रिय होत्या .

आई ऑनररी मॅजिस्ट्रेट होती . एकही पैसा खर्च न करता , केव्हाही गेले तरी काम होणारच याची खात्री असल्याने आईकडे सतत गर्दी असे . इतकी की , इतरांना त्रास होऊ नये म्हणून तिने आपले टेबल खालच्या ओसरीवर मांडले . आजारी वा वृद्ध स्त्रियांचे जबाब नोंदवून घेण्यासाठी वा समक्ष सही घेण्यासाठी ती स्वखर्चाने त्यांच्या घरी जात असे . एक श्रीमंत मुस्लिम दुकानदाराच्या आईची सही घेण्याचा प्रसंग होता . त्यांच्या मोटारीतून त्यांच्या घरी जावं असा आग्रह दुकानदाराने धरला . पण तिने स्पष्टपणे नकार दिला आणि नम्रपणे सांगितले , हे काम माझ्या कर्तव्याचा एक भाग आहे , तुमचे घर अवघ्या दहा मिनिटांच्या अंतरावर आहे . मी चालतच येईन .

आई नगरपरिषदेत निवडून गेली होती . तिच्या निर्मळ तरीही करारी व्यक्तिमत्त्वाचा दरारा होता . एका निर्व्यसनी , सुशिक्षित आणि ज्याचा भूतकाळ स्वच्छ होता अशा तरुणास नगराध्यक्ष करण्यासाठी तिने इतर स्त्रीसभासदांना पटविले आणि वयाच्या पंचविशीत तो तरुण नगराध्यक्ष झाला . आज महाराष्ट्र सरकारच्या न्यायखात्यात फार मोठे पद तो भूषवित आहे .

मी वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत एकटी होते . अगदी लाडोबा . अर्थात लाडांनाही कठोर शिस्त होती . ती उपजतच कलावान होती . पेटीवर बोटे फिरू लागली की फुलपाखरे नाचत . 'सुरसुखखनि तू विमला' किंवा 'वद जाऊ कुणाला शरण गं' यासारखी नाट्यगीते ती सुरेख वाजवीत असे . तिचे माहेर पार्ल्याच्या गानूंकडचे . सांस्कृतिक समृद्धीचा वारसा तिथूनच तिला मिळाला . पु .ल .देशपांडे पेटीच्या वर्गातले तिचे वर्गबंधू . हा तिचा संदर्भ मला थेट पु .लं . च्या घरात पायरीपाशी नेऊन ठेवीत असे . बालगंधर्व अगदी वयस्कर झाल्यावर त्यांच्या मदतीसाठी पार्ल्याला संगीत रजनी साजरी झाली होती . तिथे पु .ल . आणि सुनीताताई भेटले होते . पार्ल्यात म्हणजे तेव्हाच्या घरगुती पार्ल्यात ती बेबी गानू म्हणून ओळखली जाई . नववी पास झाल्यावर घरगुती कामात तरबेज होण्यासाठी तिचे शिक्षण थांबवले गेले पण पेटीचा क्लास चालू राहिला . १९३६ साली बेबी गानूची शकुंतला परांजपे होऊन ती धुळ्याला आली . पपांनी हुंडा घेतला नाही म्हणून त्यांच्या वडिलांची नाराजी होती . सासुरवास करायला सासू नव्हती पण कडक स्वभावाचे सासरे होते . नवरा आधुनिक विचारांचा . प्रत्यक्ष चळवळीतला . वकिलीपेक्षा इतर गोष्टीत अधिक रस . पैसा घरात न आणणारा . अशावेळी आईवरच टोमण्यांची खैरात होई . पण ते सारे तिने ताठ राहून नम्रपणे सोसले . पपा नि आईचे सहजीवन जणू दुर्मिळ रसायनच . दोघेही एकमेकांत पूर्णपणे बुडून गेलेले . पपा आईच्या पाठीशी नेहमीच उभे रहात . आपल्या पत्नीला होणारा त्रास ओळखून त्यांनी वेगळे रहाण्याचे ठरवले . मी साडेतीन वर्षांची असताना आम्ही

आग्रा रोडवरच्या टकले सरांच्या वाड्यात रहायला आलो आणि तिथं ३६ वर्षे राहिलो. शेजारधर्माचे सर्व आदर्श पाठ या वाड्यात गिरवले जात. आई नि कुसुमताई यांचा मंगळवारचा बाजार, महिन्याचे वाणसामान आणण्याचा वार ठरलेला असे. बाजारातली माणसे त्यांना वहिणीच मानत. घरात पाहुणा आला नि पोळ्या कमी असल्या, तर स्वयंपाकघराच्या खिडकीतून पोळीभाजीची देवघेव होई. दोन्ही घरचे पाहुणे उपाशी रहात नसत. टकले बाबांचे कुटुंब आपोआप सेवादलाशी जोडले गेले. टकल्यांचे घर परांजप्यांचे घर समजले जाई. मग बाबा गमतीने म्हणत, शंकरराव, तुमचे सर्व सामान एक दिवस तरी रस्त्यावर ठेवायला हवे. त्याशिवाय हे घर तुमचे नाही हे लोकांना कळणार नाही.

डॉक्टर कमलाबाई अष्टपुत्रे म्हणजे माझी बाई. आईची सख्खी मैत्रीण कम् गुरु वगैरे. आईचे लग्न झाल्याच्या तिसऱ्या दिवशी पपांनी आईला तिच्याकडे नेले होते. तिच्या सहवासामुळे आई राजकारण, समाजकारण यांत ओढली गेली. तरीही या दोन्ही बायका तऱ्हेतऱ्हेचे कपडे मला नि वसूला (डॉ.वसुंधरा भागवत) शिवीत. आई करारी असली तरी स्वप्निलही असावी.

मी सहा महिन्यांची असेन. १९४१चा सुमार. महात्माजींचे दर्शन घडवण्यासाठी, सहा महिन्यांच्या पिल्लाला तिने भर पहाटे पार्ल्याहून जुहूला नेले होते. माझ्या डोळ्यांनी महात्माजींना प्रत्यक्ष पाहिले आहे याची काल्पनिक अनुभूती आजही माझ्या अंगावर रोमांच फुलवते आणि रस्त्यावरून घाईघाईने जाणारी, नऊवारी लुगड्यातली माझी तरुण नवमाताही माझ्या डोळ्यांसमोर जशीच्या तशी उभी रहाते. चलेजावच्या चळवळीत तिने खादीचे व्रत घेतले. आमच्या घरात बुलेटिन छापले जाई. त्या कामात ती मदत करी आणि माझी चुलत भावंडे भाजीच्या पिशवीतून ते कागद घरोघर वाटीत. अनेक भूमिगत कार्यकर्ते आमच्या घरी येत. अहमदनगरचे हिरवे वकील आमच्या घरी माझे मामा म्हणून राहिले. एस.एम.जोशी मुस्लिम काझीच्या वेषात वावरत. अच्युतराव पटवर्धनांना भेटण्यासाठी पपाही जात. भूमिगत कार्यकर्त्यांचे निरोप पोचविण्याचे काम आमच्या घरातून चाले.

आई पपांच्या या अनोख्या संसारातून मला खूप समृद्धी मिळाली. जयप्रकाशजी, राम मनोहर लोहिया, साने गुरुजी, एस. एम. जोशी नाहीतर नानासाहेब गोरे ही मंडळी आमच्या घरात पाहुणी म्हणून येत नसत तर कुटुंबीय येत असत.

समाजवादी पक्षाची प्रसोपा आणि संसोपा अशी दोन शकले झाली तेव्हाची गोष्ट. एसेमअण्णा धुळ्याला आले होते. पपा प्रसोपात गेलेले. त्यामुळे संसोपाच्या पुढाऱ्यांनी अण्णांना डाक बंगल्यात उतरवले. अण्णांना तिथे चैन पडेना. ते चक्क उठले नि दुपारी घरी आले. आई गच्चीत तांदूळ निवडत बसलेली होती. अण्णा जिन्यावरूनच

शंकरराव अशी आरोळी देत आले . " अरे , काय ही मंडळी ! एसेम धुळ्यात आल्यावर शकुंतलाबाई नि शंकररावांच्या घराशिवाय कुठे उतरू शकतो का ? हे तर भाऊबंदकीच्या वर झाले . पार्ट्या वेगळ्या झाल्या म्हणून काय माणसं बदलतात ?" बोलताना अण्णांनाही मोकळं वाटत होतं आणि आईही अण्णांची आत्मीयता पाहून भरून पावली होती .

प्रकाश जेमतेम पाचसहा वर्षाचा होता तेव्हाची गोष्ट . त्याच्या पायाला फ्रॅक्चर झाले नि पाय सहा महिने प्लास्टरमध्ये होता . मग तो सतत खिडकीत बसलेला असे . तेव्हा रिक्षा नव्हत्या . घोड्यांचे टांगे असत . आग्रा रोडवर रहदारीपण खूप असे . सततच्या निरीक्षणामुळे आणि मनाच्या एकाग्रतेमुळे तो घोड्यांच्या टापांवरून टांग्याचा नंबर अगदी अचूकपणे सांगत असे . कोणी पाहुणे आले की त्याला टांग्याचा नंबर ओळखायला सांगत . तो छंदच जडला होता . त्याच सुमारास नानासाहेब गोऱ्यांचा , साधनेत बहुधा , चुरचुरीत लेख आला होता .'नाच रे मोरा' या नावाचा .त्यात आईवडील आपल्या मुलांच्या साध्या साध्या गुणांचे पाहुण्यासमोर कसे प्रदर्शन करतात यावर शालजोडीतले झपके मारले होते . त्यानंतर केव्हा तरी नानासाहेब घरी आले . आमचे पपा म्हणजे कठीणच . बोलता बोलता हसत आईला म्हणाले ," अग तू कौतुकाने प्रकाशला टांग्याचे नंबर ओळखून दाखवायला सांगशील . पण तसं करू नको हं . नाहीतर नानासाहेब दुसरा लेख लिहायचे !"

"अरे काय हे शंकरराव ! एवढी क्रूर चेष्टा नका करू ." नानासाहेबांचे ते उद्गार अजून आठवतात . वरच्या कापडांचे आकार वेगवेगळे असले तरी या मंडळींचे आंतरिक अस्तर अतिशय निर्मळ आणि तलम होते . त्यांच्या सामाजिक वा राजकीय जीवनात एकांडेपणा नव्हता .

वसूचा आवाज विलक्षण सुंदर . गोड . तरीही खुल्या आभाळासारखा मोकळा . तिच्यामागे तंबोऱ्यावर बसण्यातही मला सन्मान वाटे . जयप्रकाशजींसमोर वसू गायली होती . डॉक्टरबाईंच्या माडीतली ती मैफिल . त्यात वसूने गायलेला मालकंस . कौतुकलेली आई नि बाई . आज वसू नाही . जयप्रकाशजी नाहीत .पण त्या सहवासाचे अमोल क्षण विसरणं अशक्य आहे . आमच्या आयुष्याला केवढी श्रीमंती दिली आईपपांनी !

मधु लिमये त्या वेळी खूप तरुण होते . लग्न झालेले नसावे : ते धुळ्याला आले होते . मला चॉकलेट नि टॉफी खाताना त्यांची आठवण होते . आरामखुर्चीवर बसून ते सतत वाचीत असत . खूप एकाग्रतेने .

एकदा साने गुरुजींचे भाषण चौथ्या गल्लीच्या कोपऱ्यावर होणार होते . भाषणापूर्वी , घरीच हॉलमध्ये गुरुजी विश्रांती घेत होते . शेजारीच प्रकाशचा पाळणा . आत नऊ-दहा महिन्यांचा प्रकाश . आई भाषणाच्या पूर्वतयारीसाठी गेलेली . घरात दहा वर्षांची

मी . बाळाने दुपट्यात शी केली . घाण वास आला . नि पाळण्याजवळ गेले . नाक वाकडे करून दूर पळाले . पण मन खायला लागले . परत पाळण्यापाशी आले . बाळाच्या अंगावरची दुलई दूर केली नि भपकारा नाकात शिरला . तशीच दुलई अंगावर टाकून मी पार गच्चीत गेले . थोड्या वेळाने येऊन पहाते तो गुरुजींनी बाळाला साफ करून पलंगावर टाकले होते . घाणेरडे कपडे नीट गुंडाळून कोपऱ्यात ठेवलेले आणि बाळ चांगले खेळतेय . मी शरमेने चूर झाले . वर पहाण्याचे धैर्य होईना .

" बघ , बाळ ताईला बोलवतंय . " गुरुजींचे शब्द . तेव्हापासून मला त्याची घाण वाटली नाही . स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भंगीमुक्ती मोहिमेचा भाग म्हणून राष्ट्रसेवादलाचे सैनिक संडास सफाई करण्यास जात . आईपपांबरोबर मीही गेले आहे .

मी गावे , नाटकात काम करावे असे आईला वाटे . गाण्यावर तर तिचे खूप प्रेम . मला वयाच्या दहाव्या वर्षी तिने श्रीपादशास्त्रींकडे गाणे शिकायला पाठवले . त्यांनीही भरभरून दिले . पण मीच नादान . त्या वयात संध्याकाळी चार भिंतीच्या आत आऊ करण्यात माझे मन लागत नसे . काही ना काही बहाणे मी करी . माझा आवाज बरा असावा . अप्पा म्हणत , तुझ्या गळ्यात ठुमरी कशी बसवतो बघ , कोंदणात हिरकणी बसवावी तशी . पण कोंदण हाती येईल तर ना ? मी संगीत विशारद झाले तरी गाणे आत्मसात केले नाही म्हणून आईला नेहमी खंत वाटे .अगदी शेवटपर्यंत .मी तिच्यासाठी गात राहिले .ती जायच्या आदल्या दिवशीही मी कितीतरी गाणी म्हटली . माझिया माहेरा जा हे गाणे म्हणताना माझा आवाज जड झाला . भरून आला . तिच्या क्षीण हातांनी तिने माझा हात थोपटला . ते थोपटणे खूप काही सांगणारे होते .

माझ्या मित्रमैत्रिणींची ती मावशी होती . कोणत्याही मुलाला मानलेला भाऊ म्हणण्याची पाळी माझ्यावर आली नाही . गिरीधर , एम .वी . , सुरेश , शरद , अरु , अशोक , कितींतरी जण .

मी लग्नानंतर अंबाजोगाईला आले तरी त्यांचे आणि तिचे बंध घट्टच होत गेलेले . आजही आम्ही मित्र म्हणून नितळपणाने गप्पा मारू शकतो . अपार स्नेह आजही ताजा आहे . ही सारी तिने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाची किमया आहे .

माझा आंतरजातीय प्रेमविवाह . तिला माझी चिंताच असे . तिचे सारे लक्ष माझ्या घरट्याच्या सुरक्षिततेवर असे . मी लाडाकोडात वाढलेली . कामाची वा जबाबदारीची सवय नाही आणि डॉक्टर लोहिया काहीसे तापट . करारीही . सुरुवातीची काही वर्षे ती धास्तावलेलीच असावी . सामाजिक कार्यकर्त्यांचा संसार करताना किती ठिकाणी गाठी माराव्या लागतात हे ती जाणत होती आणि म्हणूनच मी स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे रहावे असे तिला वाटे . मी एम .ए . होऊन महाविद्यालयात नोकरीला लागले . १९७२ साली नोकरीत कायम झाले आणि १९७४ मध्ये डॉक्टरांनी व्यवसाय सोडला . माझ्या एम .ए .मागची प्रेरणा पूर्णत्वाने तीच आणि पुढे ' मानवलोक ' चे काम

स्वतंत्रपणे सुरू झाल्यावर तिला माझा खूप अभिमान वाटे. पैशाची प्रतिष्ठा तिच्या लेखी कधीच नव्हती.

महिला सदनच्या उभारणीत तिचा उत्साहाचा वाटा. वनिता समाजात ती जात असे. सुरेखपैकी बॅडमिंटन खेळे. आमच्या घरातच खालच्या मजल्यावर तिचे पार्टनर मधुभाऊ जोशी रहात. चाळीसपंचेचाळीस वर्षापूर्वी बॅडमिंटन खेळणे, मिश्र दुहेरी सामन्यात सहभागी होणे, आशीर्वाद सारखी नाटके बसवून त्यात सहभागी होणे, निर्वासितांसाठी कपडे गोळा करणे, सैनिकांसाठी स्वेटर्स विणून पाठवणे या गोष्टी ती सहज करी. यात पपांचाही वाटा होता.

मला आठवते तशी ती राष्ट्रसेवादल प्रमुख होती. इंटकचे पुढारी असलेल्या श्री. वि. वा. नेने यांचा सहपरिवार मुक्काम आमच्या घरी होता. रेशनिंगचे दिवस होते. पण कधीही आईने कुरकुर केली नाही. मध्यंतरी त्यांनी लिहिलेले आत्मचरित्रात्मक पुस्तक पाहण्यात आले. त्यात या राहण्याचा कुठे उल्लेख आला नाही. आईपपांच्या सहवासात असंख्य माणसे आली. पहाता पहाता दूर वा व्यावहारिकदृष्ट्या पुढे निघून गेली. आई मात्र नेहमीच आत्मतुष्ट होती. आर्थिक व राजकीय आकांक्षा नव्हत्याच आणि म्हणून खंतही नव्हती.

सेवादलाचे ऋण मानणाऱ्यांनी मात्र आईवर खूप प्रेम केले; तिला आदर दिला. कलापथकाचे दिवस आले की ती मनोमन खुष असे. बापटकाका, सुधाताई, सदानंद वर्दे, प्रमिलाताई दंडवते, लीलाधर, यदुनाथ नि जान्हवीताई थत्ते, आवाबेन, नाना नि सुधाताई डेंगळे, सारी सेवादलाची मंडळी. ते तिचे श्रीमंत माहेरच होते जणू. या मंडळींनाही आमचे घर कधी परके वाटले नाही. डॉ. वसुधा धागमवार, गीताबाई सान्यांची मुलगी, धडगावला काम करण्यासाठी आली. ती आईची भाची बनून गेली. ३२/३३ वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध कथाकार प्रा. कमल देसाई धुळ्याला मराठीच्या प्राध्यापिका म्हणून आल्या. प्रधान मास्तरांनी आईचाच पत्ता दिला होता. त्याही आमच्याच बनून गेल्या. अशा त्या प्रचंड संसाराची सहजपणे उठाठेव करणारी माय पाटावरून उठून गेली आहे. गेली चार पाच वर्षे थोडीफार आजारीच असे. पण तिने आजाराचा बाऊ केला नाही. प्रकाशची पत्नी, माधुरी तिची माहेरवाशीणच होती. तिने अत्यंत प्रेमाने आईची सेवा केली. आपल्या सुनेला आपले करावे लागते, तिला माहेरीही निवांतपणे जाता येत नाही याचे तिला वाईट वाटे. तिच्या चिमण्या नाती, जणू तिचा प्राण. छोटी अमृता रोज रात्री तिची गादी घालून देई. आजीची पापी घेऊन तिला गुड नाईट, सी यू वगैरेचा उपचार करी. अभिजितच्या वायकोचेही तिला अप्रूप होते. नातसून आपण पाहिली यातच ती तृप्त होती.

"शैला येऊन भेटून जाते. पण माहेरवाशीण कितीही वेळा आली तरी पोट भरत नाही." ती म्हणे.



ज्ञानप्रबोधन संचलित
डॉ. राममनोहर लोहिया वाचनालय
अंबाजोगाई. ग्रंथ क्र. [illegible]

आदल्या दिवशी रात्री खूप गप्पा मारल्या . मी जुनी जुनी गाणी म्हणून दाखवली . बोलताना माझा हात धरून म्हणाली ,

"का उशीर होतोय कळत नाही ."

"कशाला ग ?" माझा प्रश्न .

"हेच ते मन कशात अडकलंय ?"

"छे गं ! मी मजेत आहे . पण आता उशीर नको . माझ्यासाठी प्रार्थना करा . लवकर आटोप म्हणावं ." ती म्हणाली .

"आई , प्रार्थना कशासाठी करायची !" मी

"ज्या गोष्टी आपल्या हातात नाहीत , त्यांसाठी करायची ." आई .

आणि दुसऱ्या दिवशी सूर्याच्या शेवटच्या किरणांचा हात धरून ती निघून गेली .

थोडी कण्हली म्हणून माधुरीने विचारले , आई , त्रास होतोय का ? आता अगदी जावेसे वाटतेय ... तिचे उत्तर .

आम्ही पपांना तिच्याजवळ आणून बसवले . तिचा हात पपांनी हातात घेतला . ती मला म्हणाली , त्यांना कशाला इथे बसवलेस ? ते हळवे आहेत . त्यांना सोसणार नाही .

आणि हेच शेवटचे शब्द .

पपांनी मला विचारले , हॅज शी पास्ड् अवे ? इंग्लिश भाषेचा आधार त्यांनी घेतला . दुसऱ्या दिवशी ते मला सांगत होते . "आधी तिने माझा हात घट्ट धरला . मग माझ्या लक्षात आले की तिचा हात सैल पडलाय आणि गारही ."

आईपपांची पिढी स्वप्नांना मातीचे पाय देण्यासाठी झटली . शब्दांना संदर्भ होते . वचनांना अर्थ होता .

तीन्ही सांजा सखे , मिळाल्या देई वचन तुला
आजपासूनी जीवे अधिक तू माझ्या हृदयाला ...

हे वचन त्यांनी उणीपुरी छपन्न वर्षे पाळले . ते वचन मागणारी हाती हात देऊन तिन्ही सांजेचा मुहूर्त साधून निघून गेली . परंतु सभोवतालच्या परिसरात स्वतःला पेरून गेली . आज ती नाही . पण जिथे जिथे राष्ट्रसेवादल विचार आहे , तिथे तिथे ती भरून उरली आहे .

❖❖❖